


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ८७ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



नि काळाप्रमाणे चांगल्या परंपरागत रुढींचा अवलंब करून कालबाह्य रुढी नामशेष करता येतील. व्यक्तिगत, पारिवारिक, व्यावसायिक आणि सामाजिक जीवनात परस्पर पूरकता निर्माण होईल. वास्तविक पाहता हे काम म्हणजेच सामाजिक संघटन होय आणि याच कामाची आपल्याला दीर्घकाळापासून प्रतीक्षा आहे. याशिवाय समाजाचे संघटन स्थायी आणि स्वस्थ बनू शकत नाही.

**-भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# २५ हजार रुपयांत फुटला पेपर?

## शिक्षण विभाग हादरला ● हजारो विद्यार्थ्यांचा गैरप्रकारात समावेशाचा संशय

◆ **नागपूर, २१ फेब्रुवारी**

नागपुरातील सेंट उर्सुला शाळेतील बारीवीच्या परीक्षेच्या सेंटरवर दोन विद्यार्थिनींकडून मोबाईल जप्त केल्यांनंतर फिजिक्स आणि केमेस्ट्री या विषयाचे पेपर फुटल्याचे प्रकरण समोर आले. या प्रकरणी तरुण भारतने वृत्त प्रकाशित करताच शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली. विद्यार्थ्यांकडून एका पेपरसाठी २५ हजार रुपये घेतल्याची माहिती आहे. याप्रकरणी सदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पेपर फुटीप्रकरणी सदर पोलिसांनी शिक्षण विभागातील कर्मचारी आणि शिकवणी वर्गाच्या शिक्षकांची चौकशी सुरू केली आहे. बारावीच्या परीक्षेत पेपर फुटीचे पहिलेच प्रकरण असून याची दखल थेट शिक्षण मंत्रालय आणि गृहमंत्रालयाने घेतली.

नागपुरातील सेंट ऊर्सूला या शाळेच्या बारावीच्या परीक्षा केंद्रावर दोन विद्यार्थिनींकडे मोबाईल आढळून आले. त्यामध्ये एका व्हॉट्सअप ग्रुपमध्ये केमेस्ट्रीचा पेपर आढळून आला. या प्रकरणी सदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून सखोल चौकशी सुरू केली आहे.

या ग्रुपचा ॲडमीन असलेल्या शिक्षकाला लवकरच पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावण्यात येणार असून त्याने आतापर्यंत किती विद्यार्थ्यांना पेपर विकला याची माहिती काढण्यात येणार असल्याचे सदर पोलिसांनी सांगितले. अशाप्रकारे संपूर्ण महाराष्ट्रात पेपर फुटीचे नेटवर्क असून यामध्ये हजारो विद्यार्थ्यांचा समावेश असण्याची शक्यता विश्वसनीय सूत्रांनी वर्तवली आहे. ◄(तभा वृत्तसेवा)


बारावीच्या दोन विषयांचे पेपर फुटले

'आपलं नागपूर'मध्ये प्रकाशित बातमी


### परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांची चौकशी

**सध्या बारावीचे काही पेपर शिल्लक असून विद्यार्थी परीक्षा देत आहेत. मात्र, परीक्षा संपताच १५ विद्यार्थ्यांना चौकशीसाठी बोलविण्यात येणार आहे. त्या विद्यार्थ्यांच्या पालकांची चौकशी करण्यात येणार आहे.** ■

### विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये धास्ती

पेपर फुट प्रकरणात हजारो विद्यार्थ्यांचा समावेश असून गैरप्रकारात समाविष्ठ असलेल्या विद्यार्थी आणि पालकांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे. जर पालकांनी पैसे देऊन पाल्यांसाठी पेपर फोडला असेल तर त्यांच्यावरही गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. ■

## पहिला सुपर एट सामना पावसामुळे रद्द



**कोलंबो** : आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत शनिवारी होणाऱ्या पाकिस्तान आणि न्यूझीलंडदरम्यानचा पहिला सुपर एट सामना पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे रद्द करण्यात आला. दोन्ही संघांना प्रत्येकी १ गुण प्रदान करण्यात आला. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु सलामीवीर मैदानावर येण्यापूर्वी पावसाने हजेरी लावली. पाऊस थांबल्यास पाच-पाच षटकांचा सामना खेळविण्याचे निश्चित झाले होते, परंतु पाऊस थांबेना. अखेर सामना रद्द करण्यात आला. ■

## महत्त्वाचे

### आर्थिक वर्षात ९.४ टक्क्यांनी वाढली औषध निर्यात

**नवी दिल्ली** : आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये देशाची औषध निर्यात ९.४ टक्क्यांनी वाढून ३०.४७ अब्ज डॉलर्स झाली. पुढील आर्थिक वर्षात दुहेरी अंक विस्ताराचे लक्ष्य क्षेत्राने ठेवले आहे. अहमदाबाद येथील चिंतन शिबिरात सरकारी अधिकारी आणि उद्योग यांच्यात औषध निर्यातीशी संबंधित मुद्यांवर चर्चा झाली. सध्या सुमारे ६० अब्ज अमेरिकी डॉलर्सचे मूल्य असलेले हे क्षेत्र २०३० पर्यंत १३० अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. प्रमाणानुसार भारत जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारतातून २०० पेक्षा जास्त बाजारपेठांमध्ये औषधे निर्यात केली जातात आणि ६० टक्क्यांपेक्षा अधिक निर्यात कठोर नियामक बाजारांमध्ये केली जाते. भारताच्या औषध निर्यातीत अमेरिकेचा वाटा ३४ टक्के आणि युरोपचा वाटा १९ टक्के आहे. ■

### डोणगाव ग्रामपंचायतचे दोन लिपिक बडतर्फ

**डोणगाव** : येथील ग्रामपंचायत नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. त्यातच आता ग्रामपंचायतमधील अनियमिततेच्या पृष्ठभूमीवर दोन लिपिकांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले असून, अधिकाऱ्यांवरील कारवाई अद्याप प्रलंबित आहे. येथील अमोल धोटे यांनी नोव्हेंबरमध्ये ग्राम पंचायतच्या कारभाराविरोधात जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाने चौकशी समिती स्थापन करण्यात आली. ३० जानेवारीला सादर झालेल्या चौकशी अहवालात काही गंभीर बाबींच्या नोंदी करण्यात आल्या होत्या. १८ फेब्रुवारीला ग्रामपंचायत अधिकारी व सरपंचांच्या आदेशाने लिपिक श्याम खोटे व प्रदीप परमाळे यांना बडतर्फ करण्यात आले.

# जगभरातील देशांवर १५ टक्के व्यापार शुल्क

**सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर ट्रम्प यांची घोषणा ● मंगळवारपासून होणार अंमलबजावणी ● भारतासोबतच्या प्रस्तावित करारात बदल नाही**

◆ **वॉशिंग्टन, २१ फेब्रुवारी**

शंभरपेक्षा अधिक देशांवर आकारलेले व्यापार शुल्क अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर असल्याचा निर्णय दिल्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १९७४ च्या व्यापार कायद्याच्या कलम १२२ अंतर्गत मंगळवार, २४ फेब्रुवारीपासून भारतासह जगातील सर्वच देशांवरील उत्पादनांवर १५ टक्के शुल्क लावण्याची घोषणा केली. ट्रम्प यांनी कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केल्यानंतर १५० दिवसांसाठी शुल्क आकारण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.



भारतासोबतच्या प्रस्तावित व्यापार करारात कोणताही बदल होणार नसल्याचे नमूद करताना ट्रम्प पत्रपरिषदेत म्हणाले, विविध देशांवर सध्या लागू असलेल्या शुल्काऐवजी आता १५ टक्के व्यापार शुल्क आकारले जाणार आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अभ्यास करून शुल्कातील बदलासंदर्भात काही दिवसांत निर्णय घेतला जाणार आहे. तथापि, भारतावर अतिरिक्त शुल्क लागू असेल, की आधीच ठरवलेल्या १८ टक्के मध्येच ते समायोजित केले जाईल, यावर ट्रम्प यांनी कोणतीही टिप्पणी केलेली नाही. कलम १२२ नुसार राष्ट्राध्यक्षांना होणाऱ्या आयातीवर जास्तीत जास्त १५० दिवसांसाठी १५ टक्क्यापर्यंतचे शुल्क आकारण्याचे अधिकार आहे. १५० दिवसांनंतर शुल्कासंदर्भात निर्णय घेतला जाईल, आवश्यक असल्यास यासाठी काँग्रेसची सहमती घेऊ, असे ट्रम्प यांनी सांगितले. ◄(वृत्तसंस्था)

### १८ टक्के शुल्कातून भारताला दिलासा

प्रस्तावित व्यापार करारामुळे भारताच्या ४५ टक्के उत्पादनांवर १८ टक्के शुल्क, तर इतर वस्तूंना शुल्कातून सूट देण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर ट्रम्प यांनी जारी केलेल्या कार्यकारी आदेशानुसार भारतावर १५ टक्के शुल्क आकारले जाईल. व्यापार कराराच्या अंमलबजावणीपर्यंत भारतीय उत्पादनांवर १८ ऐवजी १५ टक्के शुल्क आकारले जाणार असल्याचे व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने पत्रकारांना सांगितले. ■

### अमेरिकेचे नुकसान थांबविण्यासाठी करार

भारतासोबतच्या करारासंदर्भात बोलताना ट्रम्प म्हणाले, पंतप्रधान मोदी हुशार व्यक्ती आहे, त्यांच्या धोरणामुळे अमेरिकेचे आर्थिक नुकसान झाले. त्यामुळेच अटी बाजूला ठेवून आम्हाला भारतासोबत करार करावा लागला. न्यायालयाने शुल्काचा आदेश केल्याने आम्हाला तात्पुरती व्यवस्था म्हणून सर्व देशांवर १५ टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय घ्यावा लागला. ■

# भारत-ब्राझील शोधणार दुर्मिळ खनिजे

**✔ मोदी-लुला यांची 'पॉवरडील' ✔ २० अब्ज डॉलर्सच्या व्यापाराचे लक्ष्य**

**नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्राझीलचे राष्ट्रपती लुईज इनासियो लुला दा सिल्व्हा यांच्यात शनिवारी झालेल्या द्विपक्षीय चर्चेत दुर्मिळ खनिजांवर दोन्ही देशांनी हातमिळवणी केली. जागतिक दक्षिणेच्या दोन्ही देशांमधील बहुआयामी सहकार्य बळकट करण्यावर मोदी-लुला यांनी भर दिला.

दोन्ही देशांना फायदा देणारी ही भागीदारी असून, भारत पुढील पाच वर्षांत २० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त व्यापार करण्यास कटिबद्ध असल्याचे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. ब्राझील हा लॅटिन अमेरिकेतील भारताचा सर्वांत मोठा व्यापार भागीदार आहे. दोन्ही देशामध्ये तंत्रज्ञान, संशोधन, संरक्षण, आरोग्य, औषधशास्त्र, पारंपरिक उपचार पद्धतीसारख्या क्षेत्रांत सहकार्य बळकट करण्यावर चर्चा झाली, असे मोदी यांनी सांगितले. महत्त्वाचे आणि दुर्मिळ खनिजांवर झालेला करार हा मजबूत पुरवठा साखळी तयार करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. स्वस्त आणि दर्जेदार औषधांचा पुरवठा ब्राझीलला वाढवण्यासाठी आणि आयुर्वेदाला प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

# अक्कलकोटच्या शिरपेचात मानाचा तुरा

**● 'माझी वसुंधरा'मध्ये राज्यात द्वितीय
● साडेसहा कोटीचे बक्षिस**



**तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि.२१ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासन आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या सयुक्त विद्यमाने मुंबई वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे आयोजित करण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळा - ५.0' या कार्यक्रमात अक्कलकोट नगरपरिषदेला महाराष्ट्रात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी मुख्याधिकारी रमाकांत डाके, उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड, मध्य मंडलचे अध्यक्ष प्रदिप पाटील, प्रशांत भगरे, विशाल चव्हाण, नितीन शेंडगे, भागवत पवार, शुभम माने आदि उपस्थित होते.

भूमी घटकास विशेष पारितोषीक व उंच उडी प्रकारात पारितोषीकही प्रदान करण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र आणि सहा कोटी पन्नास लाख रुपयांचा धनादेश असे पुरस्काराचे स्वरूप आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनामुळे अक्कलकोट नगरपरिषदेचे नागरिक, प्रशासनाचे अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळेच हे यश शक्य झाल्याचे नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

**मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान**

यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव जयश्री भोज, आयुक्त प्रवीण देवरे, राज्यपाल सहसचिव राममुर्ती आदि मान्यवर उपस्थित होते.






# आयटी पार्कसाठी २० हेक्टर जमीन औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचे आदेश

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

सोलापूरच्या आयटी पार्कसाठी होटगी येथील गट नंबर ५७६ मधील २० हेक्टर (५० एकर) जमीन औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिल्याची माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सोलापुरात आयटी पार्क सुरू करण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे तसेच इतर लोकप्रतिनिधी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरला आयटी पार्क करणार असल्याचा शब्द सोलापूरकरांना दिला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरकरांना दिलेला शब्द पूर्ण होण्याकडे या निर्णयामुळे एक पाऊल पुढे पडले आहे. या निर्णयामुळे आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.



विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या आदेशानुसार २० हेक्टर (५० एकर) जमीन औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. त्यानंतर आयटी पार्कच्या उभारणीला वेग येणार आहे. सोलापूरच्या जनतेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मतदानरुपी आशीर्वाद दिले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शब्दानुसार आयटी पार्कच्या उभारणीला आता वेग येणार आहे. सोलापूरच्या वस्त्रोद्योग व्यवसायाला इचलकरंजीच्या धर्तीवर सवलती देण्यासाठी आगामी अधिवेशनात बैठक लावण्यात येणार आहे. सोलापूरची विमानसेवा, समांतर जलवाहिनी ही कामे पूर्ण झाली आहेत. तसेच आगामी काळात अंतर्गत पाणीपुरवठ्यासाठीची कामेही लवकरच सुरू होणार आहेत.

**विकसित सोलापूरची पायाभरणी : आ.कोठे**

सोलापुरात आगामी काळात तयार होणारे आयटी पार्क म्हणजे विकसित सोलापूरची पायाभरणी असणार आहे. होटगी येथील २० हेक्टर (५० एकर) जागा औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचे आदेश म्हणजे त्याचीच दमदार सुरुवात आहे. सोलापूरला आयटी पार्क सुरू होण्यासाठी मंजुरी देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यासाठी निरंतर प्रयत्न करणारे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सोलापूरांतर्फे आभार.



सावदा परिसरातील विधवा महिलेवर बलात्कार करण्यात आला आहे. हा बलात्कार एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने केला आहे. पीडित महिला या प्रकरणी तक्रार दाखल करण्यासाठी सावदा पोलिस ठाण्यात गेली होती पण तिची तक्रार नोंदवून घेण्यात आली नाही.

**एकनाथ खडसे**, नेते राकाँ (श.प.)

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ ३

फरार आरोपी कृष्णा आंधळे मागील ६ महिन्यांत ३ वेळा आमच्या गावी येऊन गेला. यामुळे आमच्या कुटुंबाच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. आम्ही ही गोष्ट या सीआयडी अधिकाऱ्यांना सांगितली. त्यांनीही हा फरार आरोपी गावात येऊन गेल्याचे मान्य केले आहे.

**धनंजय देशमुख**, मृत संतोष देशमुखचे बंधू



# देशात दहशतवादी हल्ल्यांचा इशारा; धार्मिक-वारसा स्थळांवरील सुरक्षा वाढविली

**नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी -**
राजधानी दिल्लीसह देशभरातील धार्मिक आणि वारसास्थळी दहशतवादी हल्ले करण्याचा कट रचल्याचा इशारा गुप्तचर संस्थांनी दिला आहे. या इशाऱ्यानंतर लाल किल्ला आणि चांदणी चौकासह दिल्लीतील महत्त्वाच्या धार्मिक आणि वारसा स्थळांवरील सुरक्षा शनिवारी वाढविण्यात आली आहे. पाकिस्तानातील दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाने भारतातील प्रमुख धार्मिक स्थळांवर हल्ले करण्याचा कट रचला असल्याचा इशारा केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी दिला आहे.

त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी लाल किल्ल्याजवळ संभाव्य स्फोटाचा इशारा जारी केला आहे. चांदणी चौक परिसरातील एक मंदिर संभाव्य लक्ष्यांपैकी एक असू शकते, असे प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीवरून सूचित होत



असल्याचे सूत्रांनी सांगितले. गुप्तचर माहितीची पडताळणी आणि मूल्यांकन केले जात असताना संवेदनशील धार्मिक स्थळे आणि गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी तसेच त्यांच्या आसपास सुरक्षा वाढविण्यात आली आहे. केंद्रीय संस्था आणि दिल्ली पोलिस युनिट्स जवळून समन्वय राखत आहेत आणि सीसीटीव्ही देखरेख, वाहन तपासणी आणि संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त कर्मचारी तैनात करून पाळत वाढविली जात आहे. बॉम्ब नाशक पथके, श्वान पथके आणि जलद प्रतिसाद पथकही मोक्याच्या ठिकाणी सज्ज ठेवण्यात आली आहेत, असे सूत्रांनी सांगितले. लष्कर-ए-तोयबा आयईडी आधारित हल्ला घडविण्याचा प्रयत्न करू शकते, असा संकेत गुप्तचर यंत्रणांनी दिला आहे. पाकिस्तानच्या इस्लामाबादेतील एका मशिदीत ६ फेब्रुवारी रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाचा बदला घेण्यासाठी दहशतवादी गटाने केलेल्या प्रयत्नांशी ही कथित योजना जोडली गेली आहे, असे सूत्रांनी सांगितले.

## युवक काँग्रेसची निदर्शने जेन-झी आंदोलनाने प्रेरित

### एआय समिटमध्ये गोंधळ घालणाऱ्यांना पाच दिवसांची कोठडी

◆ **नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी**
येथील भारत मंडपम्मध्ये आयोजित एआय इम्पॅक्ट समिटमध्ये युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी घातलेला गोंधळ हा नेपाळमधील जेन-झीच्या आंदोलनाने प्रेरित होता, असा दावा दिल्ली पोलिसांनी शनिवारी येथील न्यायालयात केला. न्यायालयाने अटक केलेल्या कार्यकर्त्यांना पाच दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

या आरोपींची पोलिस कोठडीत चौकशी करण्याची गरज आहे, अशी केलेली मागणी न्यायदंडाधिकारी रवी यांनी मान्य करीत कार्यकर्त्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. अटक केलेल्या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये बिहारमधील युवक काँग्रेसचा राष्ट्रीय सचिव कृष्णा हरी, बिहारमधील युवक काँग्रेसचा राज्य सचिव कुंदन यादव, उत्तरप्रदेशातील युवक काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष अजयकुमार आणि तेलंगणातील नरसिंह यादवचा समावेश आहे.

युवक काँग्रेचच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी देशविरोधी घोषणा दिल्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आक्षेपार्ह प्रतिमा असलेले टी-शर्ट घातले, असा युक्तिवाद करीत दिल्ली पोलिसांनी अटक केलेल्या कार्यकर्त्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडीची मागणी केली. अटक केलेले आरोपी राजकीय पक्षाशी संबंधित आहेत. शांततेत निषेध करण्याचा त्यांचा लोकशाही अधिकार वापरला आहे, असा युक्तिवाद निदर्शकांच्या वतीने उपस्थित असलेल्या वकिलाने केला.

◀(वृत्तसंस्था)




#### कट, निधीचा स्रोत शोधणे गरजेचे

आरोपींचे फोन जप्त करणे आवश्यक आहे. कार्यकर्ते पाच वेगवेगळ्या राज्यांचे असल्याने त्यांची कोठडीत चौकशी करणे आवश्यक आहे. त्यांनी केलेली निदर्शने एक गंभीर बाब असून, त्यांनी पोलिसांना रोखण्याचा प्रयत्न केला. यात तीन पोलिस कर्मचारी जखमी झाले, असे सरकारी पक्षाने सांगितले. याव्यतिरिक्त निदर्शने आयोजित करण्यामागील कट, निधीचा स्रोत आणि टी-शर्ट कुठे छापले गेले, हे शोधणे आवश्यक असल्याचे वकिलांनी सांगितले. ■

## अशरफ मौलवीला जामीन देण्यास नकार

◆ **कोची, २१ फेब्रुवारी**
पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेचा राष्ट्रीय नेता अशरफ उर्फ कर्मन्ना अशरफ मौलवी याला एनआय न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला आहे. अशरफने शस्त्रांचे प्रशिक्षण देण्याचा आणि इसिसची विचारधारा पसरविल्याचा दावा एनआयएने केला आहे.

पल्लकड येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते श्रीनिवासन यांची हत्या केल्याचा आणि देशविरोधी कारवाया केल्याचा आरोपही अशरफवर आहे. तो बंदी घातलेल्या पीएफआय संघटनेच्या शैक्षणिक शाखेचा राष्ट्रीय प्रमुख आणि ऑल इंडिया इमाम कौन्सिलचा अध्यक्षही आहे. दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण देण्यासाठी कोची येथील पेरियार व्हॅली आणि त्रिवेंद्रम येथील त्रिवेंद्रम शैक्षणिक सेवा विश्वस्तच्या इमारतीमध्ये शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण केंद्र चालवित होता, असा आरोप अशरफवर आहे. मुहम्मद मुबारकसह त्याने हे केंद्र सुरू केले होते, अशी साक्ष या प्रकरणातील एकाने दिली आहे. तसेच २९ डिसेंबर २०२२ रोजी मुबारकच्या घरी टाकलेल्या धाडीत तीन तलवारी आणि एक कुऱ्हाड सापडल्याचे एनआयएने न्यायालयाला सांगितले. इसिस या कडव्या दहशतवादी संघटनेची विचारधार देशात पसरविण्यासाठी अशरफ हा युवकांना चिथावणी देत होता. त्याच्या घरून सापडलेल्या पेन ड्राईव्हमध्ये काफिरांविरोधात जिहाद पुकारण्याची भाषा तो करीत असल्याचे सरकारी वकिलाने म्हटले आहे. सोबतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदू नेत्यांच्या हत्येत सहभागी असलेल्या आरोपींच्या नातेवाईकांना पैसे पुरविल्याचे पुरावे आढळले आहेत. दरम्यान अशरफच्या वकिलाने सरकारी पक्षाने केलेले सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपींच्याविरोधातील साक्ष, परिस्थितीजन्य पुरावे पाहता आरोपीचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे सिद्ध होत असल्याने जामीन नाकारत असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

◀(वृत्तसंस्था)



## अजितदादांच्या अपघाताची उच्चस्तरीय चौकशी करा

### रोहित पवारांनी पाठविले पंतप्रधान मोदींना पत्र

◆ **नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी**
महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यूमागचे सत्य समोर आणण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी शनिवारी केली.

शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी आयोजित पत्रपरिषदेत रोहित पवार म्हणाले की, अजित पवार यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याशी अतिशय चांगले संबंध होते, त्यामुळे हे दोन नेतेच अजितदादांना न्याय देऊ शकतात, असा आमचा विश्वास आहे. या अपघातामागचे सत्य समोर आणण्यासाठी या दोघांनी पुढाकार घेतला पाहिजे, अशी मागणी करणारे पत्र मी पंतप्रधान मोदी यांना पाठवले आहे.





विमान अपघाताची चौकशी पूर्ण होण्याच्या आधीच नागरी उड्डयण मंत्री राममोहन नायडू यांनी व्हीएसआर कंपनीला क्लीन चिट कशी दिली, असा प्रश्न उपस्थित करीत, त्यांच्या राजीनाम्याची मागणीही पवार यांनी केली. अपघातग्रस्त विमान ज्या व्हीएसआर कंपनीचे होते, त्या कंपनीचे आणि तेलुगू देसमचे नेते आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या कुटुंबातील लोकांचे आर्थिक हितसंबंध होते. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी निःष्पक्षपणे होऊ शकत नाही.

पवारांचा अपघाती मृत्यू हा राजकीय आणि व्यावसायिक षडयंत्रातून रचण्यात आलेला असू शकतो. या मागे अनेक मोठ्या व्यक्तींचा हात असण्याची आशंकाही त्यांनी व्यक्त केली.

अजितदादांच्या विमान अपघाताच्या चौकशीचा प्राथमिक अहवालही आतापर्यंत आला नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त करीत पवार यांनी, अजितदादा पवार यांच्या अपघाती मृत्यूची लोकसभेतील विरोधी पक्षनेते, महाराष्ट्रातील विरोधी पक्षनेते, काही निवृत्त न्यायाधीश, निवृत्त वरिष्ठ अधिकारी, सुप्रिया सुळे आणि अन्य नेत्यांचा समावेश असलेल्या स्वतंत्र समितीकडून चौकशीची मागणी केली.

हे प्रकरण सातत्याने उपस्थित करीत असल्यामुळे आपल्याला ट्रोल केले जात आहे, आपल्या जिवाला धोकाही निर्माण झाला आहे, मात्र मी घाबरत नाही, माघार घेणार नाही, असे ते म्हणाले.

◀(तभा वृत्तसेवा)

## महाराष्ट्रातून भाजपा आणि रालोआच्या जागा दुपटीने वाढणार

◆ **नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी**
महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्चला निवडणूक होत असून, उमेदवारीसाठी इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. त्यामुळे उमेदवारीची लॉटरी कोणाला लागणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

निवृत्त होणाऱ्या सात सदस्यांत भाजपाच्या दोन, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन, काँगेस, उबाठा तसेच रिपब्लिकन पक्ष आठवले गटाच्या प्रत्येकी एका सदस्याचा समावेश आहे. भाजपाचे डॉ. भागवत कराड, धैर्यशील पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, फौजिया खान, काँग्रेसच्या रजनी पाटील, उबाठाच्या प्रियांका चतुर्वेदी आणि आठवले गटाचे रामदास आठवले यांचा समावेश आहे. मागील निवडणूक आठवले यांनी भाजपाच्या कोट्यातून लढवली होती. संख्याबळाचा विचार करता राज्यातील सातपैकी सहा जागा महायुतीला तर फक्त एक जागा महाविकास आघाडीला मिळू शकते. महायुतीच्या सहापैकी चार जागा भाजपा लढवण्याची शक्यता असून, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला एकेक जागा मिळू शकते. राकाँतून पार्थ पवार यांच्या तर शिवसेनेतून राहुल शेवाळे यांच्या नावाची चर्चा आहे.

भाजपा आपल्या कोट्यातील एक जागा रामदास आठवले यांना देऊ शकते. आठवले केद्रात मंत्रीही आहेत. त्यांचे मंत्रिपद कायम ठेवण्यासाठी त्यांना राज्यसभेवर आणणे आवश्यक आहे.

निवृत्त होणाऱ्या डॉ. भागवत कराड यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता कमी दिसते. धैर्यशील पाटील पोटनिवडणुकीत विजयी झाल्यामुळे त्यांना राज्यसभेचा पूर्ण कार्यकाळ मिळाला नाही. त्यामुळे भाजपा नेतृत्व त्यांच्या नावाचा विचार करू शकते.

महाराष्ट्रातून भाजपाच्या राज्यसभेच्या दोन जागा वाढू शकतात. भाजपाच्या जागा दोनवरून चार होऊ शकतात, तर रालोआच्या जागातही दुपटीने वाढ होत त्या तीनवरून सहावर जाऊ शकतात.

◀(तभा वृत्तसेवा)



केंद्रीय राखीव पोलिस दलाचा स्थापना दिवस शनिवारी साजरा करण्यात आला. यानिमित्त गुवाहाटी येथे मॉक ड्रील करताना सीआरपीएफचे जवान.

## चित्रपट वार्ता

### हॉलिवूड अन् बॉलिवूडमध्येही काम करायचंय प्रियांका चोप्राला



**मुंबई.** कित्येक चाहत्यांच्या गळ्यातील ताईत, बॉलिवूड आणि हॉलिवूड, अशा दोन्ही फिल्म इंडस्ट्रीमध्ये अभिनयाचा ठसा उमटवणारी देसी गर्ल प्रियांका चोप्रा सध्या तिचा आगामी सिनेमा द ब्लफमुळे चर्चेत आली आहे. हॉलिवूड सिनेमाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त असलेल्या प्रियांकाच्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणाऱ्या सिनेमाची प्रेक्षक आतुरतेने प्रतीक्षा करीत आहेत. बऱ्याच वर्षांनी प्रियांका भारतीय सिनेसृष्टीत काम करताना दिसणार असल्याने तिच्या कमबॅकची साऱ्यांनाच उत्सुकता आहे. दरम्यान, मला बॉलिवूड आणि हॉलिवूड, अशा दोन्ही ठिकाणी काम करायला आवडते, असे प्रियांकाने म्हटले आहे. तसेच बॉलिवूड सोडण्याबाबत बोलताना ती म्हणाली की, '' बॉलिवूड सोडण्याची माझी इच्छा नव्हती. हिंदी चित्रपटांमध्ये काम करीत असताना मला अनेक कारणांमुळे मर्यादित असल्यासारखे वाटत होते. त्यामुळे कलाकार म्हणून मला उत्साहित करेल, अशा संधीच्या शोधात मी असताना अमेरिकेत काम करायला प्रारंभ केला. पण, मला देशी-विदेशी अशा दोन्ही चित्रपटसृष्टीत काम करायला आवडते. त्यामुळे मी हॉलिवूड आणि बॉलिवूड यापैकी एक निवडू शकत नाही. आज मी जी काही आहे ती सर्वांसमोर आहे.'' ■

### खुशीवर संतापले नेटकरी

**मुंबई** : कोणत्या न कोणत्या कारणामुळे सोशल मीडियात चर्चेत असणारी अभिनेत्री खुशी मुखर्जी आता वेगळ्याच कारणाने ट्रोल होत आहे. खुशी सोशल मीडियातही प्रचंड सक्रीय असते. नव्या लूकचे फोटो सोशल मीडियात शेअर करत असल्याने नेटकरीही तिच्या मागे लागले असतात. सध्या ती एका व्हिडिओमध्ये ब्लॅक आऊटफिटमध्ये दिसत आहे. तिचा हा नवा अवतार काही नेटकऱ्यांना पसंत न पडल्याने ती प्रचंड ट्रोल होत आहे. अलिकडेच पापाराझींनी तिला मुंबईत टिपले असताना खुशीने ब्लॅक कलर आऊटफिट घातला होता. व्हिडीओ व्हायरल होताच नेटकरी खुशीवर तुटून पडले. कमेंटमध्ये लोकांनी तिच्यावर कारवाईची मागणी केली आहे. मुंबईच्या रस्त्यांवर अश्लील कपडे परिधान करणे चुकीचे असून भविष्यात असे प्रकार करू नये म्हणून कारवाईची गरज असल्याचे नेटकऱ्यांनी म्हटले आहे. खुशीने तामिळ चित्रपटांमधून अभिनयाला प्रारंभ केला आहे. काही हिंदी बी ग्रेड सिनेमांमध्येही ती झळकली आहे. ■



### 'काबिल-२' ची स्क्रिप्ट तयार

**मुंबई** :काबिल २ चित्रपटाची स्क्रिप्ट तयार झाल्याचे बॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक संजय गुप्ता यांनी जाहीर केले आहे. हृतिक रोशन आणि त्यांच्या कुटुंबाकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर लवकरच चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करणार असल्याचे गुप्ता यांनी सांगितले. विशेष म्हणजे संजय गुप्ता हे काबिल चित्रपटाचे दिग्दर्शक आणि लेखकही आहेत. एक दिग्दर्शक आणि लेखक म्हणून ते पूर्णपणे तयार आहेत आणि त्यांच्याकडे काबिल २ ची स्क्रिप्ट पूर्णपणे तयार आहे. जर कुणाला पहिल्या भागाचा सिक्वेल बनवायचा असेल, तर तो पहिल्या भागापेक्षा अधिक चांगला आणि धोकादायक असला पाहिजे जेणेकरून प्रेक्षकांना एक नवीन आणि रोमांचक कथेचा अनुभव मिळू शकेल. २०१७ मधील 'काबिल' चित्रपटात हृतिक रोशनने रोहन भटनागर नावाच्या एका अंध व्यक्तीची भूमिका साकारली होती. पत्नीसोबत झालेल्या अन्यायाचा सूड घेण्यासाठी तो प्रवासाला निघतो. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर १०० कोटींच्या क्लबमध्ये स्थान मिळवले होते. ■

## भाजपा-काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये राडा

**दगड, टोमॅटोचा मारा**

**पोलिसांसह सहा जण जखमी**

◆ **इंदूर, २१ फेब्रुवारी**
राजधानी दिल्लीतील भारत एआय शिखर परिषदेत काँग्रेस कार्यकर्त्यांनी राडा घातल्याच्या निषेधार्थ भाजपा कार्यकर्त्यांनी शनिवारी मध्य प्रदेशच्या इंदूर शहरात काँग्रेस कार्यालयासमोर निदर्शने केली. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी निदर्शने करणाऱ्यांवर दगडफेक केली. यानंतर दोन्ही कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. पोलिसांनी हस्तक्षेप करीत काँग्रेस कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. या घटनेत पोलिसांसह सहा जण जखमी झाले.

#### पोलिस ठाण्याला घातला घेराव

पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आणि दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना मागे हटवले. दंगल नियंत्रण वाहने, वज्र देखील तैनात करण्यात आली. गर्दीला पांगवण्यासाठी पाण्याचा मारा करण्यात आला. या घटनेनंतर, भाजपा कार्यकर्त्यांनी पद्रीनाथ पोलिस ठाण्याला घेराव घातला आणि काँग्रेस सदस्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. ■

काँग्रेस कार्यालय गांधी भवनसमोर भाजपा कार्यकर्ते निदर्शने करीत असताना त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली. यानंतर दोन्ही बाजूंनी घोषणाबाजी आणि दगफेक, टोमॅटो तसेच पाण्याच्या बाटल्यांचा मारा करण्यात आला. समोरासमोर आलेल्या दोन्ही पक्षांच्या निदर्शकांना पोलिसांनी हटवून परिस्थिती नियंत्रणात आणली. दगडफेकीत एक माध्यम प्रतिनिधी आणि एका पोलिस अधिकाऱ्यासह सहा जण जखमी झाले. दगडफेकीत बिंदू चौहान या महिला नेत्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, भाजपा कार्यकर्ते निषेध करण्यासाठी गांधी भवन येथे जमले होते. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या एका गटाने मंत्री विजयवर्गीय यांच्याविरोधात घोषणाबाजी सुरू केली. अचानक दगडफेक सुरू झाली. दोन्ही बाजूंनी दगड, टोमॅटो आणि पाण्याच्या बाटल्या फेकण्यात आल्या.

◀(वृत्तसंस्था)




## एआयच्या मानवकेंद्रित वापराला ८६ देशांचे समर्थन

### अश्विनी वैष्णव यांची माहिती; घोषणापत्रावर स्वाक्षरी, भारताचे यश

◆ **नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी**
राजधानी दिल्ली येथील जागतिक एआय शिखर परिषदेत ८६ देश आणि दोन आंतरराष्ट्रीय संघटनांनी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआयच्या मानवकेंद्रित वापरासंदर्भात घोषणापत्रांवर स्वाक्षरी केली. मानवकेंद्रित एआय च्या दिशेने हे एक ऐतिहासिक पाऊल असल्याची माहिती शनिवारी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रपरिषदेत दिली.



एआय जागतिक परिषदेला जागतिक स्तरावर राजनैतिक आणि तांत्रिक यश मिळाले आहे. ८८ देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी भारताने जारी केलेल्या घोषणापत्रांवर स्वाक्षरी केल्याची माहिती देताना वैष्णव म्हणाले, जगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निश्चित केलेली मानवकेंद्रित एआय संकल्पना स्वीकारली. हे पाऊल जागतिक स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या सुरक्षित, न्याय्य आणि जबाबदार विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. एकूण ८८ स्वाक्षरीकर्त्यांपैकी ८६ देश आणि दोन आंतरराष्ट्रीय संघटनांनी 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय'(सर्वांचे कल्याण, सर्वांचे आनंद) या तत्वाचा औपचारिक स्वीकार केला आहे. या दृष्टिकोनाचे मुख्य उद्दिष्ट एआय संसाधनांचे लोकशाहीकरण करणे आहे, जेणेकरून हे प्रगत तंत्रज्ञान आणि त्याचे आर्थिक फायदे जगभरातील समाजाच्या प्रत्येक वर्गाला उपलब्ध होतील.

◀(वृत्तसंस्था)

#### गुंतवणूकदारांचीही पसंती

जागतिक एआय शिखर परिषदेच्या चार दिवसांच्या काळात जागतिक गुंतवणूकदारांनी एआय पायाभूत सुविधांसाठी भारतात गुंतवणुकीला प्राधान्य दिले. आतापर्यंत २७० अब्ज डॉलर्स गुंतवणुकीचे करार झाले. या कार्यक्रमाने अनेक प्रमुख आघाड्यांवर एआय संबंधित जागतिक धोरणे निश्चित करण्यासाठी अनेक निर्णय झाले. कार्यक्रमात जगभरातील सरकारी धोरणकर्ते, एआय उद्योग तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, तंत्रज्ञान नवोन्मेषक उपस्थित होते. ■

#### सर्व समुदायाला मिळणार एआयचे फायदे

घोषणापत्रात नमूद मुद्यांवर बोलताना वैष्णव म्हणाले, एआय सारख्या क्रांतिकारी तंत्रज्ञानावर आता कोणत्याही एका देशाची किंवा काही टेक कंपन्यांची मक्तेदारी राहणार नाही. ८६ देश आणि संघटनांची ही एकता एआयच्या सुरक्षित विकासासाठी आणि विकसनशील देशांपर्यंत त्याचे आर्थिक फायदे पोहोचवण्याचा मार्ग मोकळा करेल. उद्योग आणि गुंतवणूकदार घोषणापत्राची अंमलबजावणी करण्यावर बारकाईने लक्ष ठेवतील. ■

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# प्रस्तावनेचे नवे पान

उद्या, सोमवारपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईच्या विधान भवनात सुरू होईल. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस प्रथेप्रमाणे मुख्यमंत्री विरोधकांसमवेत चहापानाचा सोहळा आयोजित करतील आणि विरोधकांनी प्रथेप्रमाणे चहापानावर बहिष्कार वगैरे घातला नाही, तर ती आजच्या दिवसाची सर्वात मोठी बातमी ठरेल. कारण मुख्यमंत्र्यांनी चहापानाचा कार्यक्रम आयोजित करावयाचा आणि विरोधकांनी काही कारणे सांगत सरकारवर टीका करून त्यावर बहिष्कार टाकावयाचा, असे गेल्या अनेक वर्षांत सातत्याने दिसत आले आहे. विरोधकांचा बहिष्कार ही बातमी असली, तरी ती आता पुरती गुळगुळीत झाली असून तिचे महत्त्व केवळ दखल घेण्यापुरते राहिले आहे. अशा काळात सामंजस्याने सरकारसोबत अधिवेशन काळात सहकार्य करावे, अनेक प्रश्न सोडविण्यासाठी सरकारला साथ द्यावी आणि राज्याच्या हितासाठी राजकारण बाजूला ठेवून सत्ताधारी व विरोधी पक्ष ही लोकशाहीच्या रथाची दोन चाके असतात, हे दाखवून देण्यासाठी चहापानाच्या कार्यक्रमासाठी हजेरी लावण्यापासून समंजस सुरुवात करावी, असे घडले तर ती मोठी बातमी होईल. आज तसे घडलेच, तर तो एक ऐतिहासिक प्रसंगदेखील ठरेल. त्यामुळे उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाचे रंग नेमके कसे असतील, याचे उत्तर आज संध्याकाळच्या चहापान बैठकीच्या वातावरणातून मिळणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस अधिवेशन काळात सरकार आणि विरोधकांची भूमिका कशी असेल, याचे सर्वसाधारण विश्लेषण करण्याचा माध्यमांचाही प्रघात असतो. दीर्घकाळापासून सुरू असलेल्या या प्रघातानुसार, 'अधिवेशनात सरकारला धारेवर धरण्याची विरोधकांची रणनीती' असाच सहसा मथळा दिसत असला, तरी अलिकडच्या कामकाजाच्या इतिहासात मात्र विरोधकांवर सत्ताधाऱ्यांकडून राजकीय कुरघोडीच केली जात असल्याने विरोधकांची भूमिका हा मोठा औत्सुक्याचा विषय होत चालला आहे. राज्यात सत्ताधारी बाजूला महायुती नावाचे एक संघटित ऐक्य आणि दुसरीकडे महाविकास आघाडी या नावाने एकत्र असूनही परस्परांत फारसा समन्वय नसलेले, राजकीयदृष्ट्या काहीसे संभ्रमित विरोधक असेच चित्र दिसते. अधिवेशनातील भूमिका किंवा राजकीय खेळींमध्येही विरोधकांची दमछाक होत असल्याने, अधिवेशनांबाबत सर्वसामान्य जनतेत अलिकडे फारशी उत्सुकता राहिलेली दिसत नाही.

साधारणपणे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येच्या विश्लेषणात, अधिवेशनामध्ये विरोधक कोणत्या मुद्यावर सरकारला धारेवर धरणार, कोणत्या समस्यांविरोधात आवाज उठविणार आदी बाबींची चर्चा होत असते. उद्यापासून सुरू होत असलेल्या अधिवेशनात, ६ मार्च रोजी २०२६-२७ महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सत्ताग्रहण केल्यानंतरच्या महायुती सरकारच्या वाटचालीत, विकास हा राज्य कारभाराचा परवलीचा मंत्र ठरला आहे. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' ही ग्वाही देणाऱ्या फडणवीस सरकारच्या गेल्या सव्वा वर्षांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात सुधारणा आणि विकासाचे नवे पर्व सुरू झाले. यंदाच्या अर्थसंकल्पात या वाटचालीला वेग देणाऱ्या काही धडाकेबाज योजना अर्थमंत्री या नात्याने खुद्द देवेंद्र फडणवीस जाहीर करतील, ही अपेक्षा साहजिकच व्यक्त होत आहे. राज्याच्या शिरावर सुमारे नऊ लाख कोटींचे कर्ज असल्याचे सांगण्यात येते. आजवर राज्यातील कोणत्याही सरकारने महाराष्ट्रास कर्जमुक्त ठेवलेले नाही. विरोधकांच्या सत्ताकाळातही महाराष्ट्र कर्जाच्या बोझ्याखाली होताच; पण फडणवीस सरकारच्या काळातील कर्जाच्या बोझ्याचे भांडवल करून अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात विरोधक सरकारला घेरण्याची तयारी करीत असल्याचे विश्लेषण नक्कीच माध्यम क्षेत्रात दिसेल. महाराष्ट्रात काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प येऊ घातले आहेत. अगदी अलिकडे तिसरी मुंबई हा महाराष्ट्राचा नवा, झगझगीत चेहरा ठरणारा प्रकल्पही सरकारने घोषित केला आहे. मुंबई वॉटर मेट्रोसारखा एक प्रकल्पदेखील राज्य सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून साकारण्याच्या टप्प्यावर आहे. या प्रकल्पांसाठी मोठी तरतूद हे नव्या अर्थसंकल्पाचे वेगळेपण राहील, असे सांगितले जाते. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेली योजना अनेक कारणांमुळे वादग्रस्त ठरली. अनेक अपात्र लाभार्थींनी या योजनेचा गैरफायदा घेतल्याचे उघड झाल्याने राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडल्याचेही स्पष्ट झाले. एकूणच विकास प्रकल्पांकरिता आवश्यक असलेला निधी आणि राज्याच्या तिजोरीवर 'लाडकी बहीण'सारख्या योजनांमुळे पडणारा ताण यांतून मार्ग काढत विकास प्रकल्प राबविण्याची सरकारची इच्छाशक्ती व वास्तविक स्थिती यांचा मेळ घालण्याचे चातुर्य फडणवीस यांना दाखवावे लागणार असल्याने, अर्थसंकल्पीय अधिवेशनात लाडकी बहीण योजनेच्या सुनियोजित अंमलबजावणीबाबतच्या विवेकी धोरणाचीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतकरी कर्जमाफीबाबतचा अहवाल अद्याप अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत आहे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळणार की काही विशेष पॅकेजची घोषणा होणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

याच अधिवेशनादरम्यान राज्यसभेच्या सात रिक्त जागांकरिता निवडणुका होणार आहेत. विरोधकांचे संख्याबळ घटल्याने, ही निवडणूक मोठी रंगतदार ठरणार असून काही दिग्गज विरोधी नेत्यांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. सत्ताधारी महायुती या निवडणुकीत विरोधकांना धोबीपछाड देणार का, याचीही चर्चा सध्या सुरू आहे. जून २०२२ मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीत त्यावेळी विरोधी पक्षनेता असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी सत्ताधारी आघाडीवर केलेल्या राजकीय कुरघोड्यांची मोठी चर्चा झाली होती. ती केवळ जागांची निवडणूक नव्हती, तर अंकगणित व्यवस्थापन आणि राजकीय रणनीतीचे कौशल्य दाखविणारी लढत ठरली. त्या वेळी राज्यात महाविकास आघाडी सत्तेवर होती. संख्याबळाच्या गणितानुसार, आघाडीचे चार आणि भारतीय जनता पार्टीचे दोन उमेदवार



विजयी होणे अपेक्षित होते. मात्र, सहाव्या जागेसाठी काट्याची लढत झाली आणि फडणवीस यांच्या रणनीतीने महाविकास आघाडीला जेरीस आणले. अपक्ष आणि लहान पक्षांच्या आमदारांशी संपर्क साधून मतांची जुळवाजुळव करत, राजकारणात अंकगणिताच्या पलीकडे व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते हे त्यांच्या रणनीतीने दाखवून दिले. काही आमदारांनी आघाडीच्या अधिकृत उमेदवाराऐवजी भाजपच्या उमेदवारास मत दिल्याचा चर्चा झाली आणि क्रॉस व्होटिंगमुळे निकालाची समीकरणे बदलली. मतदानानंतर काही मतांच्या वैधतेवर भाजपाने आक्षेप घेतला आणि काही मते अवैध ठरल्याने, निकाल भाजपाच्या बाजूने झुकला. भाजपाचा तिसरा उमेदवार विजयी ठरला आणि सत्ताधारी महाविकास आघाडीला अपेक्षित असलेली अतिरिक्त जागा गमवावी लागली. विरोधी पक्षनेते असूनही फडणवीस यांनी सत्ताधाऱ्यांच्या संख्याबळावर मात केली, हा संदेश राज्याच्या राजकारणात गेला आणि सत्ताधारी महाविकास आघाडीवरील या राजकीय कुरघोडीचे पडसाद पुढे झालेल्या विधान परिषद निवडणुकीतही दिसून आले. ही खेळीच पुढे शिवसेना फुटीची राजकीय प्रस्तावना ठरली, असे अनेक विश्लेषक मानतात. हा इतिहास ताजा असताना, संख्याबळाचे अंकगणित आता तर महाविकास आघाडीस कोणत्याही दृष्टीने पोषक नसल्याने सात जागांसाठी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीत पुन्हा एकदा कुरघोडीचा खेळ रंगणार का, ही यंदाच्या अधिवेशनातील सर्वाधिक उत्सुकतेची बाब ठरणार, यात शंका नाही.

महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या इतिहासात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय कलगीतुरा होत असतो. दोन्ही बाजूंचे खेळाडू पट्टीचे व राजकारणात पुरते मुरलेले असल्याने, सरकारला कोंडीत पकडण्याची संधी विरोधक सोडत नाहीत, तर विरोधकांना नामोहरम करण्याची संधी सत्ताधारी हातची जाऊ देत नाहीत. त्यामुळेच गेल्या अनेक अधिवेशनांत राज्याच्या अनेक महत्त्वाच्या समस्या मार्गी लागल्या, अनेक घोटाळ्यांना वाचा फुटली आणि अनेकांचे बुरखेदेखील फाटले. खरे म्हणजे राजकारणात एकमेकांना सांभाळून घेण्याची मानसिकता लपून राहात नाही. 'काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांवर दगडफेक करू नये', असा सल्ला सत्ताधारी किंवा विरोधक एकमेकांना देत असतात. एखाद्या घोटाळा किंवा भ्रष्टाचाराचे लक्तरे चव्हाट्यावर येऊ लागली की त्यापाठोपाठ अनेक घोट्याळ्यांची प्रकरणे समोर येऊ लागतात आणि 'हमाम में सब नंगे' हे वाक्यदेखील आठवू लागते. तरीही अशा प्रकरणांना वाचा फोडण्याचा प्रभावी मंच म्हणून विधिमंडळाचे महत्व आणि या मंचाची जबाबदारी अबाधित राहिली आहे. सन २०१२ च्या सुमारास, जलसंपदा विभागातील कथित अनियमिततेचे प्रकरण विधिमंडळातच गाजले. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर आरोप करीत विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. सत्ताधारी व विरोधकांतील तीव्र राजकीय संघर्ष महाराष्ट्राने अनुभवला आणि चौकशांची चक्रे फिरू लागली. या एकाच प्रकरणाने महाराष्ट्राच्या निवडणुकांचे कथानकच बदलून गेले. 'विकास' विरुद्ध 'भ्रष्टाचार' हे निवडणुकीच्या प्रचाराचे केंद्रस्थानीचे मुद्दे ठरले. ग्रामीण भागात प्रशासनाविरोधातील अविश्वासाची भावना वाढली आणि जनतेचा विश्वास नव्याने संपादन करण्याचे मोठे आव्हान तत्कालीन सरकारपुढे उभे राहिले. त्याआधी सन २०१० च्या सुमारास मुंबईतील आदर्श गृहनिर्माण संस्थेतील भ्रष्टाचाराचे प्रकरणही विधिमंडळाच्या मंचावर उजेडात आले आणि पारदर्शक राज्यकारभाराचा मुद्दा ऐरणीवर आला. शहरी जमिनींच्या वाटप प्रक्रियेस शिस्त लावण्यास भाग पाडणाऱ्या या प्रकरणाने महाराष्ट्राच्या राजकारणातील भविष्यकालीन पडझडीसाठीचे अनेक धक्के देऊन ठेवले. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँकांमधील कथित अनियमिततेची अनेक प्रकरणे विधिमंडळातच गाजली आणि केंद्रीय संस्थांच्या कारवायांचा सपाटा महाराष्ट्रात सुरू झाला. राजकीय सूडभावना आणि भ्रष्टाचारविरोधी लढा अशी दोन टोकाची मते या कारवायांनंतर चर्चिली जाऊ लागली, पण सहकार क्षेत्राच्या शुद्धीकरणाच्या दृष्टीने ही प्रकरणे महत्त्वाची ठरली. सहकार क्षेत्रातील शासन-प्रशासन व्यवस्थेस शिस्त लावण्याच्या देशव्यापी प्रक्रियेची सुरुवात झाली. राजकीय पक्षांतील फाटाफूट, राज्यातील उद्योगांचे स्थलांतर, राजकीय वरदहस्त लाभलेल्या नेत्यांची खंडणीखोरी, असे अनेक मुद्दे महाराष्ट्र विधिमंडळाच्या याच मंचावरून उजेडात आले आहेत.

हा इतिहास मोठा आहे. त्याचे एकत्रित राजकीय व सामाजिक परिणामदेखील राज्याच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचे ठरले आहेत. काही घटनांमुळे व्यक्तिकेंद्री राजकारणासमोर आरसा धरला गेला, काही घटनांमुळे राज्यपाल, सभापती, न्यायालये यांच्या भूमिकांवर चर्चा झडल्या, स्थैर्य आणि सत्तेतील सहभाग या बाबी तात्त्विक भूमिकांपेक्षा मोठे असल्याचे राजकीय वास्तवही याच मंचामुळे स्पष्ट झाले तर आरक्षण, सहकार, प्रादेशिक असमतोलासारख्या मुद्द्यांवर तोडगा काढण्यातही याच मंचाने महत्त्वाची भूमिका पार पाडली. महाराष्ट्राची राजकीय परंपरा सहकार, प्रादेशिक संतुलन आणि वैचारिक बहुविधतेवरच आधारलेली आहे. परंतु गेल्या दोन-चार दशकांत विधिमंडळातील आरोप-प्रत्यारोप, सत्तास्पर्धेतील नाट्यमय व अनेकदा अनाकलनीय वाटणाऱ्या घडामोडी, पक्षफुटी अशा अनेक कारणांमुळे राजकारणासही वेगळी वळणे मिळत गेली. या काळात केवळ सत्तांतराचा, सत्तेच्या समीकरणांचा किंवा आरोप-प्रत्यारोपांचा प्रश्न नव्हता, तर तो संस्थात्मक स्थैर्य, नैतिकता आणि समाजमानसातील बदलाच्या प्रक्रियेस कोणती दिशा मिळते, हा प्रश्न महत्त्वाचा ठरला होता. म्हणूनच यात विधिमंडळाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. मंत्रिपदावरील नैतिक दडपण, चौकशी यंत्रणांवर जनतेचे खिळलेले लक्ष आणि समाजातील जागरूकता हे त्याचे सकारात्मक परिणाम ठरले. काही प्रकरणांमुळे, ग्रामीण विकासाच्या परंपरागत कथानकाला धक्के बसले, निवडणुकांतील पठडीबाज प्रचाराचा बाज बदलत गेला आणि प्रशासनास जनतेचा विश्वास संपादन करण्याचे आव्हान पेलावे लागले. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या विधिमंडळातील आरोप-प्रत्यारोप हे केवळ व्यक्ती वा पक्षापुरते मर्यादित राहिले नाहीत. त्यांनी राज्याच्या राजकीय संस्कृतीलाही नवी वळणे आणि नवा आकार दिल्याचे दिसते. या प्रक्रियेतून कधी ध्रुवीकरण वाढले, तर कधी संस्थात्मक प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित झाले. पुढील काळात राजकारणातील स्थैर्य, पारदर्शकता आणि सामाजिक सलोखा ही मूल्ये जपली जातील की आरोप-प्रत्यारोपांची परंपरा तीव्र होईल, असा प्रश्न वाटण्याच्या टप्प्यावर आजचे राजकारण थांबले आहे. कारण अनेक प्रश्नांवर सरकार आणि विरोधक यांच्या भूमिकांमध्ये परस्पर विरोध दिसतो. सामंजस्याचा अभाव असेल तर प्रश्न सुटण्याऐवजी बिकट होतात. त्यामुळे प्रत्यक्ष कार्यवाहीचा वेग किंवा परिणामदेखील थंडावतात, असेही दिसून आले आहे. सामाजिक आरक्षणाबाबत सरकारची भूमिका आणि विरोधकांचे मुद्दे हे दाखल्यादाखल सांगता येतील. सामाजिक तणावाच्या वातावरणात असे काही मुद्दे भर घालतात, असेही दिसून आले आणि आरक्षणासारखे प्रश्न केवळ कायदेशीर नव्हे, तर सामाजिक संतुलनाचे प्रश्न ठरतात, हे स्पष्ट झाले. आरोग्य, शिक्षण, उद्योग, पायाभूत सुविधा आदी मुद्द्यांवर सरकार आणि विरोधकांमध्ये सहकार्य असेल तर या क्षेत्रांचा विकास वेग घेतो. वेदान्त-फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्याच्या त्या वादानंतर, राज्य सरकारवर ठपका ठेवत विरोधक आक्रमक झाले, पण त्यानंतर राज्यात विदेशी गुंतवणुकीसाठी फडणवीस सरकारने कंबर कसली. आज महाराष्ट्र हे परकी गुंतवणूकदारांच्या पहिल्या पसंतीचे राज्य ठरले आहे. राज्याराज्यांतील औद्योगिक विकासाच्या सुदृढ स्पर्धेस त्यामुळे चालना मिळाली आहे. अशा स्पर्धेतून रोजगार निर्मितीलाही चालना मिळेल आणि रोजगारांची दीर्घकालीन समस्या सुटेल, असे आशादायक चित्र आज दिसू लागले आहे. अलिकडेच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्यातील जनतेने सत्ताधारी महाविकास आघाडीला दिलेला कौल हा त्याचाच सकारात्मक परिणाम असू शकतो. म्हणूनच विधिमंडळात जन्म घेणारा मुद्दा हा परिवर्तनाच्या नव्या कहाणीच्या प्रस्तावनेचे नवे पान असतो. या कहाणीचे कथानक कसे लिहावयाचे ते सामंजस्याने ठरले पाहिजे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### पीक विमा योजना - काही प्रश्न

अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट यांच्या तडाख्यात वारंवार उद्ध्वस्त होणाऱ्या शेतकऱ्यांना एक भक्कम सुरक्षा कवच म्हणून मोदी सरकारने फेब्रुवारी २०१६ मध्ये प्रधानमंत्री फसल बीमा योजना अर्थात पीएमएफबीवाय सुरू केली होती. या योजनेला १० वर्षे पूर्ण होत आहेत. आता ही योजना विमा कंपन्यांसाठी नफ्याची खाण बनली आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ तीन वर्षांच्या कालावधीत विमा कंपन्यांनी प्रीमियमच्या रूपाने तब्बल ८२,०१५ कोटी रुपये जमा केले. याच काळात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून केवळ ३४,७९९ कोटी रुपये मिळाले. म्हणजेच विमा कंपन्यांनी ४७,००० कोटी रुपयांहून अधिक निव्वळ नफा कमावला. हरयाणामधील काही भागांत शेतकऱ्यांनी आपले विमा दावे नाकारले जात असल्याबद्दल आणि त्यात होणाऱ्या दीर्घ विलंबाच्या विरोधात धरणे आंदोलने केली. एकीकडे शेतकऱ्याचे पीक बुडालेले असते, संसार उघड्यावर पडलेला असतो; दुसरीकडे विमा कंपनीचे प्रतिनिधी कागदपत्रांच्या चक्रव्यूहात त्याला अडकवून ठेवतात. ज्या योजनेत भ्रष्टाचाराचे आरोप होतात, त्या योजनेचा लाभ खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत किती प्रमाणात पोहोचत असेल, याची कल्पना करणेही कठीण आहे. या पृष्ठभूमीवर योजनेच्या तंत्रज्ञान वापराबद्दल मात्र सकारात्मक बोलता येईल. उपग्रह छायाचित्रण, ड्रोन तंत्रज्ञान आणि संगणकीय उत्पादन अंदाज प्रणाली यांचा वापर करण्याचा प्रयत्न या योजनेत झाला आहे. ८४.८ कोटी शेतकऱ्यांसाठी डिजिटल ओळखपत्र, भौगोलिक संदर्भावर आधारित पीक सर्वेक्षण आणि थेट लाभ हस्तांतरण यासारखे उपाय पारदर्शकता आणण्यास मदत करू शकतात. रिझर्व्ह बँकेने किसान क्रेडिट कार्ड योजनेत प्रस्तावित केलेला सुधार म्हणजे पीक चक्राशी कर्जाची मुदत जोडणे हे स्वागतार्ह पाऊल आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून थेट लाभ हस्तांतरण करणे, कर्ज मिळविणे सोपे करणे या गोष्टी उपयुक्त आहेत. सध्याच्या शेती पद्धतीमुळे जागतिक नायट्रोजनचे प्रमाण सुरक्षित मर्यादेच्या दुप्पटीहून अधिक झाले आहे. हे केवळ पर्यावरणाची समस्या नाही तर येणाऱ्या पिढ्यांच्या जगण्याचा प्रश्न आहे. भारताच्या संदर्भात हा अहवाल सांगतो की इथे अजूनही धान्यावर आधारित आहार प्रचलित आहे आणि २०५० पर्यंत शाश्वत खाद्य सुरक्षा सुनिश्चित करायची असेल तर अधिक भाज्या, फळे, सुकामेवा आणि शेंगांचा समावेश आहारात वाढवावा लागेल.

परंतु यामुळे अनेक खाद्यपदार्थांच्या किमती वाढू शकतात आणि आधीच आर्थिक ताणाखाली असलेल्या सामान्य कुटुंबांना हे परवडणे कठीण आहे. शिवाय आहार बदल नेहमीच साध्य नसतो. भूजलाचा बेसुमार उपसा रोखणे, जमिनीची होणारी धूप थांबवणे आणि शेतीतील जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणे या गोष्टींशिवाय दीर्घकालीन शाश्वत शेती शक्य नाही. पीएमएफबीवाय या योजनेतील सुधारणांबद्दल बोलायचे तर सर्वप्रथम विमा कंपन्यांच्या कामगिरीवर कडक आणि पारदर्शक अंकेक्षण होणे आवश्यक आहे. प्रीमियम आणि दाव्यांचे प्रमाण वाजवी राखण्यासाठी नियामक चौकट अधिक भक्कम करायला हवी. विमा क्षेत्रात निष्पक्ष स्पर्धा सुनिश्चित केली तर शेतकऱ्याला अधिक फायदा होऊ शकतो. दाव्यांचे जलद निपटारे होणे ही तर सर्वात महत्त्वाची गरज आहे. शेतकऱ्याचे नुकसान झाल्यावर त्याला ताबडतोब भरपाई मिळायला हवी. या प्रक्रियेत स्वतः शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे अत्यावश्यक आहे. तसे झाले तरच या देशाचा अन्नदाता खऱ्या अर्थाने सुरक्षित होईल आणि त्याचे जगणे सन्मानाचे होईल.

**विकास परसराम मेश्राम**/७८७५५९२८००

### सूक्ष्म सूत्रात हितोपदेश

संस्कृत भाषेचे सौंदर्य आगळेच आहे. अत्यंत अल्प शब्दांत मोठा आशय व्यक्त करणारी भाषा असल्याने आचार्यांनी अनेक उक्ती उपदेशात्मक केल्या आहेत. स्थान आणि भ्रष्टता यासाठी उपयोगात आणलेले उदाहरण बरेच सूचक आहे.

सूत्रः- स्थानं भ्रष्ठाते नखः नरः केशः

रचनाकारांनी भ्रष्ट या शब्दाचा द्वयर्थी उपयोग केला आहे. भ्रष्ट म्हणजे स्थान सोडणे, स्थानापासून विलग होणे, काढून टाकणे किंवा पदच्युत होणे इत्यादी अर्थ अभिप्रेत आहेत. दुसरा अर्थ सध्या बराच प्रचलित असून नैतिक मूल्यांना सारून व्यवहार करणे, अधिकाराचा गैरवापर करून धन स्वीकारणे असा आहे. आपल्या हात-पायांच्या दोन बोटांच्या अग्रस्थानी नखे असतात. बोटांचे कवच असल्याने दुखापती पासून संरक्षण व्हावे म्हणून शरीरातील अस्थी धातूपासून तयार झालेली नखे बोटांना मजबुती देतात. नखे बेढब वाढली असतील, त्यात मळ साचला असेल तर हात विद्रूप दिसतात. स्त्रिया या नखांद्वारे बोटांचे सौंदर्य खुलवण्यासाठी विशेष काळजी घेतात. विशिष्ट आकार आणि रंग दिल्याने त्यांच्या सौंदर्यात भर पडते. हीच नखे बोटांपासून विलग केली तर ती टाकावीच लागतात तसेच आपल्या डोक्यावर असलेल्या काळ्याशार केसांमुळे व्यक्तिमत्त्व खुलते, आकर्षक होते. पुरुषापेक्षा स्त्रिया या केसांच्या बाबतीत खूपच हळव्या आणि संवेदनशील असतात. हे केस जोपर्यंत डोक्यावर त्यांचे स्थानी व्यवस्थित आहेत पर्यंतच त्यांचे सौंदर्य किंवा किंमत आहे. एकदा या केसांनी त्यांची जागा म्हणजे डोकं सोडले किंवा गळून पडले तर त्या केसाला कवडीची ही किंमत राहत नाही. असेच मनुष्याचेही आहे. येथे स्थान म्हणजे पद असे अपेक्षित आहे. मनुष्य त्यांचे कार्यकालात ज्या पदावर आहे; मग ते शासकीय, खाजगी, सार्वजनिक किंवा राजकारणात असो तोपर्यंतच त्यास महत्त्व किंवा किंमत आहे. एकदा त्याने स्थान सोडले किंवा त्यास पदच्युत केले गेले तर त्यास महत्त्व राहत नाही, असा जगरहाटीचा संकेत आहे. सूत्रकारांनी सूक्ष्म चिंतनातून व्यावहारिक स्थूल विचार स्पष्ट करून प्रत्येक स्थानाची निगा ठेवणे त्यांचे महत्त्व व पावित्र्य जपणे किती महत्त्वाचे आहे हे सांगितले आहे. मनुष्याला मिळालेले स्थान भ्रष्ट होऊ नये, तो पदच्युत होऊ नये म्हणून हे सूत्र ध्यानात ठेवणे महत्त्वाचे आहे.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

### अल्पवयीन ड्रायव्हिंग : पालकांचा 'रुबाब' की निष्पापांचा 'काळ!'



सद्यस्थितीत शाळा-महाविद्यालयांत जाणारी अल्पवयीन मुले रस्त्यांवर दुचाकी आणि चारचाकी वाहने सुसाट वेगाने दामटताना दिसतात. वाहतूक अधिनियमानुसार १८ वर्षांखालील मुलांना वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही, पालकांच्या मूक संमतीने ही मुले रस्त्यावर मृत्यूचे तांडव घडवत आहेत. अलिकडच्या काळात पुणे, दिल्ली आणि बंगळुरूमध्ये घडलेल्या भीषण अपघातांनी समाजाच्या संवेदनशीलतेवर आणि न्यायव्यवस्थेच्या भूमिकेवर झणझणीत अंजन घातले आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील कल्याणीनगर भागात एका प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत, आपली आलिशान 'पोर्शे' कार भरधाव दामटत एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोन तरुण अभियंत्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण देश हादरला. असाच एक संतापजनक प्रकार पश्चिम दिल्लीतील द्वारका भागात घडला. एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने चालविलेल्या महिंद्राच्या स्कॉर्पिओ कारने एका मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात अवघ्या २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. हा तरुण त्याच्या कुटुंबाचा एकमेव आधार होता; त्याचे वडील आधीच वारले होते आणि आता त्याच्या आईने कोणाच्या जिवावर जगावे, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. बंगळुरूच्या होसकोटे-डोब्बासपेट रिंग रोडवर झालेला अपघात तर काळजाचा थरकाप उडवणारा होता. एका १७ वर्षीय मुलाने चालवलेली कार ताशी १५०-१६० किमी वेगाने धावत होती. वेगावर नियंत्रण न राहिल्याने कार डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेला गेली आणि ट्रक व दुचाकीला धडकली. या भीषण अपघातात कारमधील सहा विद्यार्थ्यांचा जागीच अंत झाला.

या सर्व घटनांमध्ये एक समान दुवा आहे; तो म्हणजे 'पालकांचे अक्षम्य दुर्लक्ष'. मोटार वाहन कायद्यानुसार, अल्पवयीन मुलाने गुन्हा केल्यास पालकांना २५,००० रुपये दंड आणि ३ वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद आहे तसेच वयाची २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्या मुलाला परवाना नाकारला जातो. मात्र, केवळ कागदावरचे कायदे रस्ते सुरक्षित करू शकत नाहीत. मुलाला महागडी गाडी देणे हे प्रेमाचे लक्षण नसून ते एक प्रकारे त्याला गुन्हेगारीच्या खाईत ढकलणे आहे. वेगाच्या नशेपेक्षा जिवाचे मोल मोठे आहे, हे मुलांना पटवून देणे ही काळाची गरज आहे. रस्त्यावर धावणारी ही वाहने नसून चालते-फिरते 'मृत्यूचे सापळे' बनले आहेत. जर पालकांनी वेळीच आवर घातला नाही आणि न्याय व्यवस्थेने अशा प्रकरणांत कठोर भूमिका घेतली नाही, तर हे सुसाट वेग अनेकांचा बळी घेत राहतील. या अल्पवयीन चालकांवर आणि त्यांच्या पालकांवर कोणताही मुलाहिजा न ठेवता कडक कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित आहे.

**अविनाश देशपांडे** /९४२२९५०७५०

### वर्धा रोड महामार्गावरील फाट्यांवर गंभीर अपघाताचा धोका

महामार्गांवर तसेच शहरांत रस्ता दुभाजकांवर सौंदर्यीकरणासाठी झाडे लावण्यात आलेली आहेत. हा सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक विभागाचा हा एक स्तुत्य उपक्रम आहे. यामुळे शहराचे सौंदर्य खुलते यात शंकाच नाही, परंतु हीच झाडे अपघातासाठी कारणीभूत, जीवघेणी ठरू नयेत म्हणून ही सूचना व नम्र विनंती.

महामार्गावरील पांजरी (हॉटेल ले मेरिडियनजवळील) फाट्यावर गंभीर अपघाताचा धोका निर्माण झालेला आहे. पांजरी गावाकडून वर्धा रोडवरील फाट्यावर नागपूरकडे वळण घेताना विरुद्ध दिशेने म्हणजे वर्धेकडून येणारी भरधाव वाहने तेथील रस्ता दुभाजकांवर सौंदर्यीकरणासाठी लावण्यात आलेल्या झाडांमुळे अजिबात दिसत नाहीत. त्यामुळे वळण घेताना वर्धेकडून येणारी भरधाव वाहने वळण घेणाऱ्या वाहनावर भरवेगात आदळण्याचा धोका निर्माण झालेला आहे. चौक नसल्यामुळे तेथे ट्रॅफिक सिग्नल नाहीत. तेथे या आधीही अपघात झालेला आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक विभागाला विनंती आहे की, त्यांनी येथील दुभाजकावरील सौंदर्यीकरणासाठी लावण्यात आलेली दोन्ही बाजूकडील झाडे किमान १०० मीटरपर्यंत काढून टाकण्यात यावी तसेच तेथे कसलेली जाहिरातींचे फलक लावण्यात येऊ नये; जेणेकडून वळण घेताना दोन्ही बाजूंनी येणाऱ्या गाड्या किमान १०० मीटरपर्यंत तरी दिसतील आणि गंभीर अपघाताचा धोका टळेल. रात्रीच्या वेळेला अंधारात हा धोका प्रामुख्याने जाणवतो. प्रत्येक फाट्यावर प्रखर दिव्याची व्यवस्था करण्यात यावी. कुठल्याही महामार्गावरील प्रत्येक फाट्यावर, चौकांत, किमान १०० मीटरपर्यंत सौंदर्यीकरणासाठी झाडे लावण्यात येऊ नये. लावलेली झाडे किमान १०० मीटर पर्यंत काढून टाकण्यात यावीत. शहरांतही हा नियम पाळण्यात यावा. शहरात प्रत्येक फाट्यावर, चौकांत किमान ५० मीटरपर्यंत झाडे काढून टाकण्यात यावीत व भविष्यात लावली जाणार नाहीत, याची काळजी घेण्यात यावी. सौंदर्यीकरणासाठी लावण्यात आलेली झाडे कुठल्याही अपघातासाठी कारणीभूत ठरू नयेत एवढीच सार्वजनिक बांधकाम विभाग व वाहतूक विभागाकडून रास्त अपेक्षा आहे.

**मोरेश्वर दिगंबर बेलसरे** /९८९०६६४६६१

### 'वन्दे मातरम'ची १५० वर्षे

सध्या वंदे मातरम गीताचा १५० वर्षसोहळा सुरू आहे. त्यानिमित्ताने केंद्र-राज्य सरकार यांना विनंती आहे की, आपण ज्याप्रमाणे घरोघरी श्री सत्यनारायण, श्री सत्यविनायक, श्री सत्यअम्बा, श्री सत्य मारुती, श्री वरद शंकर अशा अनेक पूजा करतो त्याचप्रमाणे पां. कृ. सावळापूरकर रचित भारतमाता पूजा आहे; तीसुद्धा मोठमोठ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून झाली तर वंदे मातरम गीताबद्दल जो मुस्लिम समाजात गैरसमज आहे तो दूर होण्यास मदत होईल म्हणूनच त्यासाठी सरकारच्या माध्यमातून ती पोथी अल्प किमतीत प्रकाशित करून प्रसारित करावी.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७



### 'जय जिजाऊ जय शिवराय'

शिवजयंतीनिमित्त अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. अनेक तरुणांनी आपल्या मोटारसायकलला शिवरायांचे झेंडे लावले होते. वरवर पाहता खरंच तरुणांमध्ये शिवभक्ती ओसंडून वाहत आहे, असे दृश्य होते. संध्याकाळी मी माझ्या मुलाला गाडीवर घेऊन जात असताना पेट्रोल पंपवर थांबले. दोन तरुण मुलीही बाजूच्या रांगेत पेट्रोल भरण्यासाठी उभ्या होत्या. तितक्यात शिवाजी महाराजांचा झेंडा मोटारसायकलला लावलेले दोन तरुण मुलं तिथे आले आणि त्या मुलींकडे पाहून वाहनाचा हॉर्न वाजवणे, हसणे अशा कृती करू लागले. माझ्या जिवाचा संताप झाला. पुढे एका घरी कामानिमित्त गेली असता त्या घराच्या अंगणात एक छोटं कॅफे होतं. बाहेर एक शिवाजी महाराजांचा झेंडा लावलेली गाडी पार्क केली होती. अंगणात जाताच तिथे चार-पाच तरुण मुलं-मुली गळ्यात गळे घालून थिल्लर चाळे करीत होते. आता मात्र हे पाहून मन अधिकच खिन्न झालं. शिवाजी महाराजांचा झेंडा लावून फिरायची तरी यांची पात्रता आहे का? यांना म पासून मावळे माहीतच नाहीत. यांना म म्हणजे मस्ती, माज, मद्य याच गोष्टी माहीत आहेत. दोष फक्त त्यांचाच नाही तर पालकांचाही तेवढाच दोष आहे. आम्ही नोकऱ्या करू, घर चालवू की मुलांच्या मागे फिरू, हे पालकांचे ठरलेले वक्तव्य. अगदी बरोबर आहे. पण मुलांना नको त्या वयात महागड्या वस्तू, मोबाईल, बाईक्स न देणे हे तर पालकांच्या हातात आहे. अति लाडामुळे आणि सतत त्यांना एका संरक्षणाखाली ठेवल्यामुळे मुलं मनाने इतकी कमकुवत झाली आहे की, त्यांना रागावण्याचा हक्कही आई-वडील गमावून बसले आहेत. नाही तर हे पोरं घर सोडून जाणार, आत्महत्येचा प्रयत्न करणार इतकी टुकार पिढी आपणच बनवत आहोत. आपण खूप आदर्श पालक जरी बनू शकत नाही तरी आपल्या पाल्यांना किमान स्वत:साठी करीअर करीत असताना सामाजिक जाणीव, सामाजिक कार्य, स्वरक्षण, स्त्रियांचा मान राखणे आदी गोष्टी निश्चित शिकवू शकतो. सतत मुलांना संरक्षण न देता त्यांचा बाहेरच्या जगात स्वबळावर काहीतरी चांगलं मिळविण्याची ताकद द्या, कठीण परिस्थितीवर मात करून यश मिळविण्याची शिकवण द्या, तेव्हा एक सशक्त पिढी पुढे येईल. आयत्या मिळालेल्या स्वराज्याची किंमत ठेवा आणि मनामनांत, आपल्या कृतीत शिवाजी महाराज, जिजाऊ, मावळे ठेवा. तेव्हाच खऱ्या अर्थाने 'जय जिजाऊ जय शिवराय' या आपल्या घोषाला पूर्णत्व आणि खरा अर्थ प्राप्त होईल.

**प्रांजली र. भिवापूरकर**

### हरवत चाललेली वाडा संस्कृती

शहर केवळ रस्त्यांनी, पुलांनी आणि उंच इमारतींनी बनलेले नाही, ते आठवणींनी, परंपरांनी आणि वास्तूंनी विणलेले आहे. त्या वास्तूंमध्ये सर्वात जिव्हाळ्याची, बोलकी आणि भावनिक नाळ जुळलेली रचना म्हणजे 'वाडा.' आजही जुन्या वाड्याच्या भग्न भिंतींकडे पाहिले की इतिहासाचे ठसे जाणवतात. वाड्यांच्या सावल्यांत उभं राहिलं की काळ मागे फिरतो. पण हा काळाचा प्रवाह जसजसा वेग घेतो आहे, तसतशी 'वाडा' संस्कृती हळूहळू धूसर होत चालली आहे. वाडा म्हणजे केवळ घर नव्हे, तो एक जगण्याचा मार्ग होता. चौकातले तुळशीवृंदावन, सकाळच्या काकड आरतीचा नाद, अंगणात खेळणारी लेकरं,



ओसरीवर बसून चालणाऱ्या गप्पा आणि माजघरातल्या सण-समारंभांची लगबग, हे सगळं मिळून 'वाडा' तयार होत असे. वाडा संस्कृती पेशवाईच्या काळात फुलली. राजकारण, प्रशासन, शिक्षण आणि कला या सर्वांचे केंद्र वाड्यांभोवतीच फिरत होते. वाडा हा सत्तेचा, संस्कृतीचा आणि समाजजीवनाचा केंद्रबिंदू होता. वाडा ही पर्यावरणाशी सुसंवादी रचना होती. लाकूड, दगड, माती, चुन्याचा गिलावा, या नैसर्गिक साहित्यांचा वापर करून उभारलेले हे बांधकाम उन्हाळ्यात गार आणि हिवाळ्यात उबदार असे. पावसाचे पाणी साठवण्याची सोय, नैसर्गिक प्रकाशाचा योग्य वापर, वाऱ्याची खेळती दिशा हे सगळं शास्त्रीय पद्धतीने आखलेलं असे. आज 'सस्टेनेबल आर्किटेक्चर' म्हणून ज्या संकल्पना मांडल्या जातात, त्या आपल्या वाड्यांत काही शतकांपूर्वी जगल्या गेल्या होत्या. बदल हा निसर्गाचा नियम आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे शहराचा चेहरा बदलू लागला. वाड्यांच्या जागी अपार्टमेंट्स उभी राहू लागली. अंगण हरवले, चौक बुजले, ओसऱ्या बंद झाल्या. माणसं शेजाऱ्यांच्या खिडकीतून डोकावण्याऐवजी लिफ्टमध्ये नजरा चुकवू लागली. वाड्यांतल्या सामूहिकतेची जागा वैयक्तिकतेने घेतली. एकेकाळी सण-उत्सवांनी गजबजणारे चौक आता सिमेंटच्या भिंतींत कैद झाले. प्रश्न असा आहे की, आपण काय गमावत आहोत? वाडा पाडताना आपण केवळ एक रचना पाडत नाही, आपण एक संस्कृती, एक जीवन पद्धती, एक भावविश्व नष्ट करत असतो. वाड्यांच्या ओसऱ्यांवरूनच सामाजिक संवादाची परंपरा रुजली. तिथेच कीर्तनं झाली, तिथेच वाचन संस्कृती वाढली, तिथेच मुलांना संस्कार मिळाले. वाडा हा एक शाळा होता, एक रंगमंच होता, एक मंदिर होता. आजही काही वाडे शिल्लक आहेत. त्यांच्या भिंतींवर काळाचे ओरखडे आहेत, त्या अजूनही उभ्या आहेत, जणू सांगत आहेत, 'आम्हाला वाचवा.' वाडा म्हणजे भूतकाळाची केवळ आठवण नाही, तो भविष्याचा मार्गदर्शकही आहे. पर्यावरणपूरक बांधकाम, सामूहिक जीवनशैली, सांस्कृतिक एकात्मता, या मूल्यांची गरज आज अधिक आहे. आधुनिक वास्तूंमध्येही वाड्यांच्या संकल्पना समाविष्ट करता येऊ शकतात. मध्यवर्ती चौक, नैसर्गिक प्रकाश, शेजारधर्म, या गोष्टी नव्या रूपात पुन्हा जिवंत होऊ शकतात. वाडा संस्कृती हरवली तर शहर उरेल, पण आत्मा हरवेल.

**विलास कोळी**/ ९७६३०८४४९९

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीव्दारे कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन :- डि।। व सब डि।। सोलापुर पैकी तालुका सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपलिका हद्दीतील रविवार पेठ येथील यांसी सिटी सर्व्हे नं. ९६९७, फायनल प्लॉट नं. ८/२ ब याचे एकुण क्षेत्र ४९९८.३० चौरस मीटर इतकी असून यामध्ये पाडण्यात आलेल्या लक्ष्मीनारायण नगर मधील प्लॉट नं. ४ (सिटी सर्व्हे उताऱ्याप्रमाणे सिसनं. ९६९७/८/२ब/४) यांसी हद्द पूर्वपश्चिम १४.६३ मीटर व दक्षिणोत्तर ७.२३ मीटर असे एकुण क्षेत्र १०५.७७ चौरस मीटर अथवा ११३८.०८ चौरस फुट इतकी आहे. यासी सोमपा मिळकत नं. १३३९८६ असा आहे. सदर संपूर्ण मिळकत हि खुली आहे. यांसी चतुसिमाः पुर्वेसः मंजुर लेआऊट मधील ९ मीटर रस्ता, पश्चिमेसः फायनल प्लॉट नं. ८ पैकी मार्केट यार्डची जागा, दक्षिणेस : प्लॉट नं. ३. उत्तरेस : प्लॉट नं. ५. येणेप्रमाणे हि प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे इतर सर्व तद्‌गभुत वस्तुसहची व वहिवाटीसहची मिळकत हि वाणी वेणुगोपाल ताडुर रा. किराणा बाजार रोड, कलबुर्गी, कर्नाटक, हल्ली मुक्काम सोलापूर यांची मालकी व कब्जेवहिवाटीची असुन सदर मिळकत हि आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरवुन काही रक्कम स्विकारुन तसा इसारा पावती व करारपत्र दस्त लिहुन दिलेला आहे.

तरी वर नमुद मिळकतींवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, लिन, पोटगी, टाच, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, इसारा पावती, साठेखत, करारपत्र, खरेदीखत व कोर्ट केसेस, स्टे अथवा इतर न्यायालयीन वाद, वहिवाटीचे वादाबाबत वगैरे कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर हि जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ (सात) दिवसाचे आत खालील नमुद विधिज्ञ पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी आपले हरकती किंवा तक्रारी नोंदवावी. मुदतीत कोणाचेही तक्रार किंवा हरकती न आल्यास आमचे अशिल पुढील खरेदीचे व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर कोणाचेही तक्रार अगर हरकत आल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तरी कोणाचेही फसगत होऊ नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली असे ता- २१/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. किरण सुरेश कटकुर**
**ॲड. सोनाली कटकुर-चव्हाण**
मो. नं. ८८५७९२२९०२/८६६९०४००४५
ऑ. ३४/२/७२, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर
अशिल : उल्हास धानप्पा पटणे

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १६१/२०२५

१. सुरेश मधुकर कल्याणी — **अर्जदार**
रा. वसंत बुक डेपो समोर खानापूर रोड बार्शी ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकीलसचिन एस कोकाटे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अजर्जदाराची आई प्रभावती मधुकर कल्याणी, रा. वसंत बुक डेपो समोर खानापूर रोड बार्शी ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आई प्रभावती मधुकर कल्याणी यांचा दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर — **-- अर्जदार/वादी**

**विरुध्द**

रावसाहेब रामचंद्र देशमुख वगैरे — **-- जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १५७/२०२५ | १) रावसाहेब रामचंद्र देशमुख, वय-६०, धंदा-शेती व किराणा दुकान, रा.तांबवे गावठाण ता. माढा जि.सोलापूर | १,४७,२५४ | १३/०३/२०२६ |
| २ | १५७/२०२५ | २) अविनाश रावसाहेब देशमुख, वय-४५, धंदा-शेती व किराणा दुकान, रा. तांबवे गावठाण ता. माढा जि. सोलापूर | १,४७,२५४ | १३/०३/२०२६ |
| ३ | १५७/२०२५ | ३) संदिप महादेव गुरव, वय ३०, धंदा-शेती, रा. दहीवली गावठाण ता. माढा जि. सोलापूर | १,४७,२५४ | १३/०३/२०२६ |
| ४ | १५७/२०२५ | ४) छगन बब्रुवान बारबोले, वय-३०, धंदा-शेती, रा. दहीवली गावठाण ता. माढा जि. सोलापूर | १,४७,२५४ | १३/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. १ ते ४** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ ते ४ यांचा नोटीस बजावणीचा रिपोर्ट आलेला नाही** या कारणाने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक १३/०३/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर — **-- अर्जदार/वादी**

**विरुध्द**

रमेश कृष्णात पाटील वगैरे — **-- जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १४८/२०२५ | १) रमेश कृष्णात पाटील, वय-५०, धंदा-शेती, रा.पाटील बाग, उजनी (टें) ता. माढा जि. सोलापूर | ११,४८,०९७ | १३/०३/२०२६ |
| २ | १४८/२०२५ | २) विलास नामदेव अनपट, वय-७३, धंदा-शेती, रा. अनपट वस्ती, बेंबळे ता. माढा जि. सोलापूर | ११,४८,०९७ | १३/०३/२०२६ |
| ३ | १४८/२०२५ | ३) योगेश विष्णूपंत भोसले, वय-३८, धंदा-शेती, रा. भोसले वस्ती, बेंबळे ता. माढा जि. सोलापूर | ११,४८,०९७ | १३/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. १ ते ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ व २ चे नोटीस बजावणीचा रिपोर्ट आलेला नाही व नं. ३ ची नोटीस घेण्यास नकार** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक १३/०३/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका **शहर हद्दीतील पेठ बापुजी नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर** या नावाने ओळखले जाणाऱ्या नगरातील ब्लॉक नं. ५४ मधील घर नं. ३२० ही मिळकत घरजागा असून यांसी एकूण जागेचे क्षेत्र ५०० चौ. फुट इतके असून याल १२ × १४ फुटाची एक वीट मातीने बांधकाम करून वरती पत्रे घातलेली एक खोली व १२ × १४ फुटाचे वीट, वाळू, सिमेंट मध्ये बांधुन वरती स्लॅब घातलेली एक खोली असे एकूण दोन खोल्या आहेत. यात लाईट, नळ व संडास बाथरुमची सुविधा आहे. सदरहु घरजागेत आमचे अशिल हे राहणेस असून सदरची मिळकत आमचे अशिलाचे कब्जे वहिवाटीत आहे.

अशा वर्णनाची घरजागा आमचे अशिल नं. १) श्रीमती सिताबाई बळवंतराव कुलकर्णी, यांचे पती व २) आरत्ती बळवंतराव कुलकर्णी यांचे वडील कै. बळवंतराव भिमराव कुलकर्णी, यांचे नावावर असून त्यांचे दिनांक १५/०६/२०२० रोजी मृत्यु झालेला आहे. त्यांचे मृत्युपश्चात आम्ही पत्नी व मुलगी असे दोघेच वारस आहेत. त्यांचे शिवाय त्यांना अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहु घरजागेवर म.न.पा.त व बापुजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या दप्तरी आमचे दोन्ही वारसांची वारस नोंद होवून त्यांचे नावे कर पावती व संस्थेचा दाखला मिळावा म्हणून त्यांनी म.न.पा.कडे व संस्थेकडे नारस नोंदीकरिता अर्ज दाखल करुन त्यांचे नावाची वारस नोंद होणेकामी वारस म्हणून आमचे अशिल हे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू वर नमूद मिळकत घरजागेवर आमचे अशिलाव्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर अथवा आमचे अशिलाचे वर नमूद पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणीचे दप्तरी व बापुजी नगर गृहनिर्माण संस्थेच्या दप्तरी त्यांचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख - २१/०२/२०२६

**सही/-**
**ढेकणे एस. एम.** ॲडव्होकेट
रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १४७/२०२५

१. अजिनाथ उत्रेश्वर दळवी — **अर्जदार**
रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकीलपदमाकर बि काटमोरे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक — **गैरअर्जदार**
ग्रा. प. सासुरे

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर यांचा मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०२ जुन १९६९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ जुन १९६९ रोजी मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १४७/२०२५

१. लक्ष्मी विजय सुरवसे — **अर्जदार**
रा. काडगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव
(असल्यास, तर्फे वकील)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. — **गैरअर्जदार**
अंबाबाईचीवाडी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी सलोनी विजय सुरवसे, रा. काडगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचा मौजे अंबाबाईचीवाडी ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २६ जुन २००७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी सलानी विजय सुरवसे यांचा दिनांक २६ जुन २००७ रोजी मौजे अंबाबाईचीवाडी ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर — **-- अर्जदार/वादी**

**विरुध्द**

क्रांतीसूर्य मागासवर्गीय औद्योगिक संस्था,
सचिव, नागनाथ रामचंद्र गवळी वगैरे — **-- जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १५५/२०२५ | १) क्रांतीसूर्य मागासवर्गीय औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या. टेंभूर्णी तर्फे सचिव, नागनाथ रामचंद्र गवळी, वय-४४, धंदा-वॉटरप्लांट, रा. अण्णाभाऊ साठे नगर, उजनी (भिमानगर) ता. माढा जि. सोलापूर | ११,९१,२७० | १३/०३/२०२६ |
| २ | १५५/२०२५ | २) रशिद सलिम शेख, वय ३५, धंदा-सेतु कार्यालय, रा. मुसलमान वस्ती, टाकळी (टें) ता. माढा जि. सोलापूर | ११,९१,२७० | १३/०३/२०२६ |
| ३ | १५५/२०२५ | ३) रविंद्रकुमार भारत कोळी, वय-३९, धंदा-शेती, रा.उजनी (भिमानगर) ता. माढा जि. सोलापूर | ११,९१,२७० | १३/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. **१ व ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ व ३ चे नोटीस बजावणीचा रिपोर्ट आलेला नाही** या कारणाने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक १३/०३/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

दर्गनहळ्ळी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील व परिसरातील तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे दर्गनहळ्ळी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील जमीन गट क्र. जुना २६७/१ व नविन २६७/१/अ ज्याचे सामाईक क्षेत्र ०० हे. ८१ आर, आकार १ रू. ४५ पैसे, जमीन गट क्र. जुना २६७/१ पैकी उत्तरेकडील जमीन ज्याचा नविन जमीन गट क्र. २६७/१/ब ज्याचे क्षेत्र ०१ हे. १० आर, आकार १ रू. ९० पैसे व तसेच जमीन गट क्र. २६७/१ जुना पैकी नविन जमीन गट क्र. २६७/१/क ज्याचे क्षेत्र ०१ हे. ०९ आर, आकार १. रू. ९० पैसे या जमीनीच्या वाटणी बाबत मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन कोर्ट, सोलापूर यांचे न्यायालयात दिवाणी दावा नं. ४७/२०२६ (चन्नवीर / शिवाजी वगैरे) हा दावा आमचे अशिल चन्नवीर महादेव कोरे, रा. दर्गनहळ्ळी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर हा.मु. कदेर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी त्यांचे भाऊ, बहीण व मयत भावाची पत्नी, मुले यांच्याविरूध्द दाखल केला असून तो न्यायप्रविष्ठ आहे. तसेच सदर प्रकरणांतील प्रतिवादी दिनेश गणपत रोकडे, रा. मगर सांगवी ता. तुळजापूर जि. धाराशिव व त्यांचे बंधू नागेश ऊर्फ नागनाथ गणपत रोकडे रा. रा. मगर सांगवी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी सदर विवाद्य जमीनीतील जमीन जुना २६७/१ पैकी उत्तरेकडील जमीन ज्याचा नविन जमीन गट क्र. २६७/१/ब ज्याचे क्षेत्र ०१ हे. १० आर, आकार १ रू. ९० पैसे व तसेच जमीन गट क्र. २६७/१ जुना पैकी नविन जमीन गट क्र. २६७/१/क ज्याचे क्षेत्र ०१ हे. ०९ आर, आकार १ रू. ९० पैसे या जमीनी रोकडे यांचे वडील नामे गणपत रोकडे यांनी वादी व त्याच्या भावाची डुप्लीकेट सही करून विना ताबा दस्त क्रमांक अनुक्रमे १९९६/१९९८ व १९९७/१९९८ या खरेदीखताआधारे विकत घेतली आहे. त्यामुळे सदर द्वरील दोन्ही जमीनी या दिनेश गणपत रोकडे, रा. मगर सांगवी ता. तुळजापूर जि. धाराशिव व त्यांचे बंधू नागेश ऊर्फ नागनाथ गणपत रोकडे रा. मगर सांगवी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी कोणासही विक्री, गहाण, तारण करू नये अशा प्रकारचा तात्पूरता मनाई हुकुम सदर वाटणीच्या दाव्यामध्ये केला आहे. त्यामुळे मौजे दर्गनहळ्ळी परिसरातील तमाम जनतेस सदर जाहीरनाम्याद्वारे सुचित करण्यात येते की, सदरची जमीन कोणीही विक्री व इतर दस्ताआधारे विकत घेऊ नये, घेतल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर राहील. सबब सदरची जाहीर नोटीस दिली.

**दिनांक: १८/०२/२०२६**

**तर्फे**
**ॲड.डी.एस. माळी, उमरगा**
**ॲड.आर.बी. मंडले, उमरगा**

**नोटीस देणार**
**चन्नवीर महादेव कोरे**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १६१/२०२५

१. विलास शहाजी करंडे — **अर्जदार**
रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकीलपदमाकर बि काटमोरे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक — **गैरअर्जदार**
ग्रा. प. सासुरे

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी प्रतिक्षा विलास करंडे, रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर यांचा मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २१ ऑक्टोबर २०११ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदराची मुलगी प्रतिक्षा विलास करंडे यांचा दिनांक २१ ऑक्टोबर २०११ रोजी मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

Civil M.A.No.:- १४०/२०२५
पुढील नेमलेली तारीख ३०/०३/२०२६
निशाण क. ६

### मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ट स्तर, बार्शी यांचे न्यायालयात

(आर.पी.बागडे)

(०१) लतादेवी मनोहर कुलकर्णी,
वय : ८१ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. ब्राम्हण गल्ली, उजनी, पो. घाटनांदुर,
ता. अंबेजोगाई जि. बीड. ४१३५१९

(०२) गजानन नरहरी कुलकर्णी,
वय : ६८ वर्षे, धंदा : शेती, रा. चारे,
ता. बार्शी, जि. सोलापुर. ह. मु. जुना बाजार,
काळे गल्ली, बीड, ता व जि. बीड. ४३११२२

(०३) राजाभाऊ नरहरी कुलकर्णी,
वय : ६१ वर्षे, धंदा : शेती,
रा. चारे, ता. बार्शी, जि. सोलापुर.४१३४०९

(०४) सुजाता सतीश सराफ,
वय : ५५ वर्षे, धंदा घरकाम,
रा. हातुरे नगर, मजरेवाडी, विमानतळासमोर,
ता. उत्तर सोलापुर, जि. सोलापुर.४१३२२४

(०५) उषा सुरेंद्र कुलकर्णी,
वय : ५३ वर्षे, धंदा घरकाम,
रा. किर्लोस्कर कंपनी, शिवाई कॉलनी,
ता. उत्तर सोलापुर, जि. सोलापुर.४१३२२४

**-- अर्जदार**

**विरुध्द**

कोणीही नाही / निरंक — **-- सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. ०१ ते ०५ यांची आई मयत आई भागिरथी उर्फ मंदाकिनी नरहरी कुलकर्णी हे दिनांक २९/०१/२०२५ निधन झालेले आहे. तद्‌पश्चात मयत भागिरथी उर्फ मंदाकिनी नरहरी कुलकर्णी यांचे अर्जदार नं. ०१ ते ०५ हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे मयत भागिरथी उर्फ मंदाकिनी नरहरी कुलकर्णी यांचे अर्जदार नं. ०१ ते ०५ कायदेशीर वारस असलेबाबत मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ट स्तर बार्शी यांच न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाचेही कसलेही हरकत तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीकरणापासुन ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या तारखेस ३०/०३/२०२६ रोजी मा. न्यायालयात हजर राहुन कागदपत्रास लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाचीही कसलीही हरकत नाही, असे समजुन सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे.
दिनांक २०/०२/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक,**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**बार्शी**

**सही/-**
**सहायक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**बार्शी**

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर — **-- अर्जदार/वादी**

**विरुध्द**

हनुमंत उत्तरेश्वर नायकुडे वगैरे — **-- जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ११३/२०२५ | १) हनुमंत उत्तरेश्वर नायक-४०, धंदा- शेती, रा-वरवडे ता. माढा जि. सोलापूर | ३,११,९५८ | १३/०३/२०२६ |
| २ | ११३/२०२५ | २) नवनाथ पांडूरंग गायकवाड (मयत वारस) २ अ) शुभांगी मवनाथ गायकवाड, वय-३५ धंदा-घरकाम, रा.मरवडे ता. माढा, जि. सोलापूर | ३,११,९५८ | १३/०३/२०२६ |
| ३ | ११३/२०२५ | ३) महावीर भारत कारंडे, वय - ४१, धंदा-शेती, रा. वरवडे, ता. माढा, जि. सोलापूर | ३,११,९५८ | १३/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. १ ते ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ ची नोटीस रिपोर्ट आलेला नाही व नं. ३ ची नोटीस पत्त्यावर नाही व नं. २ अ ची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आलेला नाही** या कारणाने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कानी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक १३/०३/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १२०/२०२५

१. दिलीप दिगंबर पवार — **अर्जदार**
रा. वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकीलजयश्री शिवाजी घोडके)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी, — **गैरअर्जदार**
न.प. वैराग

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आई राजाबाई दिगंबर पवार, रा. वैराग ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे वैराग ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आई राजाबाई दिगंबर पवार यांचा दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी मौजे वैराग ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर — **-- अर्जदार/वादी**

**विरुध्द**

अमोल बाळू घोडके वगैरे — **-- जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ४४/२०२५ | ३) संदिप भारत गायकवाड, वय-३६, धंदा-शेती, रा. माळेगाव ता. माढा जि. सोलापूर | ६५,०६४ | १३/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. ३ चे नोटीस बजावणीबाबत रिपोर्ट न आल्याने** सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक १३/०३/२०२६ सकाळी ११.०० वाजता** सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर — **-- अर्जदार/वादी**

**विरुध्द**

ज्ञानदेव नारायण पवार (मयत वारस) वगैरे
तुकाराम ज्ञानदेव पवार — **-- जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १५६/२०२५ | १) ज्ञानदेव नारायण पवार (मयत वारस) १ अ) तुकाराम ज्ञानदेव पवार, वय ४५, धंदा-शेती व दुग्ध, रा.अकोले (बुद्रुक) ता. माढा जि. सोलापूर | १,९७,७९९ | १३/०३/२०२६ |
| २ | १५६/२०२५ | १) ज्ञानदेव नारायण पवार (मयत वारस) १ ब) सिताराम ज्ञानदेव पवार, वय-४०, धंदा-शेती व दुग्ध, रा.अकोले (बुद्रुक) ता. माढा जि.सोलापूर | १,९७,७९९ | १३/०३/२०२६ |
| ३ | १५६/२०२५ | २) अशोक भगवान खटके, वय-५६, धंदा-शेती व दुग्ध, रा. वेणेगांव (टें) ता. माढा जि. सोलापूर | ११,९१,२७० | १३/०३/२०२६ |
| ४ | १५६/२०२५ | ३) रमेश कोंडीबा गायकवाड, वय-५६, धंदा-शेती, रा. अकोले (बुद्रुक) ता. माढा जि. सोलापूर | ११,९१,२७० | १३/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. १ अ ते ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ अ, १ ब व नं. ३ यांनी नोटीस घेण्यास नकार दिल्याने व २ चे नोटीस बजावणीचा रिपोर्ट आलेला नाही** या कारणाने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक १३/०३/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर — **-- अर्जदार/वादी**

**विरुध्द**

लखन यल्लाप्पा नवगिरे वगैरे — **-- जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ८६/२०२५ | २) केशर नारायण सरवदे (मयत) वारस २अ) धनाजी नारायण सरवदे, वय-५०, धंदा-शेती, रा.अकोले (खुर्द) ता. माढा जि. सोलापूर | १,०५,०७१ | १३/०३/२०२६ |
| २ | ८६/२०२५ | ३) नदीम दस्तगीर शेख, वय-५४, धंदा-हॉटेल, रा. करमाळा रोड, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | १,०५,०७१ | १३/०३/२०२६ |
| ३ | ८६/२०२५ | ४) पवन रामनाथ कुंभार, वय-५३, धंदा-हॉटेल, रा. करम ाळा रोड, टेंभूर्णी ता. माढा जि.सोलापूर | १,०५,०७१ | १३/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. २ अ, ३ व ४** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २अ ची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आलेला नाही व नं. ३ ची नोटीस मालक घेत नाही व नं. ४ ची नोटीस पत्त्यावर नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक १३/०३/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

टी-२० विश्वचषकाचा




# भारत-दक्षिण आफ्रिका लढत चुरशीची होणार

◆ **अहमदाबाद, २१ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषकात रविवारी भारतीय संघ आपला पहिला सुपर एट सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळणार आहे. दोन्ही संघ गत दोन महिन्यांत सहाव्यांदा खेळणार आहेत.

कर्णधार सूर्यकुमार यादव व तिलक वर्माला फटकेबाजी करण्याऐवजी त्यांच्या नांगर टाकण्याच्या नवीन तत्वज्ञानाची चाचणी दर्जेदार दक्षिण आफ्रिकेच्या संघाकडून घेतली जाईल, कारण भारतीय संघात त्रुटी शोधण्यास आफ्रिकेचा संघ सज्ज आहे.



अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक क्रिकेट सामन्यापूर्वी सराव सत्रादरम्यान धावताना भारतीय खेळाडू

दक्षिण आफ्रिकेच्या संघात कॅगिसो रबाडा, लुंगी नगीदी, मार्को जॅनसेन, केशव महाराज व एडन मार्करामचा समावेश असलेली एक जबरदस्त गोलंदाजी रांग आहे. गतविजेता भारतीय संघ या आव्हानाची जाणीव ठेवेल.

या स्पर्धेत एडन मार्करामचा उत्कृष्ट फॉर्म असूनही, दक्षिण आफ्रिकेची भिस्त क्विंटन डी कॉकवर आहे. डी कॉकने अफगाणिस्तानविरुद्ध ४१ चेंडूत ५९ धावा केल्या व रायन रिकेल्टनसोबत दुसऱ्या गड्यासाठी ११४ धावांची भागीदारी केली, त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला मोठी धावसंख्या उभारता आली. रिकेल्टनची भूमिका देखील महत्त्वपूर्ण आहे. त्याने सर्वाधिक ६१ धावा केल्या होत्या.

भारतीय संघाकडून अद्याप उत्कृष्ट कामगिरी होणे शिल्लक आहे, असे काही जाणकारांचे मत आहे. सलामीवीर ईशान किशन (दोन अर्धशतके) वगळता अव्वल चारमधील इतर तीन फलंदाजांनी आतापर्यंत फारशी चांगली कामगिरी केलेली नाही. अभिषेक शर्मा तीनवेळा शून्य धावांसह अक्षरशः धावा काढू शकला नाही. सूर्यकुमार व तिलकने अँकरची भूमिका बजावली. भारताच्या धावसंख्येला हार्दिक पांड्या व शिवम दुबेची बॅक-एंडवर आवश्यकता आहे.

अभिषेकचा फॉर्म चिंतेचा विषय आहे. अभिषेक सलग दोनदा ऑफ-स्पिनर्सना बळी पडल्यामुळे कर्णधार मार्कराम पॉवरप्लेमध्ये ऑफ-ब्रेक टाकण्याचा निर्णय घेतो की नाही हे पाहणे मनोरंजक असेल.

### आजचे सुपर८ सामने

**श्रीलंका वि. इंग्लंड**
**स्थळ** : पल्लेकेले स्टेडियम, पल्लेकेले
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

००

**भारत वि. दक्षिण आफ्रिका**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायं. ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

अमेरिकेच्या आक्रमणाविरुद्ध ४९ चेंडूत नाबाद ८४ धावा वगळता, सूर्यकुमारने पाकिस्तान किंवा नेदरलॅण्डविरुद्ध फलंदाजीत फारशी सहजता दाखवली नाही.

चार सामन्यांमध्ये नऊ बळी घेणाऱ्या चक्रवर्तीने ५.१६ च्या आश्चर्यकारक इकॉनॉमी रेटने गोलंदाजी केली आहे आणि बुमराहने त्याच्या तीन सामन्यांमध्ये नेहमीप्रमाणे कंजूषपणे प्रति षटक केवळ सहा धावा दिल्या आहेत.

भारतीय संघ व्यवस्थापन अर्शदीप सिंगच्या जागी कुलदीप यादवला खेळवण्याची अपेक्षा आहे आणि वॉशिंग्टन सुंदरच्या जागी एका सामन्याच्या विश्रांतीनंतर अक्षर पटेल परतेल.

दक्षिण आफ्रिकेचा विचार करता, यूएईविरुद्ध विश्रांती घेतलेल्या मार्को जॅन्सेन, लुंगी नगिदी व केशव महाराज पुनरागमन करतील.

◀ *(वृत्तसंस्था)*

# भारतीय महिलांनी जिंकली टी-२० मालिका

## ऑस्ट्रेलियावर १७ धावांनी विजय

◆ **ॲडलेड, २१ फेब्रुवारी**

स्मृती मंधाना व जेमिमाह रॉड्रिग्जची दमदार अर्धशतकी खेळी आणि श्रेयांका पाटीलच्या प्रभावी फिरकी गोलंदाजीच्या बळावर भारतीय महिला संघाने अखेरच्या टी-२० क्रिकेट सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियावर १७ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला आणि तीन सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिका २-१ ने जिंकली. ५५ चेंडूंत ८२ धावांची खेळी करणारी स्मृती मंधाना सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली.



षट्कार ठोकताना सामनावीर स्मृती मंधाना

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने २० षटकांत ६ बाद १७६ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला ९ बाद १५९ धावांपर्यंतच मजल मारता आली.

भारताची सुरुवात थोडीशी कठीण झाली, शेफाली वर्मा (७) लवकर बाद झाली. पण मंधाना (५५ चेंडूत ८ चौकार, ३ षट्कारांसह ८२ धावा) व रॉड्रिग्ज (४६ चेंडूत ४ चौकारांसह ५९) यांनी १२१ धावांची भागीदारी करून भारताला जबरदस्त धावसंख्या गाठून दिली. या दोघींनी दुसऱ्या गड्यासाठी केलेली ही सर्वोच्च भागीदारी असून त्यांनी मिताली राज व पुनम राऊ यांच्यातील ९८ धावांचा विक्रम मोडला. भारताने लवकरच केवळ ७१ चेंडूत १०० धावांचा टप्पा गाठला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची दाणादाण उडाली. त्यांनी १३ षटकांत ९८ धावांत आपला निम्मा संघ गमावला. ॲशले गार्डनरने तेवढी ४५ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह ५७ धावांची अर्धशतकी खेळी करत चांगले प्रयत्न केले, परंतु अरुंधती रेड्डीने तिला रोखले.

उर्वरित फलंदाजही भारतीय गोलंदाजांसमोर फार वेळ टिकाव धरू शकले नाही ऑस्ट्रेलियाला ९ बाद १५९ धावांवर रोखताना भारताकडून श्रेयांका पाटील व श्री चरणीने प्रत्येकी ३ बळी, अरुंधती रेड्डीने २ बळी, तर रेणुका सिंगने एक बळी टिपला.

◀ *(वृत्तसंस्था)*




# कोल्हापूरचा पांडुरंग भोसले 'राघोजी भांगरे श्री'चा मानकरी

▶▶ **पश्चिम महाराष्ट्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धा**

▶▶ **सोलापूरचा शहानवाझ नदाफ उपविजेता, मोस्ट इम्प्रुव्हड शोएब कुरेशी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

कोल्हापूरचा पांडुरंग भोसले पश्चिम महाराष्ट्र 'राघोजी भांगरे श्री' शरीरसौष्ठव स्पर्धेचा मानकरी ठरला. येथील शहानवाझ नदाफ उपविजेता तर शोएब कुरेशी मोस्ट इम्प्रुव्हडचा मानकरी ठरला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महर्षी वाल्मिकी संघ आयोजित आदय क्रांतिकारक राघोजी भांगरे श्री स्पर्धा पंढरपूर येथे पै. यश अंकुशराव यांच्या प्रयत्नामुळे अखिल भारतीय संघटनेचे सचिव डॉ. संजय मोरे व जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली व सोलापूर जिल्हा शरीर सौष्ठव संघटना यांच्या सहकार्याने ही स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली ,सोलापूर धाराशिव व लातूर या जिल्ह्यातून ९० स्पर्धकांनी भाग घेतला होता. ६ वजनी गटातून झालेल्या या स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेत्यांना अनुक्रमे ५, ४, ३, २, १ हजार सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. सहा गटातील प्रथम विजेत्यामध्ये झालेल्या स्पर्धेत पांडुरंग भोसले आणि शानवाज नदाफ यांच्या मध्ये चुरशीची लढत झाली. त्यामध्ये पांडुरंग भोसले सरस ठरला. त्याला रोख ३३ हजार सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देण्यात आले. तसेच उपविजेता शानवाजला १५ हजार, बेस्ट पोझर मनोहर लाड (सांगली) व मोस्ट इम्प्रुव्हड शोएब कुरेशीला प्रत्येकी ५ हजार रुपये देण्यात आले.

पारितोषिके महर्षी वाल्मिकी संघाचे अध्यक्ष गणेश अंकुशराव, प्रणव परिचारक, लक्ष्मण शिरसाट, धनंजय कोताळकर ,संदीप आधटराव व महादेव धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिके देण्यात आली. परीक्षक म्हणून रामकृष्ण चितळे(सांगली), राहूल परीट (कोल्हापूर), प्रमोद काटे, नजीर शेख, गोरख गडसिंग, शकील बडेघर, शफी शेतसदी, शरणकुमार कुंभार व रातिकांत पाटील(सोलापूर) यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जीएस जीमचे संचालक गणेश साळुंखे व वाल्मिकी संघाचे सभासदांनी परिश्रम घेतले.

### विविध वजनी गटाचे अंतिम निकाल (प्रथम पाच)

**५५ किलो** : विशाल गोसावी (कोल्हापूर), काशीनाथ देवकते (सोलापूर), लकी मोरे (करमाळा), बिरू व्हनमाने (मोहोळ), साहिल कोरे (पंढरपूर).

**६० किलो** : पांडुरंग भोले (कोल्हापूर), वैभव होळकर (सांगली), आकाश वाघमारे (सोलापूर), योगेश चव्हाण (बार्शी), गणेश चव्हाण (माढा).

**६५ किलो** : योगेश गवारे (बार्शी), बाबासाहेब बाड (आटपाडी), राकेश गोसावी (कोल्हापूर), निखिल सोनकांबळे (अहदमपूर), प्रवीण सराटे(पंढरपूर).

**७० किलो** : मनोहर लाड (सांगली), शाबाद नदाफ, संकेत विभूते (सोलापूर), अजिंक्य चव्हाण (माळीनगर), मकरंद पवार (करकंब).

७५ किलो : शहानवाज नदाफ (सोलापूर), सचिन पालकर (कोल्हापूर), शिवम वडार (सांगली), आदित्य भाईंगडे, सुमित जाधव (सोलापूर).

७५ किलोवरील : शोएब कुरेशी(सोलापूर), चंद्रजीत टरले (भोसे), शहारूख शेख (अकलूज), लक्ष सुरवसे (पंढरपूर), सुमेत पाटील (बत्तीस शिराळा)

# राज्य शूटिंग बॉल स्पर्धेत नागनाथ विद्यालयास विजेतेपद



**तभा वृत्तसेवा**
**मोडनिंब, दि. २१ फेब्रुवारी-**

बुलढाणा येथे झालेल्या शालेय शूटिंग हॉलीबॉल स्पर्धेमध्ये नागनाथ विद्यालयाने विजेतेपद पटकाविले.

अमरावती विभाग, लातूर विभाग यांचा पराभव करत अंतिम सामन्यात नागनाथ विद्यालयाने कोल्हापूर विभागाचा पराभव केला. संघास क्रीडाशिक्षक आबाराव गावडे, सुनील गायकवाड, मुबीन शेख, संतोष सीताप यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचा प्राचार्य बशीर बागवान यांच्या हस्ते संघाच सत्कार झाला. यावेळी उपप्राचार्य प्रकाश शिंदे, सोमनाथ राजमाने, नीलकंठ शिंदे, दिलीप कुमार दीक्षित, तालुका क्रीडा समन्वयक संभाजी चव्हाण, शंकर काळे, सुनील गायकवाड, राजेंद्र गवळी, प्रताप क्षीरसागर, ज्ञानेश्वर होनखांबे, समीर शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश साळुंखे यांनी केले तर आभार कल्याणराव वागज मानले.




# जितेंद्र धारमेसह बँक ऑफ इंडिया सोलापूरला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

आंतरविभागीय टेबल टेनिस स्पर्धेत बँक ऑफ इंडिया सोलापूरने उपविजेतेपद संपादिले. नाशिक येथे झालेल्या या स्पर्धेत कडव्या लढतीतनंतर सोलापूरला कोल्हापूरकडून २-३ अशी हार पत्करावी लागली. या संघात जितेंद्र धारमे, सचिन संकत, एम. राजशेखर यांनी सुरेख खेळ केला. तसेच पुरुष एकेरीत जितेंद्र धारमेने उपविजेतेपद संपादिले. अंतिम सामन्यात त्यांना कोल्हापूरच्या पुनीत द्विवेदी ३-२ असे पराभूत केले. त्यांना ऑब्री आलमेडा व झेड. एम. पुणेकर यांचे मार्गदशन लाभले.





# राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी चव्हाण; सचिवपदी कोळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी उमेश चव्हाण व सचिवपदी श्रीकृष्ण कोळी यांची निवड झाली.

महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ पुणे संचलित राज्यातील विविध जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या कार्यकारणींची निवड प्रक्रिया चालू आहे. त्यामध्ये सोलापूर जिल्हा कार्यकारणी नुकतीच पार पडली. कार्यकारणीची निवड प्रक्रिया महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक संदिप मनोरे व सचिव प्रा.तायाप्पा शेंडगे, जिल्हा मार्गदर्शक प्रदीप नवले, अंकुश आडकिले आदींच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडली.

**अन्य पदाधिकारी** : मनीष नाईकनवरे, नागेश पाटील (उपाध्यक्ष) सचिन गोतसूर्य (कार्याध्यक्ष), अमोल मिरगणे, नेताजी पवार (सहसचिव ), राजेंद्र चव्हाण (खजिनदार), शुभम तकिक, अमोल पवार, अहमद मुलाणी, सोमनाथ चव्हाण, किशोर सुळ (संघटक), तात्यासाहेब साठे, विजय दत्तू, राहुल हजारे, प्रशांत बाबर, जितेंद्र भालेराव, वैभव राऊत, रोहित सुरवसे, प्रदीप शिर्के, आनंद देशपांडे (सदस्य). नामदेव खारे (प्रसिद्धी प्रमुख), पंचाक्षरी स्वामी व श्याम आरगडे (जिल्हा प्रसिद्धी सचिव).

# झारखंडविरुद्ध महाराष्ट्राच्या तब्बल ४०६ धावा

**२३ वर्षाखालील मुलांची कर्नल सी. के. नायुडू क्रिकेट स्पर्धा उपांत्यपूर्व सामना**

**कर्णधार सचिन धस नाबाद १९९ धावा, नीरज जोशीचे शतक ३ धावांनी हुकले, झारखंडच्या अमित कुमारचे ४ बळी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

बीसीसीआयच्या २३ वर्षाखालील मुलांच्या कर्नल सी. के. नायुडू क्रिकेट स्पर्धेतील तिसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात पहिल्या दिवशी झारखंड विरुद्ध महाराष्ट्राने पहिल्या डावात ७ बाद ४०६ धावा केल्या आहेत.

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरु झालेल्या सामन्यात कर्णधार सचिन धस १९९ धावा करून खेळपट्टीवर टिकून आहे. पहिला बळी दुसऱ्या षटकात मिळविल्यानंतर झारखंडची गोलंदाजी निष्प्रभ करत दुसऱ्या गड्यासाठी १९५ धावांची भागीदारी सचिन धस व नीरज जोशी यांनी केली.

स्पर्धेच्या नियमानुसार पाहुण्या संघाला कौल दिला जातो. त्याप्रमाणे झारखंड संघाने सकाळी प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्याच चेंडूवर चौकार लगावत महाराष्ट्राचा यष्टिरक्षक साहिल औताडे याने सुरेख सुरुवात केली खरी, पण दुसऱ्याच षटकात शुभ शर्माने यष्टिरक्षक प्रभातकुमार माहतोकडे झेल देण्यास भाग पाडून सलामीची जोडी फोडली. त्यानंतर कर्णधार सचिन धस आणि नीरज जोशी यांनी संयमी खेळी करत दुसऱ्या गड्यासाठी ७५ मिनिटात, १५ षटकात ५० धावांची भागीदारी करत धावफलक हलता ठेवला.

हीच भागीदारी दोघांनी एकेरी, दुहेरी तसेच प्रसंगी चौकार मारत १०० पार नेली. दरम्यान नीरज ने ६८ चेंडूत ९ चौकारांनिशी वैयक्तिक अर्धशतक लगावले आणि पाठोपाठ सचिन धसने देखील दमदार खेळी करत ५० धावा पूर्ण केल्या. जेवणाला खेळ थांबला तेव्हा ३३ षटकात १२९ धावा फलकावर लागल्या होत्या.



सचिन धस



नीरज जोशी



अमितकुमार

जेवणानंतर पुन्हा संयमी फलंदाजी करत दोन्ही फलंदाज नव्वदित पोचले आणि शतकाला केवळ ३ धावा हव्या असताना नीरज जोशीला कौनैन कुरेशीने कर्णधार राजन दीपकडे झेल देण्यास भाग पाडले व दुसऱ्या गड्याची १९५ धावांची भागीदारी संपुष्टात आणली. त्यानंतर आलेल्या, स्पर्धेत महाराष्ट्रकडून सर्वाधिक शतक, धावा करणारा दिग्विजय सोबत ६३ धावांची भागीदारी करताना सचिनने शानदार असे शतक झळकावले ते १३ चौकार, २ षटकार लगावत. संघाच्या २६४ धावा झाल्या असताना दिग्विजय पाटील (२९) हा अमित कुमारच्या गोलंदाजीवर राजन दीपकडे झेल देऊन बाद झाला. सोलापूरचा खेळाडू अर्शिन कुलकर्णी त्यानंतर फलंदाजीसाठी आल्यावर सामना पहायला आलेल्या लहान खेळाडू, चाहत्यांनी एकच जल्लोष केला. परंतु केवळ ८ धावा करून १९ वर्षाखालील भारतीय संघाकडून, तसेच दुलीप ट्रॉफी खेळलेल्या फिरकी गोलंदाज मनीषी याला एक उंच फटका मारण्याच्या नादात अर्शिन सीमारेषेजवळ नकुल यादवकडे झेल देऊन परतला. त्याच्या पुढच्याच षटकात हर्ष मोगावीरा देखील लगेच शून्यावर अमितकुमारकडून पायचीत झाला आणि पंचांनी चहापानाला खेळ थांबविला तेव्हा ५ बाद २८६ (६२.५) धावसंख्या झालेली.

चहापाननंतर आलेला विकी ओस्तवाल सोबत सचिन ने २८ धावांची भागीदारी करत स्वतःचे दीडशतक देखील पूर्ण केले. अमितकुमारने पुन्हा एक पायचितचा बळी मिळवत विकी ओस्तवाल (१३) ला माघारी धाडले. विकी नंतर किरण चोरमले हा फलंदाजीला आला आणि ताबडतोब अशी फलंदाजी करायला सुरुवात केली आणि २ चौकार, ३ उत्तुंग षटकार लगावले. २६ चेंडूत ३१ धावा केल्यावर अमित कुमारला फटका मारण्याच्या नादात किरण कौनैन कुरेशीकडे झेल देऊन तंबूत परतला. दुसऱ्या बाजूने कर्णधार सचिनने एक बाजू लावून धरत २० चौकार लगावले, सोबत ४ षटकार देखील मारत १९० पार पोचला आणि संघाची धावसंख्या ३५० पार नेली. ३७२ धावावर किरण चोरमले बाद झाल्यावर आलेल्या अजय बोरुडे सोबत संयमी फलंदाजी करत सचिन ने धावसंख्या ४०० चे वर नेली.

पहिल्या दिवशीचा खेळ संपायला २ षटके शिल्लक असताना सचिन १९२ धावा वर नाबाद होता, त्यानंतर टोन चौकार लगावला, पुढच्या चेंडूवर दुहेरी धाव घेतली. शेवटच्या षटक मधील दुसऱ्या चेंडूवर १ धाव घेतल्यावर तो १९९ धावांवरती पोहोचला आणि द्विशतक करणेसाठी त्याला एका धावेची गरज असताना त्याचा साथीदार अजय बोरुडे याने शेवटचे चार चेंडू निर्धाव खेळून काढले व पंचांनी दिवसाचा खेळ थांबविला असून उद्या दुसऱ्या दिवसाचा पहिला चेंडू सचिन खेळणार असून त्यावर तो २०० पूर्ण करतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. झारखंड कडून अमित कुमार याने ८२ धावा देत ४ तर शुभ शर्मा, मनीषि व कौनैन कुरेशी यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला आहे.

## महत्वाचे...



## देशाला महात्मा गांधीजींच्या विचाराशिवाय पर्याय नाही : खा. प्रणिती शिंदे

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

भारत देशाला महात्मा गांधींच्या विचाराशिवाय पर्याय. नाही महात्मा गांधीजींनी सत्य आणि अहिंसेच्या जोरावर देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. महात्मा गांधी एक वकील, अहिंसक नेते समाज सुधारक होते. ते जरी आज नसले तरी यांच्या विचाराशिवाय देशाला पर्याय नाही या देशाला त्यांच्या विचाराची गरज आहे असे प्रतिपादन खासदार प्रणिती शिंदे यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती येथे ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या महात्मा गांधीजींच्या पुतळा सुशोभित करण्याच्या उद्धाटनाप्रसंगी बोलताना केले. शिवजयंती निमित्त शिवछत्रपतीच्या मूर्तीस अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भीमाशंकर जमादार, माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, कल्याणराव पाटील, बालाजी जमादार, धनराज जमादार, भाग्यश्री अंकुशराव, पंडित शिंदे, मेहता शेटजी, हरी शिंदे, चौधरी, मोहन कटाप व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक संयोजक भीमाशंकर जमादार यांनी केले. यावेळी गावातील २५ दिव्यांगांना ग्रामपंचायततर्फे मदत म्हणून रोख रक्कम खासदार शिंदे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



## एकलव्य अभ्यासिकेस अतुल शिंदे यांच्याकडून संगणक भेट

**करकंब, दि. २१ फेब्रुवारी-**

करकंब व पंचक्रोशीतील ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करता यावा यासाठी एकलव्य अभ्यासिका करकंब येथे गेल्या तीन वर्षांपासून कार्यरत आहे. एकलव्य अभ्यासिकेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एक सकारात्मक दिशा मिळत आहे. या अभ्यासिकेच्या माध्यमातून अभ्यास करून बाहेर पडलेल्या ४ विद्यार्थ्यांना शासकीय नोकरी प्राप्त झाली आहे. मूळचे करकंब येथील सुपूत्र व महाराष्ट्र ग्रामीण बँक मुख्य शाखा संभाजीनगर शाखेचे व्यवस्थापक अतुल शिंदे व अंजनी शिंदे या दाम्पत्याकडून जन्मभूमीच्या ऋणातून थोड्याफार प्रमाणात उतराई व्हावे या भावनेने एकलव्य अभ्यासिकेस आवश्यक असणारा एक संगणक संच अभ्यासिकेचे मुख्य संचालक ज्ञानेश्वर दुधाणे व इतर सहकारी सभासद हरिश्चंद्र वास्ते, प्रमोद रेडे पाटील, पांडुरंग काटवटे, संतोष भोसले, राजेंद्र करपे यांच्याकडे सपूर्त केला.



## वेळापुरात विविध उपक्रमांनी शिवजयंती साजरी

**वेळापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

वेळापूर (ता. माळशिरस) येथील योद्धा प्रतिष्ठान यांच्यावतीने भक्ती निवास येथे विविध उपक्रमाने शिवजयंती साजरी करण्यात आली. शिवजयंती निमित्त महादेव देवालय ट्रस्ट येथे योद्धा प्रतिष्ठान यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी आमदार रामभाऊ सातपुते, योद्धा प्रतिष्ठानचे संस्थापक मदनसिंह माने-देशमुख, महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने-देशमुख, वेळापूर सोसायटीचे चेअरमन अमरसिंह माने देशमुख, सावता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष महादेवभाऊ ताटे, माजी जि प सदस्य बाळासाहेब धाइंजे, संदीप माने-देशमुख, काकासाहेब जाधव, गोपाळ घाडगे, गणेश चव्हाण, भय्या मिरगे, पिनू येडगे, महेश साठे, ओंकार खराडे, शिवजयंती समिती अध्यक्ष निखिल शिंदे उपस्थित होते. तसेच शिवजयंतीनिमित्त महिलांची भगवे फेटे बांधून वेळापूर शहरातून रॅली काढण्यात आली. भक्तनिवास येथे आरोग्य शिबिर आयोजन केले होते या शिबिरात हृदय तज्ञ डॉ. ईनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिर संपन्न झाले. तसेच योद्धा प्रतिष्ठान अंतर्गत मुलींसाठी छत्रपती शिवाजी महाराज चरित्रांतर्गत व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये यशस्वी विद्यार्थिनींना बक्षीस वितरण करण्यात आले. सायंकाळी भक्ती निवास येथे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## निधन वृत्त...

### बाळकृष्ण पोगुल



**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

अक्कलकोट रोड येथील नरसिंह विडी घरकुल येथील रहिवासी हभप बाळकृष्ण पोगुल महाराज (वय-८०) यांचे दि. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि.२१ फेब्रुवारी रोजी अत्यंसंस्कार करण्यात आले.

# मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांना सहा महिन्यांची 'लॉटरी'

### ग्रामविकास विभागाचे राजपत्र जारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर निवडणूक होईपर्यंत विद्यमान सरपंच यांनाच प्रशासक म्हणून नेमण्यात यावे. असे राजपत्र महाराष्ट्र शासनाच्या वतीने शुक्रवार दि.२० फेब्रुवारी रोजी काढण्यात आले. त्यामुळे विद्यमान सरपंचांना सहा महिने पुन्हा पदावर राहण्याची लॉटरीच लागली आहे.

ग्रामविकास विभागाने सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी पत्राद्वारे या राजपत्राची अंमलबजावणी करण्याची सूचना दिली आहे. ग्रामविकास विभागाच्या या निर्णयाने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांकडे प्रशासकीय कारभार सोपवण्यात येणार आहे. डिसेंबर २०२५ ते जानेवारी, फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये १४ हजार २३४ ग्रामपंचायतींची मुदत संपत आहे. यात सोलापूर जिल्ह्यातील ६५५ ग्रामपंचायतची मुदत संपत आहे. तर राजीनामा, मयत, अविश्वासाचा ठराव, अपात्र, प्रवर्गातील उमेदवार न मिळणे या कारणामुळे रिक्त असलेल्या ३६ ग्रामपंचायतींच्या ४७ जागांसाठी पोटनिवडणूक लागणार होत्या. मात्र शासन निर्णयानुसार निवडणूक लागेपर्यंत विद्यमान सरपंच हेच प्रशासक म्हणून काम पाहणार आहेत. या निर्णयाने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या गाव कारभाऱ्यांना निवडणूक होईपर्यंत प्रशासक पदाची संधी मिळणार आहे. या निर्णयाने गावातील विकास कामास व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानास गती मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

**मुदत संपवणाऱ्या जिल्ह्यातील ग्रा.पं.ची तालुकानिहाय संख्या**

करमाळा - ५१, माढा - ८३, बार्शी - ९५, उत्तर सोलापूर - २४, मोहोळ - ७२, पंढरपूर - ७२, माळशिरस - ४९, सांगोला - ६२, मंगळवेढा - २३, दक्षिण सोलापूर - ५२, अक्कलकोट - ७२ एकूण - ६५५.

# खाटकाकडे नेण्यात येणाऱ्या पुळुजच्या १३ वासरांची सुटका

### पुळूज येथे पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ फेब्रुवारी-**

पुळुज (ता.पंढरपूर) येथे चारा पाण्याविना बांधून ठेवत खाटकाकडे नेण्यात येणाऱ्या गायीच्या १३ वासरांची पंढरपूर तालुका पोलिसांनी सुटका केली. त्यामुळे या वासरांना जीवदान मिळाल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांनी दिली.

दि.२० फेब्रुवारी रोजी रात्री एक वाजताच्या सुमारास गोरक्षक श्री. घाटे व मानस परिचारक यांनी फोनद्वारे माहिती दिल्यावरून पुळुज गावातील शारदानगर येथे चारा पाण्याविना लहान गाईची एकूण १३ वासरे एका जाळीमध्ये बांधली असून काही वेळाने ती खाटकाकडे घेऊन जाणार असल्याची माहिती पोलिस निरिक्षक मुजावर यांना मिळाली. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकासह पुळुज येथे कारवाई केली असता एका झाडाखाली एकूण



लहान-मोठ्या आकाराची १३ गायींची वासरे बांधलेले आढळली. त्यांना चारा पाणी वगैरे काहीही सोय त्या ठिकाणी केलेली नव्हती. सदरची जनावरे क्रूरपणे बांधून ठेवलेल्या अवस्थेत होती व खाटकाकडे कत्तलीसाठी देण्याच्या तयारीत असताना व ती जनावरे गंगाराम साहेबराव वाघमोडे (रा. पुळूज) याने बांधून ठेवल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.

दरम्यान वाघमोडे यांनी ती जनावरे खटकाकडे द्यायच्या अगोदरच पोलिसांनी त्या ठिकाणी छापा मारून वासरांचे प्राण वाचवले. याबाबत गोरक्षक मानस परिचारक (रा. पंढरपूर) यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गंगाराम साहेबराव वाघमोडे यांच्याविरुद्ध प्राण्यांना निर्दतीने क्रूरपणे वागणूक देणे या कायद्याअंतर्गत तक्रार दिली आहे. त्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करण्यात आली.

दरम्यान पंढरपूर तालुका पोलिसांच्या या कारवाईचे कौतुक होत आहे.

तालुका पोलिसांनी १३ गायीच्या लहान वासरांना ताब्यात घेऊन गोशाळेमध्ये जमा केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, सहाय्यक फौजदार विजू गायकवाड, पोलीस हवालदार दीपक भोसले, सुहास देशमुख, मंगेश रोकडे, संजय गुटाळ, सागर गवळी, विजयकुमार आवटी, अभिमन्यू गरड, चालक हसन नदाफ यांच्या पथकाने केली.

## पोलिस निरीक्षक समाधान पवार यांचा श्रीपूर येथे सत्कार

**श्रीपूर, दि. २१ फेब्रुवारी-**

प्रभारी पोलस निरिक्षक समाधान सर्जेराव पवार (मूळ गांव खेड भोसे (ता. पंढरपूर) यांनी वाहतुक विभागात उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल साकिनाका पोलीस ठाणे मुंबई येथे वाहतूक विभाग प्रशासनाच्या वतीने पोलीस सह आयुक्त यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले होते.



समाधान पवार यांचे सर्व बालपण श्रीपूर येथे गेले. चंद्रशेखर विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर पंढरपूर येथिल कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातून उच्च शिक्षण पूर्ण करून त्यांनी स्पर्धा परिक्षेवर आपले लक्ष केंद्रीत केले. यावेळी सचिन नागणे, प्रविण शिंदे, पांडुरंग हाटकर, रमेश पिसाळ, संतोष यादव, दादा झरकर, सुहास गुडे, ज्ञानेश्वर काटे, संजय ओहाळ, नवनाथ लोखंडे, पोपट पवार, रविंद्र सावंत-पाटील, धनाजी तळे, विजय सावंत, रहीम डांगे, सुनिल सुरवसे उपस्थित होते.

## बाह्य मुल्यांकनात कुर्डुवाडीच्या जिव्हाळा विद्यामंदिरचा गौरव

### महाराष्ट्रातील प्रथम ४० शाळांच्या यादीत समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २१ फेब्रुवारी-**

शाळा गुणवत्ता मुल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत करण्यात आलेल्या बाह्य मूल्यांकनात जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी या विद्यालयाचा महाराष्ट्रातील प्रथम ४० शाळांच्या यादीत समावेश झालेला आहे.



महाराष्ट्रातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या१,०२,६७५ शाळा स्वयंमूल्यांकन करून यामध्ये सहभागी झाल्या होत्या. त्यापैकी राज्यातून १०,६४४ शाळांची बाह्य मूल्यांकनासाठी निवड करण्यात आली. त्यामधून ४२९शाळांची प्लस श्रेणी साठी निवड झाली. त्यामधील जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिराची प्लस श्रेणीमध्ये महाराष्ट्रातील पहिल्या ४० निवड शाळांमध्ये करण्यात आलेली आहे. सर्व क्षेत्र व सर्व मानके यांचे संपूर्ण गुण मिळवीत प्लस श्रेणीमध्ये स्थान मिळवलेले जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी हे माढा तालुक्यातील एकमेव आहे.

संस्थापक अध्यक्ष व मुख्य समन्वयक शिवराज वायचळ, मुख्याध्यापिका मा. सारिका गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यामंदिराने हे यश मिळविले आहे. + श्रेणी मिळाल्याबद्दल शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक लक्ष्मण कारंडे, संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे यांनी अभिनंदन केले. यासाठी मुख्याध्यापिका सारिका गोटे, किशोर मोहोळे, जयकुमार उपाध्ये, रवी शहा, प्रदीप देशपांडे, जयंत माळी, आकाश घोडके, नवनाथ बुरकुले, जयंत माळी, दिनेश आतकर, गीतांजली शिंदे, साधना झोळ, निलोफर सय्यद, सुवर्णा साळुंखे, रूपाली गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

## 'माझी वसुंधरा' मध्ये बार्शीचा जल्लोष; राज्यात मिळाला तृतीय क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत बार्शी नगरपरिषदेला राज्यस्तरावर मोठा मान मिळाला आहे. १ ते ३ लाख लोकसंख्या गटात 'भूमी' या थिमॅटिक विभागात बार्शी नगरपरिषदेने राज्यात तृतीय क्रमांक पटकावत तब्बल चार कोटी रुपयांचे बक्षीस मिळवले आहे.

अभियान कालावधीत केलेल्या कामांचे डेस्कटॉप व फील्ड मूल्यमापन झाल्यानंतर १७ फेब्रुवारी २०२६ रोजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत हा निकाल जाहीर करण्यात आला.

घनकचरा व्यवस्थापन, व्यापक वृक्षारोपण, अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा वापर, स्वच्छता उपक्रम आणि नागरिकांमध्ये पर्यावरण जनजागृती अशा विविध घटकांमध्ये बार्शी नगरपरिषदेने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात मानाचे स्थान पटकावले. ही माहिती माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी दिली. या यशामागे तत्कालीन मुख्याधिकारी तथा प्रशासक बाळासाहेब चव्हाण, आरोग्य अधिकारी शब्बीर वस्ताद यांचे नियोजनबद्ध काम महत्त्वाचे ठरल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील व विद्यमान मुख्याधिकारी तैमुर मुलानी यांचेही त्यांनी अभिनंदन केले.

## जवळा गावाने घेतला ऐतिहासिक निर्णय

### २५ फेब्रुवारीपासून सायकाळी ७ ते रात्री ९ मोबाईल, टीव्ही बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ फेब्रुवारी-**

मोबाईलच्या आहारी गेल्याने शालेय विद्यार्थ्यांचे भवितव्यच अंधारात जात असल्याने येणाऱ्या २५ फेब्रुवारीपासून दररोज सायं.७ ते रा.९ पर्यंत जवळा ता.सांगोला या गावातील मोबाईल आणि टीव्हीसह अन्य डिजिटल स्क्रीन पूर्णपणे बंद ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय ॲड. यशराजे साळुंखे पाटील यांच्या संकल्पनेतून सरपंच सज्जन मागाडे यांनी घेतला आहे.

ज्या वयात शिक्षणाचे आणि संस्काराचे धडे गिरवायला पाहिजे त्याच वयात शालेय मुले मोबाईच्या आहारी जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रतेचा अभाव, स्मरणशक्ती कमी होणे, अभ्यासात रस न उरणे अशा समस्या निर्माण होत आहेत.

येणाऱ्या पिढीचे होणारे संभाव्य नुकसान लक्षात घेऊन ॲड. साळुंखे-पाटील यांनी गावात सायं.७ ते रा.९ या वेळेत मोबाईल आणि टीव्ही बंद ठेवण्याची संकल्पना मांडली.

या संकल्पनेनुसार सरपंच मागाडे यांनी उपसरपंच नवाज खलिफा, सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील व्यापारी, महिला आणि ग्रामस्थांना विश्वासात घेऊन हा ऐतिहासिक निर्णय घेतला.

**शैक्षणिक गुणवत्ता आणि आरोग्य सुधारण्यास मदत होणार**

अनेक विद्यार्थ्यांना मोबाईलचे व्यसन लागल्याने त्यांचा स्वतःच्या आई, वडील आणि संपूर्ण कुटुंबीयांशी संवाद कमी झाला आहे. रा.२ ते ३ तास मोबाईल आणि अन्य डिजिटल स्क्रीन बंद केल्याने विद्यार्थ्यांचा अभ्यास, रात्रीचे जेवण वेळेत पूर्ण होईल आणि त्यांना वेळेत झोप लागेल. परिणामी शैक्षणिक विकासाबरोबर त्यांचे आरोग्यही सुदृढ राहण्यास मदत होणार आहे. जवळा गावाने घेतलेल्या या निर्णयाचे सांगोला तालुक्यातील इतर गावानीही अनुकरण करावे.

**- ॲड. यशराजे साळुंखे-पाटील**

## पिलीव येथे दहावीची परीक्षा सुरळीत

### ४२५ पैकी ७ विद्यार्थी पहिल्या दिवशी गैरहजर

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २१ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील दहावीच्या परीक्षा केंद्रावर पहील्या दिवशी मराठी विषयाच्या पेपरला ४२५ पैकी ७ विद्यार्थ्यांनी दांडी मारली .पहील्या दिवशी ४१८ विद्यार्थी हजर होती परीक्षा सुरळीतपणे पार पडली असल्याचे केंद्रप्रमुख अशोक बागल यांनी सांगीतले.

यावेळी बोलताना त्यांनी शासनाच्या कॉपीमुक्त धोरणानुसार केंद्रावर परीक्षा सुरू झाली .पहील्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार न घडता परीक्षा एकदम सुरळीतपणे संपन्न झाली.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक: SUR/L/T/2024/30R3. कामाचे नाव: वाडी यार्डचे अ वर्ग मालवाहतूक परीक्षा यार्डमध्ये अपग्रेडेशन करण्याच्या संबंधात कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग (पुनर्निमंत्रण) अंदाजे किंमत रु. 1,17,77,433.48/- बोली सुरक्षा: 2,08,900/- पूर्ण कालावधी: 12 महिने ऑफरची वैधता: ६० दिवस वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 17/03/2026 दुपारी 3.00 वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल. ANJ-18

**सुरक्षित प्रवास करा, पायी प्रवास करणे टाळा**

**IDFC FIRST Bank Limited**
IDFC FIRST Bank
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १४११२८९२९ | मालमत्ता तारण कर्ज | १. अंबादास वसंत दांडगे<br>२. राजश्री अंबादास दांडगे | ०७.०२.२०२६ | रुपये ५,४४,००३.३७/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल घरगुती क्षेत्रफळ = १२००.00 चौरस फूट. एकूण बांधलेले क्षेत्रफळ = १२००.00 चौरस फूट, कोंढार्की ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे स्थित आणि मिलकट क्रमांक १७२/१, कोंढार्की, ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे नोंदणीकृत. एकूण जमीन -१४०० चौरस फूट. आणि सीमा: उत्तर: सुरेश दांडगे, दक्षिण: दिगंबर दांडगे, पूर्व: रस्ता, पश्चिम: रस्ता | | | | | |
| 2 | ११३१११३८४ | मालमत्ता तारण कर्ज | १. दत्तात्रय साहेबराव गोडसे<br>२. सत्वशिला दत्तात्रय गोडसे | २७.०१.२०२६ | रुपये ८,६४,६७५.८८/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल घरगुती क्षेत्रफळ = ६३८ चौ. फूट. एकूण बांधलेले क्षेत्रफळ = ६३८ चौ. फूट, लोणारवाडी ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे स्थित आणि ग्रामपंचायत लोणारवाडीच्या रजिस्टरमध्ये मालमट्टा क्रमांक २७६ येथे नोंदणीकृत. एकूण जमीन ३२३८ चौ. फूट. त्यावर संलग्न अधिकार, स्वातंत्र्य आणि मान्यता, वर्तमान आणि भविष्य, इमारती, संरचना, उभारणी आणि/किंवा त्यावरील बांधकामे आणि त्यानंतरचे विकास आणि पृथ्वीशी संलग्न किंवा कायमचे पृथ्वीशी जोडलेल्या कोणत्याही गोष्टीशी जोडलेले सर्व वनस्पती आणि यंत्रसामग्री, वर्तमान आणि भविष्य, आणि सीमा: उत्तर: सुदर्शन गोडसे, दक्षिण: सचिन गोडसे, पूर्व: रामचंद्र गोडसे पश्चिम: रस्ता | | | | | |
| 3 | ६८८२५५९८ | मालमत्ता तारण कर्ज | १. धिरज बजरंग शिखरे<br>२. सुरेखा बजरंग शिखरे<br>३. गायत्री भिराज शिखरे | ३०.०१.२०२६ | रुपये १,३१,२०८.४८/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिल्कट क्र. ११८ चा सर्व तुकडा आणि पार्सल, क्षेत्रफळ ३७५ चौ. फूट., मौजे येथे स्थित: शंकरगाव, ग्रामपंचायतीच्या हद्दीत: शंकरगाव, उप-विभाग: पंढरपूर, दिव: सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमा: पूर्व: बबन सीताराम चंदनशिवे, उत्तर: रस्ता, पश्चिम: ज्ञानोबा दामू आठवले, दक्षिण रोड | | | | | |
| 4 | ११३८००७०३ | मालमत्ता तारण कर्ज | १. पोपट रघुनाथ चव्हाण<br>२. अजय पोपट चव्हाण | ०७.०२.२०२६ | रुपये ४,७२,९२७.५६/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, ज्याचा तळमजला आहे = १२२०.00 चौ. फूट. एकूण बांधलेले क्षेत्रफळ = १२२०.00 चौ. फूट., विटे ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे स्थित आणि मालमत्ता क्रमांक २९१, पोस्ट- विटे, ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे नोंदणीकृत. एकूण मोजमाप जमीन/प्लॉट क्षेत्रफळ १३२०.00 चौ. फूट आहे आणि त्याची सीमा: उत्तर: जीपी रोड, दक्षिण: जीपी रोड, पूर्व: अशोक आबा जाधव, पश्चिम: जीपी ओपन स्पेस आहे. | | | | | |
| 5 | १२८३५४९५२ | मालमत्ता तारण कर्ज | १. सुरजअण्णा देठे<br>२. शांताबाई अण्णासाहेब देठे | ०६.१२.२०२५ | रुपये ७,९६,०२१.२३/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत क्र. ३५८ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण १२०० चौ. फूट., गावात स्थित: गुरसाळे, ग्रामपंचायतीच्या हद्दीत गुरसाळे, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमा: पूर्व: भीमराव जनार्दन कवडे, पश्चिम: सुरेश नारायण रणपिसे, दक्षिण: रस्ता, उत्तर: रस्ता | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : २२/०२/२०२६**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

# माझी वसुंधरा ४.0 मध्ये सोलापूरला मानाचा मुकुट

- 'भूमी' घटकात राज्यस्तरावर दोन कोटींचा विशेष पुरस्कार
- पुणे विभागात सोलापूर महापालिका प्रथम




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा ४.0 अभियानांतर्गत सोलापूर महानगरपालिकेने उल्लेखनीय कामगिरी करत 'भूमी' या घटकात राज्यस्तरावर ३ लाख ते १0 लाख लोकसंख्या गटामध्ये एकमेव शहर म्हणून मानाचा दोन कोटी रुपयांचा विशेष पुरस्कार पटकावला. या यशामुळे पुणे विभागात सोलापूर महानगरपालिका प्रथम क्रमांकावर ठरली आहे.

मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते पुरस्कार सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी स्वीकारला. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, महेश देवकर, मनोज देवकर, उद्यान अधिकारी स्वप्नील सोलंकर, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार उपस्थित होते.

**संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब : महापौर कोंड्याल**

या सर्वसमावेशक पर्यावरणीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेऊन सोलापूर महानगरपालिकेला हा बहुमानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून ही कामगिरी संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. महापौर विनायक कोंड्याल यांनी या यशाचे श्रेय महानगरपालिकेचे आयुक्त, अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच सोलापूरकर नागरिकांना दिले असून भविष्यातही पर्यावरण संवर्धनासाठी जोमाने कार्य करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

**हरित सोलापूर वाढीसाठी प्रयत्न करणार : उपमहापौर देवकर**

हरित सोलापूर करण्याच्या दृष्टीने हा एक प्रेरणादायी सन्मान पुरस्कार आहे. माझी वसुंधरा अभियानांतर्गत पूर्ण टीम व सोलापुरातील पर्यावरण संस्था मिळुन वृक्ष लागवड व संवर्धन मोठ्या प्रमाणात केली आहे. त्याचाच सन्मान झाला व नक्कीच पुढील काळात हरित सोलापूर वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याची भावना उपमहापौर देवकर यांनी व्यक्त केली.

# सराफाकडून घरफोडी चोरीचे ८ लाखांचे सोन्याचे दागिने जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

चोरीचे दागिने स्विकारणारा सराफाकडून ६ घरफोडी चोरी गुन्हयातील ५२.६0 ग्रॅम वजनाचे एकुण ७ लाख ८९ हजार ७00 रुपये सोन्याचे दागिने जप्त करण्यात आल्याची महिती सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने प्रसिद्धी पत्रकार द्वारे देण्यात आली.



आरोपी रोहित दिपक पवार याने उंबरे दहिगांव येथील घरफोडीच्या गुन्हयातील त्याचे साथीदार भोलेनाथ उर्फ शन्या चंद्रकांत भोसले रा. चाकोरे अकलुज, भैय्या शकील शेख रा. विजबोर्ड जवळ वेळापुर याचे सोबत मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीने वाटणीस आलेला मुद्देमालापैकी १२ तोळे सोन्याचे दागिणे सोनार कारागिर वैभव दिगंबर कुलथे रा. देशमुख गल्ली अकलुज यास विक्री केले असल्याचे सांगितल्याने या गुन्हयात बीएनएस - २३ चे कलम ३१७(२), ३(५) प्रमाणे कलम वाढ करून आरोपी नामे वैभव दिगंबर कुलथे रा. देशमुख गल्ली अकलुज यास दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपी वैभव दिगंबर कुलथे पोलीस कोठडीत असताना आरोपी रोहित पवार याचेकडुन स्विकारलेले सोन्याचे दागिने काढुन देण्याकरिता देखमुख गल्ली येथील घरी गेलो असता, आरोपी वैभव कुलथे याचे घरास कुलुप होते. तदनंतर सोनार कारागिर आरोपी वैभव दिगंबर कुलथे याने त्याची आईकडे ठेवलेले गुन्हयातील चोरीचे दागिने त्याची आई यांनी दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी तपासीक अधिकारी सपोनि भिमगोंडा पाटील यांचेकडे हजर केले. तपासीक आधिकारी यांनी माळशिरस ४, वेळापूर १, अकलुज १ या पोलीस ठाणेकडील असे एकुण ६ गुन्हयातील ५२.६0 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा २ लाख ८८ हजार रूपये (बाजार भाव प्रामणे) ७ लाख ८९ हजार ७00 रू किमंतीचे सोन्याचे दागिणे हस्तगत केले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक, भिमगोंडा पाटील व पथकातील, पोलीस हवालदार सलीम बागवान, विजयकुमार भरले, मपोहेकों पल्लवी इंगळे, पोकों सागर ढोरे-पाटील, प्रमोद शिंपाळे, यश देवकते यांनी बजावली.

## महत्वाचे...

### संशोधनात 'बीगसी' आघाडीवर; प्रा. देशमाने यांना पेटंट

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**



भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय येथील प्रा. इंजि. सौरभ देशमाने यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत Design of Wireless Sensor Node for IOT Device या विषयावर पेटंट प्राप्त केले आहे. या संशोधनामुळे IoT उपकरणांची कार्यक्षमता आणि विश्वासार्हता वाढण्यास मदत होणार असून, कमी खर्चात अधिक परिणामकारक डेटा ट्रान्सफर करणे शक्य होईल. भविष्यातील डिजिटल आणि ऑटोमेशन क्षेत्रासाठी हे पेटंट महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. महाविद्यालयाचे अध्यक्ष इंजि. रवींद्र गायकवाड, सचिव अनामिका गायकवाड प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

### बार्शी : १८ केंद्रातून दहावी परीक्षेस सुरुवात

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

बार्शी शहर व तालुक्यात इयत्ता दहावीच्या परीक्षेस शुक्रवार २0 फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. बार्शी शहर व तालुक्यातून १८ केंद्रावर ५८५३ विद्यार्थी-विद्यार्थिनी या परीक्षेस बसलेले आहेत. या परीक्षांचे पारदर्शक व कॉपीमुक्त आयोजन करण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवरील हॉलमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे प्रक्षेपण ऑनलाईन पद्धतीने जिल्हा परिषद कार्यालयातील नियंत्रण कक्षातून लाईव्ह पाहिले जात आहे. यासाठी जिल्हा परिषद कार्यालयात विशेष नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली असून तेथून सर्व परीक्षा केंद्रांवर बारकाईने नजर ठेवण्यात येत आहे. ही संपूर्ण प्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येये आहे. परीक्षा शांततामय, पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने सर्वंकष नियोजन केले असल्याची माहिती गट शिक्षणाधिकारी बालाजी नाटके यांनी दिली. बार्शी तालुक्यात तहसीलदार एफ.आर. शेख, बार्शी यांच्या अध्यक्षतेखाली भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

### राहत्या घरी साडीच्या साह्याने गळफास

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

राहत्या घरी साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत एक व्यक्ती आढळून आला. त्यांना नातेवाईकांच्या मदतीने खाली उतरवून बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी दाखल करण्यात आले.या हकीकत अशी की, किरण गुरुसिद्ध सगरे वय ३१ राहणार धोत्री ता. दक्षिण सोलापूर हा दि. २१ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. नातेवाईक दत्तात्रय नारायण सगरे यांच्या मदतीने खाली उतरवून बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी वळसंग पोलीस ठाण्याचे मालचे यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले. उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

### वृध्दाने घेतला झाडाला गळफास

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

एका झाडाला कपड्याच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या स्थितीत एक वृद्ध व्यक्ती आढळून आले आहेत. बेशुद्ध अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. या हकीकत अशी की, नारायण काळे वय ६0 रा. जय मल्हार चौक, बुधवार पेठ सोलापूर हे दि. २0 फेब्रुवारी रोजी क्रोमा शोरूम च्या मागे मनपा क्रमांक २७ नंबर शाळेजवळ एका झाडाला कपड्याच्या तुकड्याच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या स्थितीत मिळून आले. त्यांना उपचारासाठी बेशुद्ध अवस्थेत फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे घुगे यांनी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### आमच्या रस्त्यावरून जायचे नाही म्हणत दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

आमच्या रस्त्यावरून जायचे नाही असे म्हणत दोघांनी मिळून लाकडाने, दगडाने मारहाण करण्यात आली.पवन शाहीर बंडगर वय २७ रा. परमेश्वर पिंपरी, ता. मोहोळ जि. सोलापूर असताना रस्त्याच्या वादाच्या कारणावरून आमच्या रस्त्यावरून जायचे नाही असे म्हणून प्रकाश दुधाळ, शीतल दुधाळ यांनी मिळून लाकडाने, दगडाने मारहाण केली, त्यात डोक्यास जखम व सर्वांगास मुकामार लागला. उपचारासाठी सरकारी दवाखाना कामठी येथे दाखल करण्यात आले होते. तेथून रेफरने पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल करण्यात आले अशी नोंद सिव्हिल चौकीत झाली आहे.

# सोलापूर विद्यापीठाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासनस्तरावर विशेष सहकार्य : जिल्हाधिकारी

**पीएम उषा अंतर्गत कला व ललित कला आणि जीव विज्ञान संकुल इमारतींचे भूमिपूजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे सोलापूर जिल्ह्याच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाचे ज्ञानकेंद्र असून विद्यापीठाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तसेच विविध विकासात्मक प्रस्तावांसाठी शासन स्तरावरून विशेष सहकार्य केले जाईल, अशी ठाम ग्वाही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.



शनिवारी, विद्यापीठ परिसरात पीएम उषा विभागाच्या मंजूर निधीतून उभारण्यात येणाऱ्या कला व ललित कला संकुल आणि जीव विज्ञान संकुल या दोन अत्याधुनिक इमारतींचे भूमिपूजन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, प्रा. देवानंद चिलवंत, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, अधिसभा सदस्य ॲड. मल्लिनाथ शहाबादे, डॉ. वीरभद्र दंडे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. महादेव खराडे, अभियंता गिरीश कुलकर्णी, प्रल्हाद कांबळे, डॉ. गौतम कांबळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पीएम उषा विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, कुलगुरू डॉ. महानवर यांनी विद्यापीठाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आणि विकासात्मक प्रस्तावांबाबत सविस्तर माहिती दिली आहे. विशेषतः पंढरपूर येथे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वारकरी संशोधन केंद्राबाबत सखोल चर्चा झाली असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती देण्यासाठी आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी नमूद केले. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांबाबतही सकारात्मक भूमिका घेतली जाईल.

या दोन्ही प्रमुख विषयांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी स्वतः चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विद्यापीठाला नेहमीच सहकार्य राहील, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले की, पीएम उषा अंतर्गत मंजूर निधीमुळे विद्यापीठात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी भक्कम पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. कला, ललित कला आणि जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांत संशोधन व कौशल्याधारित शिक्षणाला नवे बळ मिळणार आहे.

विद्यापीठात विविध विकासकामे प्रगतीपथावर असून त्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभत आहे. यापुढेही त्यांनी विद्यापीठाच्या विकासाकडे विशेष लक्ष देऊन सहकार्य करावे, अशी अपेक्षा कुलगुरूंनी व्यक्त केली. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ. बोबडे हॉस्पिटलमुळे रुग्णांची होणार सोय : माजी आ.संजय शिंदे

**डॉ.बोबडे मल्टिस्टेट हॉस्पिटलचे उद्‌घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.२१ फेब्रुवारी-**

कुर्डुवाडी शहर व परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी मोठ्या हॉस्पीटलची गरज होती ती डॉ.बोबडे यांच्या मल्टिस्टेट हॉस्पीटलने भरून काढली आहे. सर्व सुविधा एका छताखाली असून शल्यचिकित्साही करता येणार असल्याने वैद्यकीय सेवेसाठी होणारी धावपळ आता दूर होणार असल्याचे प्रतिपादन माजी आ.संजयमामा शिंदे यांनी केले.






कुर्डुवाडी येथे डॉ.बोबडे यांच्या बोबडे मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलचे उद्‌घाटन माजी आ. संजयमामा शिंदे, प्रसिध्द सर्जन डॉ. बी.वाय. यादव, धामणगाव मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन बस्ते यांच्या हस्ते झाले. त्यावेळी माजी आ. शिंदे बोलत होते. डॉ. रवींद्र बोबडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.सोनाल बोबडे- बोरुडे, प्रा.डॉ.राजेंद्र दास, डॉ.विलास मेहता, सय्यद मॅडम यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ.रवींद्र बोबडे, सुहासिनी बोबडे, डॉ.शुभंम बोबडे, डॉ.श्रुतिका बोबडे, सोनल बोरुडे-सारंग बोरुडे, डॉ.यज्ञेश केडीयुरु, डॉ.रूपेश मंगवडे, डॉ.स्नेहल मंगवडे व सुप्रिया गवळी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्षा जयश्री भिसे, उपनगराध्यक्षा सविता जगताप, ग्रामीण रुगणालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ.सुनंदा रणदिवे, डॉ.सुरेंद्र भुयार, डॉ.स्नेहा भुयार, आयएमए चे राज्याध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, माजी आ. विनायक पाटील, डॉ.दिनेश कदम, प्रा.डॉ.राजेंद्र दास, शिवसेना जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे, समिर मुलाणी यांच्यासह शहरातील सर्व आजी-माजी नगरसेवक, शहर व परिसरातील नामवंत डॉक्टर व पॅरामेडिकल स्टाफ, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झाडे लावण्यावरुन वाद; महिलेला धक्काबुक्की

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ फेब्रुवारी**

तालुक्यातील फपाळवाडी-कदमवस्ती येथे झाडे लावण्यासाठी घेतलेल्या खड्ड्यांवरुन झालेल्या वादाचे रुपांतर मारहाणीत झाले असून, किराणा दुकान चालविणाऱ्या कुटुंबीयांना शिवीगाळ, मारहाण व जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना १९ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता घडली आहे.

याबाबत भाग्यश्री विनोद कदम (वय २९, रा. फपाळवाडी-कदमवस्ती) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या आपल्या कुटुंबीयांसह बार्शी-तुळजापूर रोडवरील दर्शना ऑईल मिलजवळ 'स्वामी समर्थ किराणा स्टोअर्स' हे दुकान चालवतात. दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास कदम वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर जेसीबीच्या साहाय्याने झाडे लावण्यासाठी खड्डे घेतले जात होते. संबंधित ठिकाणाहून त्यांच्या घराची पाईपलाईन जात असल्याने त्यांनी व त्यांच्या पतीने काम करणाऱ्यांना दुसऱ्या ठिकाणी खड्डे घेण्याची विनंती केली.यावरुन रणजीत रामेश्वर कदम, प्रमोद नाना कदम व रोहित रामेश्वर कदम यांनी शिवीगाळ करुन वाद घातल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच 'लोखंडी कमान पाडून टाकू' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यावेळी दीर राहुल कदम मध्यस्थी करण्यासाठी आले असता त्यांनाही शिवीगाळ केली. संध्याकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास वरील तिघांसह अक्षय गाडे व मोरे (रा. बार्शी) हे दारुच्या नशेत दुकानासमोर आले व दीर राहुल कदम यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या सासू लक्ष्मी तुकाराम कदम यांनाही धक्काबुक्की करुन खाली पाडण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तसेच कोणालाही बोलवा, आम्ही तुम्हाला पुरुन उरणार, अशी जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# अकलुजमध्ये ११ मंडळांसह डीजे धारकांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अकलुज, दि.२१ फेब्रुवारी-**

शिवजयंती उत्सवादरम्यान ध्वनीप्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अकलुज पोलिसांनी ११ शिवजयंती उत्सव मंडळे व संबंधित डीजे-डॉल्बी धारकांविरुद्ध गुन्हे दाखल केले. मिरवणुकीत मोठ्या आवाजात डीजे, डॉल्बी व लेझर शोचा वापर करून सार्वजनिक शांतता भंग केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.




सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांनी शिवजयंतीपूर्वी सर्व शिवजयंती मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन डीजे/डॉल्बीऐवजी पारंपरिक वाद्यांचा वापर करण्याचे तसेच सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्याअनुषंगाने अकलुज उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके व अकलुजचे पोलीस निरीक्षक निरज उबाळे यांनीही स्थानिक मंडळे, डीजे धारक व नागरिकांची बैठक घेऊन शांततेत मिरवणूक पार पाडण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, २0 फेब्रुवारी रोजी शहरातील विविध मंडळांनी मिरवणुकीदरम्यान मोठ्या आवाजात डीजे-डॉल्बीचा वापर करून ध्वनीप्रदूषण कायद्याचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी गुन्हे दाखल केले असून पुढील तपास सुरू आहे.

ध्वनीप्रदूषणाची नोंद (डेसीबलमध्ये) हिंदवी प्रतिष्ठान - १0८, लहुजी साम्राज्य प्रतिष्ठान- ११५, सह्याद्री प्रतिष्ठान - १0५, छावा ग्रुप- १0५, स्वराज्य प्रतिष्ठान यशवंतनगर - ११२, शिवदत्त प्रतिष्ठान अकलुज - ११0, नवक्रांती प्रतिष्ठान अकलुज - ११७, रामरहीम प्रतिष्ठान अकलुज - ११८, संभाजीराजे प्रतिष्ठान अकलुज - १२५, शिवमुद्रा प्रतिष्ठान अकलुज- ११0, महाराज प्रतिष्ठान अकलुज - १0७.

### संख्याशास्त्राच्या पेपरला ३00 विद्यार्थ्यांची दांडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

शनिवार दि.२१ फेब्रुवारी रोजी झालेल्या बारावीच्या गणित व संख्याशास्त्र विषयाच्या पेपरला ३00 विद्यार्थ्यांनी दांडी मारली. २१ हजार ९६0 विद्यार्थी हजर राहिले. गणित विषयाच्या पेपरसाठी सोलापूर शहर जिल्ह्यातून २२ हजार २६0 विद्यार्थी प्रवेशित होते.

त्यापैकी २१ हजार ९६0 विद्यार्थी प्रतीक्षात परीक्षेला हजर राहिले. तर ३00 विद्यार्थी अनुपस्थित राहिले. गणित विषयाच्या पेपरला कोणताही गैरप्रकार घडला नसल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.




आजच
रवि.२२ फेब्रु.
सायं.७ वा.
हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
ऑनलाईन बुकिंग
bookmyshow
तिकीट विक्री (दिवसभर सुरु)
गुरु वठारे
9011474400

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२0 औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(0२१७)-२६00४९८ ● जाहिरात विभाग (0२१७)-२६00३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# उद्या सोलापूरात महिलांसाठीच्या 'पिंक क्लिनिक' चा श्रीगणेशा

## राज्यातील सुरूवात सोलापूरातून; जिल्हा रुग्णालय व रोटरी क्लबचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

केंद्र व राज्य शासनाच्या वतीने महिलांची सर्व प्रकारची आरोग्य तपासणी व उपचार एकाच छताखाली होण्यासाठी 'आदिशक्ती पिंक क्लिनिक' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. राज्यातील या उपक्रमाची सुरूवात सोलापूरातून होत आहे.

येथील जिल्हा रुग्णालय व रोटरी क्लब सोलापूरच्या प्रयत्नाने विशेष केंद्र तयार करण्यात आले आहे. त्याचा लोकार्पण सोहळा सोमवारी दि.२३ फेब्रुवारीला सकाळी साडेदहा वाजता गुरूनानक चौकातील जिल्हा रूगणालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.वर्षा डोईफोडे व रोटरीचे प्रांतपाल जयेश पटेल यांच्या हस्ते होणार आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डोईफोडे यांच्या संकल्पनेतून व रोटरी क्लब सोलापूर च्या प्रयत्नाने खास महिलांच्या आरोग्यासाठी हे आदिशक्ती पिंक क्लिनिक जिल्हा रुग्णालयात सुरु करण्यात येत आहे. लोकार्पण कार्यक्रमास अश्विनी ग्रामीण मेडिकल कॉलेज कुंभारीच्या मा.अधिष्ठाता डॉ. माधवी रायते यांची देखील उपस्थिती राहणार असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर यांनी दिली.



हा प्रकल्प पी.पी. पटेल फौंडशेन यांच्या सीएसआर फंडातून साकार करण्यात आला आहे. यामध्ये विशेषतः महिलांमध्ये होणारे कर्करोग, अनेमिया, मेनोपॉज, उच्च रक्तदाब, मधुमेह आदीवर भर देण्यात येणार आहे. सशक्त नारी, सशक्त भारत ह्या ब्रिदवाक्यास अनुसरुन घरातील स्त्री आरोग्यसंपन्न असणेच्या दृष्टीने ह्या उपक्रमाची सुरुवात करण्यात आल्याची माहिती ह्या प्रकल्पाच्या समन्वयिका डॉ. ज्योती चिडगुपकर यांनी सांगितली.




हा उपक्रम महाराष्ट्रात प्रथमच सोलापूर शहरात सुरु करण्यात येत असून ह्यापुढे ११ जिल्ह्यांमध्ये नांदेड, संभाजीनगर, अहिल्यानगर, लातूर, जालना , बीड, परभणी आदी ठिकाणी अशा प्रकारचे केंद्र स्थानिक रोटरी क्लबसच्या सहकार्याने सुरु करण्यात येणार असल्याची माहिती प्रांतपाल नियुक्त जयेश पटेल यांनी दिली. महिलांचे आरोग्य शारीरिक, मानसिक आणि हार्मोनल बदलांमुळे विशेष लक्ष देण्यासारखे असते. किशोर अवस्था ते रजोनिवृत्ती पर्यंत महिलांमध्ये होणाऱ्या सर्व बदलामुळे होणाऱ्या आजारांचे वेळेत निदान करून उपचार देण्याकरिता आदिशक्ती पिंक क्लिनिक संकल्पना सुरू करण्यात येत आहे. तरी महिलांनी या अभिनव उपक्रमाचा अधिकाधिक फायदा घ्यावा असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय सोलापूर व रोटरी क्लब सोलापूर यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

# मारायचे होते सासूला; मृत्यू झाला पतीचा

## उंबरगावात प्रेम प्रकरणातून विषप्रयोग; पत्नी अन् प्रियकर अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ फेब्रुवारी-**

पत्नीने प्रियकराच्या मदतीने सासूला विष देण्याचा कट रचला; मात्र त्याच विषारी पाण्याचे सेवन पतीने केल्याने त्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना पोलिस तपासात उघड झाली आहे.

या प्रकरणी पत्नीसह तिच्या प्रियकराला पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना उंबरगाव (ता. पंढरपूर) येथे घडली. यामध्ये समाधान गणपत लोहार (वय-३४) यांचा मृत्यू झाला.

ऊबरगाव येथील समाधान लोहार यांचा विवाह २०१३ मध्ये सारिका (वय-३२) हिच्याशी झाला. विवाहानंतर काही वर्षांनी सारिका व तिची सासू विमल यांच्यात वाद होऊ लागले. चार वर्षांपासून सारिका हिचे गावातील शेखर चंदनशिवे याच्याशी प्रेमसंबंध असल्याचे उघड झाले. याबाबत पती समाधान व सासू विमल यांना माहिती असून त्यातून घरात सतत वाद होत होते. १० जानेवारी २०२६ रोजी सकाळी शेखरने सारिकाला शेतात बोलावून पांढऱ्या रंगाचे विषारी औषध असलेली अर्धवट भरलेली पाण्याची बाटली दिली. आपल्या संबंधांना आड येणाऱ्या सासूला संपवण्यासाठी हे विषारी द्रावण पिण्याच्या पाण्यात टाक, असे त्याने सांगितले. त्यानुसार रात्री घरात कोणी नसताना सारिकाने कळशीतील पाण्यात ते द्रावण टाकले व बाटली जाळून टाकली.

दरम्यान, सासूने ते पाणी पिताना चव कडू लागल्याने तांब्यातील पाणी मुलगा समाधानजवळ ठेवले. त्यानंतर जेवणानंतर समाधान यांनी तेच पाणी पिले. रात्री साडेअकराच्या सुमारास त्यांना उलट्या सुरू झाल्याने खासगी रुग्णालयात नेले. उपचारादरम्यान १६ जानेवारीला त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी शेखर संताराम चंदनशिवे व सारिका समाधान लोहार यांनी संगनमताने कट रचून पती समाधान गणपत लोहार यांना विषारी पाणी पाजून ठार मारल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे करीत आहेत.

## ▶▶ महत्वाचे...



### गुन्हेगारी टोळीतील दोघे जिल्ह्यातून तडीपार

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

गुन्हे करणारे टोळी सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात आली आहे. असे आदेश सोलापूर पोलीस आयुक्तालयाकडून दी.२० फेब्रुवारी रोजी काढण्यात आले. यामध्ये अयान उर्फ वडा सैफन मुच्छाले, वय-२० वर्षे, रा. २७०, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर (टोळी प्रमुख) आसिफ महमद हुसेन बडेपीर, वय-१९ वर्षे, रा. मुस्लिम पाच्छापेठ, इक्बाल फॅशन जवळ, सोलापूर याचेविरुध्द सन २०२५ या कालावधीमध्ये टोळीच्या माध्यमातून मोटार सायकल चोरी करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्यांचेविरुध्द जेलरोड पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५५ अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांनी कार्यवाही करुन, त्यांचेकडील तडीपार आदेश ने दि.१३/०२/२०२६ अन्वये, टोळीतील अयान उर्फ वडा सैफन मुच्छाले, वय-२० वर्षे, रा. २७०, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर (टोळी प्रमुख) आसिफ महमद हुसेन बडेपीर, वय-१९ वर्षे, रा. मुस्लिम पाच्छापेठ, इक्बाल फॅशन जवळ, सोलापूर यास सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आले आहे.

### सोलापुरात मंगळवारी एकदिवसीय कार्यशाळा

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

राज्य व केंद्र शासनाच्या एमएसएमई क्षेत्रातील विविध योजना, उपक्रम आणि धोरणांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.



उद्योजक, नवउद्योजक, स्टार्टअप्स तसेच निर्यातदारांसाठी ही कार्यशाळा मार्गदर्शक ठरणार आहे. ही कार्यशाळा दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत दि इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी लि., होटगी रोड, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळा जयकुमार गोरे, पालकमंत्री सोलापूर तथा ग्रामीण विकास व पंचायत राज मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.

### विजय डिजिटल बिजनेस सोल्युशन सेंटरचे उद्या उद्घाटन

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

विजय डिजिटल बिजनेस सोल्युशन या ऑफलाइन सेंटरचा उद्घाटन समारंभ सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता बटरफ्लाय गार्डन मॉन्टेसरी स्कूल, जुना विडी घरकुल येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती डॉ. विजय देगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डिजिटल आजादीचे निर्माते संदीप बन्साली आणि ओंकार गायकवाड हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस व्यंकटेश दोन्ता, राहुल विडप, संतोष देसाई, उदय पुड्डा उपस्थित होते.

# तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करा

## ▶▶ आ. कल्याणशेट्टी यांची अक्कलकोट रिंगरोड प्रकल्पाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील महत्त्वाच्या विकास प्रकल्पांमध्ये एक नवा अध्याय जोडणारा चेन्नई-सूरत राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत उभारण्यात येत असलेला रिंगरोड प्रकल्प सध्या चर्चेचा विषय बनला आहे. या प्रकल्पाच्या कामाची प्रत्यक्ष स्थळी पाहणी करतांना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी संबंधित अधिकारी आणि अभियंत्यांशी सविस्तर चर्चा केली आणि प्रकल्पाच्या कामाची गुणवत्ता आणि वेळेवर पूर्णतेसाठी आवश्यक तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करण्याची सूचना केली.



आमदार कल्याणशेट्टी यांनी रिंगरोड प्रकल्पाच्या पाहणीदरम्यान सर्व कामांची बारकाईने तपासणी केली. रस्त्याचे काम खूप महत्त्वाचे आहे. त्यात हलगर्जीपणा होऊ नये, दर्जेदार साहित्य वापरावे आणि तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करावे, अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली. याशिवाय, नियोजित वेळेत काम पूर्ण होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामग्रीची उपलब्धता सुनिश्चित करण्याबाबतही त्यांनी आवश्यक निर्देश दिले. हा रिंगरोड प्रकल्प अक्कलकोट शहरासाठी मोठ्या महत्त्वाचा ठरणार आहे. रिंगरोडच्या पूर्ण झाल्यानंतर अक्कलकोट शहराची वाहतूक अधिक सुकर होईल, तसेच शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल. औद्योगिक, व्यापारी तसेच कृषी मालाची वाहतूक वेगवान होईल आणि गुंतवणुकीच्या दृष्टीने तालुका आकर्षक ठरेल, असा विश्वास आमदार कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला. यावेळी नगरसेवक अविनाश महिखांब, नागराज कुंभार, धनंजय गाळने आणि अधिकारी व अभियंते उपस्थित होते.

**अक्कलकोटचा विकास वेगाने होईल**

हा रिंगरोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अक्कलकोटचा सर्वांगीण विकास वेगाने होईल, असे आमदार कल्याणशेट्टी यांनी सांगितले. पायाभूत सुविधा, रस्त्यांची गुणवत्ता, आणि आर्थिक संधींची निर्मिती ही एकूणच तालुक्याच्या भविष्यासाठी महत्त्वाची ठरेल.



# सोलापुरात पारा ३६ अंशावर

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

शहरात उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी जाणवलेला गारवा आता पूर्णपणे नाहीसा झाला असून कमाल आणि किमान तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे सोलापूरची वाटचाल उन्हाळ्याकडे सुरू झाल्याचे स्पष्ट होत आहे. आज सोलापुरात ३६.०० अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. यापूर्वी तापमान ३५ अंशांच्या खाली होते; मात्र यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच पारा ३५ अंशांपार गेला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस कमाल तापमान ३६ अंशांच्या आसपास राहणार असून गुरुवारपासून त्यामध्ये वाढ झालेली दिसत आहे. आज शहरात २१.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. त्यामुळे सकाळी जाणवणारा गारवा कमी झाला असून दिवसभर उकाड्याची तीव्रता वाढू लागली आहे.

# आयटी पार्क उभारणीला गती

## २० हेक्टर जमीन हस्तांतरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

आयटी पार्क उभारणीला गती मिळाल्याची महत्त्वाची माहिती समोर आली आहे. होटगी रस्त्यावरील २० हेक्टर जलसंपदा विभागाच्या जमिनीचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम. आयडीसी) कडे हस्तांतरण करण्याचे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी शुक्रवारी दिले. या निर्णयामुळे आयटी पार्कच्या प्रकल्पाला लवकरच मूर्त रूप मिळणार असून, शहरातील औद्योगिक आणि व्यवसायिक विकासाला नवी दिशा मिळणार आहे.

होटगी परिसरात सुमारे ५० एकर जागेवर आयटी पार्क उभारण्यास एमआयडीसीने यापूर्वीच मंजुरी दिली होती. महापालिका निवडणुकीपूर्वीच जमीन हस्तांतरणाच्या प्रक्रियेची शरूवात करण्यात आली होती, परंतु विभागीय आयुक्तांच्या आदेशामुळे या प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आणि पालकमंत्री जयकुमार गोरे, तसेच आमदार देवेंद्र कोडे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकांमध्ये या प्रकल्पावर सकारात्मक चर्चा केली गेली होती. त्यानंतर आदेश जारी करण्यात आले.

तांत्रिक आणि प्रशासनिक पातळीवर जलसंपदा विभागाने एमआयडीसीला ही जमीन विनामूल्य हस्तांतरित केली आहे. हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण होताच,



होटगी परिसरात आयटी पार्कच्या प्रत्यक्ष कामाची सुरुवात होईल. यामुळे शहरात उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना चालना मिळणार असून, अनेक रोजगार संधी निर्माण होणार आहेत. विशेषत: वस्त्रोद्योग व्यावसायिकांसाठी इचलकरंजीच्या गर्तीवरही सुविधा पुरवण्याबाबत लवकरच विभागीय स्तरावर बैठक घेतली जाईल, असे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

**रोजगाराच्या संधी मिळणार**

आयटी पार्कच्या उभारणीने सोलापूरच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासास चालना मिळेल. तसेच, या प्रकल्पामुळे विविध उद्योगांची स्थापना होईल आणि स्थानिक बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. व्यवसायिक, तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या, युवा वर्गाला यामुळे रोजगाराच्या संधी मिळणार आहेत.

**इन्फ्रास्ट्रक्चर सुधारण्यास मदत**

आयटी पार्कचा प्रकल्प इतर मोठ्या शहरांसोबत सोलापूरला तंत्रज्ञान आणि उद्योगाच्या क्षेत्रात प्रतिस्पर्धी बनवेल. एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग उभे राहिल्यामुळे या क्षेत्रातील इन्फ्रास्ट्रक्चर सुधारण्यास मदत होईल.

# शेतकऱ्यांना आधार आणि सन्मान देण्याची गरज

## आ. सुभाष देशमुख | लोकमंगल प्रथम कृषी राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

शेतकऱ्यांना आधार देण्याकरिता आणि त्यांच्या सन्मानासाठी प्रत्येक संस्था आणि राजकीय नेत्यांनी पुढे येण्याची गरज आहे. राज्यात समृद्ध शेतकऱ्यांचा एक समूह तयार केला, तर राज्य आणि देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करेल. तरुणांनी शेती व्यवसायात उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले.

लोकमंगल समूह आयोजित लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालय पुरस्कृत लोकमंगल कृषी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी आमदार देशमुख बोलत होते. पद्मश्री पुरस्कार प्राप्त डॉ. श्रीरंग लाड, परभणी (ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ) व सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विलास शिंदे (नाशिक) हे यावेळी उपस्थित होते.

श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोहन देशमुख यांनी प्रास्ताविक केले. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावळी डॉ. विलास शिंदे, कृषी विज्ञान केंद्र नंदुरबार येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.राजेंद्र



दहातोंडे, ज्येष्ठ पत्रकार कृष्णकांत चव्हाण आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. अजित कुरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सचिन फुगे यांनी आभार मानले. संस्थेच्या सचिवा डॉ. अनिता ढोबळे, प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, प्राचार्य सागर महाजन, प्राचार्य डॉ. राणी मेत्रे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गायकवाड, प्राचार्य डॉ. बाळासाहेब बिराजदार, अजित राठोड, सचिन परमशेट्टी, सलमान शेख, प्रथमेश बाळपुरी, संकेत बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

**यांचा झाला सन्मान**

**विभाग : पश्चिम महाराष्ट्र :** प्रथम पुरस्कार- शशिकांत पुदे (शेज बाभुळगाव ता. मोहोळ). द्वितीय पुरस्कार- रवींद्र धुमाळ (धुमाळवाडी ता.फलटण जि.सातारा). **उत्तर महाराष्ट्र विभाग :** प्रथम पुरस्कार-कल्याणी (मुरदारे, ता. शेवगाव जि.अहिल्यानगर), द्वितीय पुरस्कार अर्जुन तोरवणे (बेहेर ता.साक्री जि. धुळे). **मराठवाडा :** प्रथम पुरस्कार-रविंद्र देवरवाडे (देवळा ता. अंबाजोगाई जि.बीड), द्वितीय पुरस्कार-यज्ञेश कातबाने (धनगाव, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर). **कोकण :** प्रथम पुरस्कार - उत्तम फोंडेकर (कुंभारमाठ ता.मालवण जि.सिंधुदुर्ग), द्वितीय पुरस्कार- अनिल शिगवण (कुंभवे ता. दापोली जि.रत्नागिरी)

**विदर्भ :** प्रथम पुरस्कार- स्वप्निल रावनकर (अकोट जि.अकोला), द्वितीय पुरस्कार- वर्षा लांजेवार (चिंधीचक ता.नागभीड, जि. चंद्रपूर). **सोलापूर जिल्हा :** प्रथम पुरस्कार- संतोष काटमोरे (पिंपरी ता.बार्शी), द्वितीय पुरस्कार- निखिल कदम (माढा), तृतीय पुरस्कार प्रमोद इंगळे (अंजनगाव खेलोबा ता. माढा).




# तडवळचे नॅशनल बॅकवर्ड कृषी विद्यापीठ बनावट

▶ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या यादीत समावेश
▶ नागपूरचे राजा अरेबिक विद्यापीठही बनावट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

केंद्र शासनाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने फेब्रुवारी २०२६ मध्ये बनावट विद्यापीठाची यादी जाहीर केली असून त्यात देशात ३२ विद्यापीठ व महाराष्ट्रातील दोन विद्यापीठाचा समावेश आहे. नागपूरच्या राजा अरेबिक विद्यापीठासह सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील तडवळच्या नॅशनल बॅकवर्ड कृषी विद्यापीठाचा समावेश आहे.

कृषी शिक्षण आणि संशोधनावर लक्ष केंद्रीत करणारे तडवळ रेल्वे स्टेशन (प्लॉट नंबर१०४०) राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठ (स्वायत्त) हे अनाधिकृत संस्थात्मक केंद्र २०१४-२०१६ दरम्यान सुरू झाले असून विज्ञान शाखेतील कृषी डिप्लोमा आणि बी.एससी (कृषी) यासारखे अभ्यासक्रम चालवतात विद्यार्थ्यांनी या विद्यापीठात प्रवेश घेऊ नये असे आवाहन विद्यापीठ अनुदान आयोगाने केले आहे.

UGC
University Grants Commission

**लोकपाल बंधनकारक, पुण्यातील क्रीडा विद्यापीठाचा समावेश**

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थी तक्रार निवारण नियम २०२३ अंतर्गत देशातील प्रत्येक विद्यापीठाने लोकपाल नियुक्त करणे बंधनकारक आहे. या निर्णयामागील मुख्य उद्धेश विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे पारदर्शक आणि वेळेत निवारण करणे हा आहे. यात देशातील २९ विद्यापीठाचा समावेश असून महाराष्ट्रातील बालेवाडी पुणे येथील आंतराराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाचा समावेश आहे.

# रक्ताने लिहिलं पत्र : मराठा समाजावर राजकीय अन्यायाचा तीव्र निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी**

एक मराठा, लाख मराठा! हे घोषवाक्य घेऊन मराठा आंदोलक राम जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून मराठा समाजावर होणाऱ्या राजकीय अन्यायाचा तीव्र निषेध केला आहे.

सोलापूर महापौर निवडीत मराठा समाजाला वंचित ठरवण्यात आले असून, यासाठी जाधव यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. १९९३ नंतर ३२ वर्षांपासून मराठा समाज महापौर पदापासून वंचित राहिल्याचा उल्लेख करत त्यांनी या



अन्यायाला विरोध केला आहे. जोपर्यंत मराठा समाजाचा महापौर होत नाही, तोपर्यंत हा लढा चालू राहील, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे. राम जाधव यांनी सोलापूर महापालिका निवडणुकीत भाजपच्या काही प्रमुख नेत्यांवर आरोप करत म्हटले की, ३ दशकांनी भाजपला मराठा समाजाचा महापौर करण्याची संधी होती, पण त्याच्यावर एक शब्दही न काढता, समाजाची उपेक्षा करण्यात आली.

यापूर्वी ३ वेळा पद्मसाली समाजाला, २ वेळा मुस्लिम, लिंगायत, लमाण समाजाला आणि इतर समाजांना महापौर पदावर न्याय देण्यात आले. परंतु, मराठा समाज ३२ वर्षे या अधिकारापासून वंचित आहे, असे त्यांनी आरोप केले.

२०१६ मध्ये मराठा आरक्षणाचा निर्णय घेतल्यानंतर आणि २०२५ मध्ये अण्णासाहेब पाटील महामंडळासाठी ७०० कोटी दिल्याबद्दल जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार केला होता. पण, त्याचवेळी सोलापूर महापालिकेतील मराठा समाजाचा महापौर होण्याची संधी भाजपने गमावली.

आम्ही कुठल्याही समाजाच्या विरोधात नाही, पण मराठा समाजावर झालेला हा अन्याय कधीच विसरणार नाही. पुढेही मराठा समाज शैक्षणिक, सामाजिक, आणि राजकीय क्षेत्रात होणाऱ्या अन्यायावर आवाज उठवत राहील, अशी चेतावणी राम जाधव यांनी दिली आहे. त्यांच्या या रक्ताने लिहिलेल्या पत्राने राजकीय वर्तुळात खळबळ माजवली आहे, आणि आगामी निवडणुकीतील वादग्रस्त मुद्दे पुन्हा एकदा उचलले आहेत.


CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३६३

**आम्हांवरी सत्ता व्हावी आणिकांची ।**
**थोरीव तुमची काय मग?।।**
**आला सेना न्हावी पायाचे जवळी ।**
**आता टाळाटाळी नका करू ।।**

इतर प्राण्याच्या तुलनेत मनुष्य हा प्राणी भाग्यशाली मानला जातो. त्याचे कारण म्हणजे माणसाकडे बुध्दि, वाचा आहे. जर माणूस बुध्दिचा, वाचेचा सदुपयोग करू शकला तरच तो खऱ्या अर्थाने भाग्यशाली आहे. अन्यथा याच्या इतका अवघड जीव दुसरा कोणता असणार नाही. समाजातील वाईटात वाईट घटना ह्या माणसाशिवाय इतर कोणता प्राणी करत नाही. वाईट कृत्य तोच माणूस करतो जो त्याच्या मनाच्या आणि इंद्रियांच्या अधिन झालेला असतो. बुध्दिवादी माणसाने मनाला आणि त्याच्या इंद्रियांना ताब्यात ठेवायला पाहिजे. पण दुर्देवाने नमुद करावे लागते की मोठ्या प्रमाणावर लोक मनाच्या आणि इंद्रियांच्या अधीन झालेले आहेत. आपल्यावर मनाने आणि इंद्रियांनी सत्ता गाजविणे ही खऱ्या अर्थाने आपली हार आहे. आपण भगवंताचे भक्त असूनही काम, क्रोध, अहंकार, लोभ, ईर्षा, द्वेष आदि मन आणि इंद्रियांच्या माध्यमातून आपल्यावर सत्ता गाजवतात. यात भगवंता तुला काय मोठेपण मिळणार आहे ?, आम्हांवरी सत्ता व्हावी आणिकांची । थोरीव तुमची काय मग ?।। असा प्रश्न सेनाजींनी भगवंताला केला आहे. या प्रश्नातच सेनाजींचा मन आणि इंद्रियावर विजय मिळवण्याचा विश्वास लपला आहे. आपणालाही असा प्रश्न स्वत:शी करता आला पाहीजे. असा प्रश्न करता येणे म्हणजे योग्य मार्गावर पाऊल टाकणे होय, असे आम्हास वाटते.



संसारात अडकलेला जीव आणि संत, महात्मे यांच्यात फार मोठा फरक असतो. संसारात अडकलेल्या जीवाकडे ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, मीपणा, स्वार्थ, लोभ आदिचे प्रचंड भांडार असते. तर संत महात्म्याकडे शांती, सुख, समाधान, नि:स्वार्थ प्रेम, समता, बंधुता, कर्तव्य आदिचे भांडार असते. या भांडाराच्या पायाजवळ जाण्यासाठी संसारात अडकलेल्या जीवाने त्याच्याकडे असलेले ईर्षा, द्वेष, मत्सर, आदिचे भांडार पूर्णत: रिकामे केले पाहिजे. आपल्याकडील भांडार रिक्त न करता संताकडील भांडार आपल्या भांडारात सामावून घेऊ म्हटले तर चालणार नाही. याची आपणाला जाणीव असल्याने आपण आपल्या भांडाराला पूर्णत: रिक्त केले आहे. त्यामुळे भगवंतानी आता कसलीच टाळाटाळ न करता त्यांचा कृपाशिर्वाद देऊन आपले पूर्णत: रिक्त झालेले भांडार आत्मज्ञानाने भरून द्यावे. आला सेना न्हावी पायाचे जवळी । आता टाळाटाळी नका करू ।।, असे सेनाजींना वाटते. चोखोबारायही असेच म्हणतात, चोखा म्हणे मज घ्यावें पदरांत । ठेवा माझें चित्त तुमचे पायीं ।।. सर्व संतांचा भाव पांडुरंग चरणी असून तो लडिवाळ असतो. असो, समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्य हे आत्मज्ञानाला पुष्टी देणारे विषय आहेत. या विषयाची आत्मज्ञानीला जेवढी गरज आहे, तेवढी गरज समाजालाही आहे. आपली व समाजाची ही गरज भागवण्यात आपण यशस्वी झालो तर आपल्यासारखे आपणच भाग्यशाली असू. जय जय राम कृष्ण हरी ।।.

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार,
दि. २२ फेब्रुवारी २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - फाल्गुन शु. पंचमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- अश्विनी (१७.५४)
योग - शुक्ल (१३.०८)
करण - कौलव (२२.१०)
राहू काल : रविवार
दु.४.३० ते ६.००

दिनविशेष :
१२९०: इजिप्तचा फेरो राम्सेस दुसऱ्याचा राज्याभिषेक झाला.
१८१९: स्पेनने फ्लोरिडाचा प्रदेश अमेरिकेला ५०,००,००० अमेरिकन डॉलरच्या मोबदल्यात विकला.
२०११: न्यूझीलंडच्या क्राइस्टचर्चमध्ये ६.३ रिश्टर स्केलचा भूकंप होऊन मोठी दुर्घटना घडली.

## 'जेईई'त 'बाकलीवाल'चे सहा जण ९९ पर्सेंटाईलच्या पार








**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**
यंदाच्या जेईई मेन्स परीक्षेत बाकलीवाल ट्युटोरियल्सने उत्कृष्ट निकाल देत शैक्षणिक क्षेत्रात आपली छाप अधिक मजबूत केली आहे. संस्थेच्या तब्बल ६ विद्यार्थ्यांनी ९९ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले असल्याची माहिती देण्यात आली.

यामध्ये अर्हान वारेकर (९९.७६), दिग्विजय हजारे (९९.७६), दृष्टी बाफना (९९.५५), यशवर्धन राजमने (९९.३३), पुष्कर पेशवे (९९.०५) आणि आयुष लिगाडे (९९.०३) यांनी ९९ पर्सेंटाइलचा टप्पा ओलांडला. याशिवाय १५ विद्यार्थी ९८, २७ विद्यार्थी ९७, तर ३६ विद्यार्थी ९५ पर्सेंटाइलच्या पुढे आहेत. नियमित 'टेस्ट सिरीज', सविस्तर ॲनालिसिस आणि कन्सेप्ट क्लॅरिटी यामुळेच हे यश मिळाल्याची भावना यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. केवळ अभ्यास नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये योग्य दृष्टिकोन आणि स्पर्धात्मक विचारसरणी विकसित करण्यावर आमचा भर असतो. सोलापूरच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर सक्षम बनवणे हे आमचे ध्येय आहे, असा विश्वास बाकलीवाल ट्युटोरियल्सचे सोलापूर हेड सिन्हा यांनी व्यक्त केला. पालकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल संस्थेने कृतज्ञता व्यक्त केली

# रेशन दुकानात मका नाहीच

## 'आनंदाचा शिधा'ची प्रतिक्षा कायम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**
रेशन दुकानांतून गव्हासोबत मका दिला जाणार असल्याची चर्चा सध्या शहरात आणि जिल्ह्यात वेगाने पसरली आहे. मात्र ही केवळ अफवा असून शासनाकडून मक्याच्या वितरणाबाबत कोणतेही आदेश आलेले नाहीत, असे रेशन दुकानदारांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी संभ्रमात पडू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना नेहमीप्रमाणे तांदूळ आणि गहूच दिला जाणार आहे. काही शिधापत्रिकाधारकांनी मक्याबाबत चौकशी केल्यानंतर दुकानदारांनी पुरवठा विभागाकडे विचारणा केली. मात्र मक्याच्या विक्रीसंदर्भात कोणतीही अधिकृत सूचना नसल्याचे स्पष्ट झाल्याने अफवांना पूर्णविराम मिळाला आहे.

मागील वर्षी सलग दोन महिने तांदळाऐवजी ज्वारीचे वितरण करण्यात आले होते. त्यानंतर ज्वारीचा पुरवठा बंद झाला. त्यामुळे यंदा पुन्हा धान्य वितरणात बदल होणार का, अशी शंका निर्माण झाली होती. त्यातच मक्याच्या चर्चेमुळे ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण तयार झाले. परंतु अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या धान्य वितरणात कोणताही नवीन बदल प्रस्तावित नाही.

दरम्यान, 'आनंदाचा शिधा' योजनेचीही नागरिकांमध्ये चर्चा आहे. गेल्या वर्षी राज्य शासनाने अवघ्या शंभर रुपयांत दोन वेळा आनंदाचा शिधा उपलब्ध करून दिला होता. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाल्याने यंदाही मकर संक्रांतीनिमित्त अशी घोषणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत होती. मात्र अद्याप याबाबत कोणतेही आदेश जाहीर झालेले नाहीत.

नववर्षापासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाच्या मूळ नियमांनुसार धान्य वितरण सुरू आहे. पूर्वी प्राधान्य योजनेत प्रति सदस्य ३ किलो तांदूळ आणि २ किलो गहू मिळत होते. आता त्यात बदल करून २ किलो तांदूळ आणि ३ किलो गहू दिला जात आहे. अंत्योदय योजनेत पूर्वी २० किलो तांदूळ व १५ किलो गहू मिळत होते; आता त्याऐवजी १३ किलो तांदूळ आणि २२ किलो गहू दिला जात आहे.

गेल्या काही महिन्यांपासून तांदूळ आणि गहू यांचे नियमित वितरण सुरू आहे. काही ठिकाणी तांदळाचे प्रमाण जास्त व गव्हाचे कमी असल्याच्या तक्रारी लक्षात घेऊन गव्हाचे प्रमाण वाढविण्यात आले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## वालचंद महाविद्यालयात राज्यस्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**
वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयात जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने बायो इनोक्युलंट इन ॲग्रो इंडस्ट्रीज फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कृषी क्षेत्रातील शाश्वत विकास, जैवखत निर्मिती आणि औद्योगिक संधी या महत्त्वपूर्ण विषयांवर आधारित ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरली.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून लोकमंगल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास घुटे उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी होते. या कार्यक्रमात विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. राजशेखर हिप्परगी आणि समन्वयक म्हणून बायोटेक्नॉलॉजीच्या विभागप्रमुख डॉ. रचना कपूर उपस्थित होते.

कार्यशाळा दोन सत्रांमध्ये पार पडली. पहिल्या सत्रात बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयातील डॉ. राहुल शेळके यांनी जैवखत निर्मिती प्रक्रियेवर व्याख्यान दिले. दुसऱ्या सत्रात सोलापूर येथील कृषी विज्ञान केंद्र येथील शास्त्रज्ञ श्री. अमोल शास्त्री यांनी मास प्रोडक्शन ऑफ बायो इनोक्युलंट या विषयावर मार्गदर्शन केले. प्रस्ताविक डॉ. वैशाली गरगडे यांनी केले. सूत्रसंचालन श्रद्धा जाधव व प्राजक्ता कुलकर्णी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मृणाल चक्रे यांनी करून दिला, तर आभार डॉ. अनिल कट्टी यांनी मानले.

# टेंभूर्णीतील इंटरनेट सेवा खंडित

## एमआयडीसीमधील उद्योगांचे कामकाज ठप्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी -**
टेंभूर्णी येथे सकाळपासून इंटरनेट सेवा पूर्णपणे खंडित झाल्याने एम.आय.डी.सी. परिसरातील उद्योगांचे कामकाज ठप्प झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, मुख्य ऑप्टिकल फायबर केबल कट झाल्यामुळे संपूर्ण परिसरातील ब्रॉडबँड व लीज लाईन सेवा बंद पडल्या आहेत. त्यामुळे उत्पादन, बिलिंग, ई-वे बिल, जीएसटी व्यवहार तसेच बँकिंग कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे.

सकाळी सुमारे आठ वाजताच्या सुमारास इंटरनेट सेवा अचानक बंद पडली. अनेक उद्योगांनी सुरुवातीला ही तांत्रिक अडचण स्थानिक असल्याचा अंदाज व्यक्त केला; मात्र काही वेळातच संपूर्ण एमआयडीसी परिसरातील सर्वच कंपन्यांमध्ये नेट सेवा खंडित असल्याचे स्पष्ट झाले. ऑनलाइन व्यवहारांवर अवलंबून असलेल्या कंपन्यांना मोठा फटका बसला असून, माल पाठविण्याची प्रक्रिया आणि ईमेलद्वारे होणारे पत्रव्यवहार ठप्प झाले आहेत.

बँकिंग व्यवहार, ऑनलाईन पेमेंट गेटवे, जीएसटी पोर्टलवरील नोंदी आणि ई-टेंडरिंग प्रक्रियाही थांबली आहे. अनेक कार्यालयांमध्ये कर्मचारी उपस्थित असले तरी इंटरनेटअभावी कामकाज करता येत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. काही उद्योगांनी पर्यायी मोबाईल इंटरनेटचा वापर करण्याचा प्रयत्न केला; मात्र नेटवर्क क्षमतेअभावी तोही पर्याय अपुरा ठरत आहे.

सेवा पुरवठादार कंपनीच्या तांत्रिक पथकाकडून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. ऑप्टिकल फायबर केबल नेमकी कशामुळे कट झाली, याचा तपास सुरू आहे.




## राजराजेश्वरी शाळेचे हिंदी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**
राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा मार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत विनायक नगर येथील राजराजेश्वरी प्राथमिक शाळेतील १०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. हिंदी सुलेखन परीक्षेत पाचवीच्या ४८ विद्यार्थ्यांमधून चार विद्यार्थी विशेष योग्यता श्रेणीत तर ४४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. हिंदी प्राथमिक परीक्षेत सहावीच्या २३ विद्यार्थ्यांमधून १६ विद्यार्थ्यांनी विशेष योग्यता श्रेणीत तर सात विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

हिंदी प्रारंभिक परीक्षेत सातवीच्या ३५ विद्यार्थ्यांमधून ३३ विद्यार्थ्यांनी विशेष योग्यतेत तर दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. सहशिक्षक बजरंग शिरसट यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, ज्येष्ठ शिक्षिका वैशाली गुजर, बजरंग शिरसट यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात आले.







# जुळे सोलापूरच्या कृष्णा कॉलनीत अवतरला किल्ले दरबार

## १५ गल्ल्यांना देण्यात आली गडकिल्ल्यांची नावे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दैदिप्यमान इतिहासाची आणि स्वराज्याच्या गडकिल्लूयांची आठवण सदैव तेवत राहावी, या उद्देशाने जुळे सोलापूर येथील कृष्णा कॉलनीमध्ये सी विभागात पंधरा गल्ली आहेत. प्रत्येक गल्लीला किल्लूयाची नावे दिलेली आहेत. शिवजयंतीचे औचित्य साधून एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला आहे. येथील तब्बल १५ गल्लूयांना महाराष्ट्रातील ऐतिहासिक गडकिल्लूयांची नावे देण्यात आली असून, यामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला आहे.












## महत्वाचे...



### कासारवाडी जि.प. शाळेत शिवजयंती

**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथे शिवजयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धेश्वर जगताप, उपाध्यक्ष सुधीर माने यांच्या हस्ते करण्यात आले. वीणा कदम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाबद्दल माहिती सांगितली. शिवनिती, गनिमी कावा आणि महाराजांच्या युद्ध कौशल्यावर बाळासाहेब मुंढे यांनी मुलांना माहिती दिली.आभार अभयकुमार कसबे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर बडे, अभयकुमार कसबे, बिनादेवी दरेकर, बाळासाहेब मुंढे, मनीषा भोसले, रेणुका मुंढे, द्वारका पिंपळे यांनी परिश्रम घेतले.



### अक्कलकोटमध्ये रक्तदान शिबीर

**अक्कलकोट, दि. २१ फेब्रुवारी-**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रतिमेस पूजन करून रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे आयएमसीचे चेअरमन जशेखर हिप्परगी होते. शिबिरात संस्थेचे आयएमसी सदस्य कमलाकर सोनकांबळे हे उपस्थित होते सदर रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान याचे महत्त्व सिव्हिल हॉस्पिटलचे डॉ. अजय इंगळे, बनाळे यांनी पटवून दिले. सूत्रसंचालन मंठाळे यांनी केले. शिबीराकरिता प्राचार्य प्रदीप हरिदास यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे जेष्ठ निदेशक नदाफ, बोगाळे, बगले, वाघमारे, गवल, बिराजदार, कोणापुरे, स्वामी, सोन्नद, खंदारे, माडीकर यांचे सहकार्य लाभले.



### संत रोहिदासांनी समता अन् भक्तीचा संदेश दिला : हभप गोसावी

**टेंभुर्णी, दि. २१ फेब्रुवारी-**

संत रोहिदास महाराज (रविदास) हे भक्ती चळवळीतील महान संत होते. समता, मानवता आणि भक्ती यांचा संदेश त्यांनी दिला. संत रोहिदास महाराज हे समतेचे, भक्तीचे आणि समाजसुधारणेचे प्रभावी संत होते असे प्रतिपादन हभप विकास महाराज गोसावी यांनी केले. कन्हेरगांव (ता. माढा) येथे श्री संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हभप विकास महाराज गोसावी बोलत होते. हाचि नेम आतां न फिरें माघारी । बैसलें शेजारीं गोविंदाचे या अभंगावर त्यांनी विवेचन केले. यावेळी उपसरपंच लिंबाजी मोरे, सरपंच श्रीकांत बनसोडे, माजी उपसरपंच धनंजय मोरे, ज्योतीराम कांबळे, हभप नामदेव महाराज शिंदे, अमोल मोरे, मृदुंगाचार्य हनुमंत केंगार, सदस्य गणेश माने, विष्णू मोरे, जयराम डोके, गणेश शिंदे, श्रीमंत पाटील, केशव डोके, शिवदास पाटील, जालिंदर डोके, नागनाथ भगत, नागनाथ डोके, बळीराम शिंदे, विकी मोरे, तुकाराम केदार, राजेंद्र डोके, दत्तात्रय पाटील, महादेव पाटील, भारत डोके, दत्तात्रय सुतार, सुभाष गायकवाड, वामन लोंढे, हनुमंत भाग्यवंत, यल्लाप्पा सोनवणे, तुकाराम शिंदे, राजेंद्र शिंदे, रवींद्र शिंदे, मारुती मोकाशी, देविदास जाधव, नवनाथ सोनवणे, संजय सुतार, आबा धुमाळ उपस्थित होते.



### ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयात शिव ध्वजारोहण

**अक्कलकोट, दि. २१ फेब्रुवारी-**

येथील मधला मारुती परिसरातील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयात त्रिमूर्ती महाशिवरात्री ही निराकार परमात्मा शिवाच्या अवतरणाचा महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी नगरसेवक देविदास कवटगी यांच्या हस्ते शिव ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नगरसेविका शैलजा स्वामी, मैंदर्गीचे नगरसेवक मुत्तण्णा करजगी, उद्योगपती सचिन किरनळ्ळी, पत्रकार विरूपाक्ष कुंभार, डॉ. बसवराज चिनकेकर उपस्थित होते. आयोजित सभेत अक्कलकोट ब्रह्मकुमारी सेवा केंद्र संस्थेच्या संचालिका बी. के. राणी बहनजी व बी. के. जगदेवी यांनी तिलक लावून व पुष्पगुच्छ देऊन सर्व मान्यवरांचे स्वागत केले. सुमन बहीणजी यांनी संस्था परिचयासह महाशिवरात्रीचे रहस्य सांगितले. राजयोग ध्यान, अध्यात्मिक प्रवचन, दीप प्रज्वलन आणि आपल्यातील काम, क्रोध, लोभ यांसारख्या विकारांना शिवाला अर्पण करण्याचा संदेश दिला. यावेळी भाई दीपक मचाले, बी. के. इराणा विजापूरे भाई, बी. के. श्रीमंत , रतन बाबशेट्टी, हणमंत कोतले, काळे आणि समर्थ बाबशेट्टी यांचे सहकार्य लाभले. सोनाली जाजू यांनी सूत्रसंचालन केले. वैशाली नन्ना यांनी आभार मानले.

# अवैध मुरूम उपशाकडे दुर्लक्ष; मंडल अधिकाऱ्यांवर कारवाई करा

### मंद्रूपच्या तहसीलदारांनी लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

मंद्रूप अप्पर तहसील कार्यालय अंतर्गत अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध मुरूम उपसा सुरू आहे. याबाबत महसूल विभागाकडे अनेक तक्रारी असतानाही संबंधित गावाचे तलाठी व मंडल अधिकारी हितसंबंध जोपासत असल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. म्हणून हितसंबंध जोपासून कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या मंडलाधिकाऱ्यांवर तहसीलदारांनी कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

मंद्रूप तहसील कार्यालयातील मंद्रूप ग्राम पंचायत, कुसुर-खानापूर रस्ता, माळकवठे लवंगी_ कारकल रस्ता तसेच राजुर रस्त्यासाठी नाममात्र रक्कम भरून रॉयल्टी काढण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात त्या ठिकाणी शंभर पटीने अधिक अवैध मुरूम उपसा करण्यात आला आहे. याबाबत महसूल प्रशासनाकडे लेखी तक्रार करूनही प्रशासनातील मंडल अधिकारी हितसंबंध जोपासत असल्यामुळे कारवाई करण्यास टाळाटाळ करीत आहेत. याउलट ठेकेदारांकडून तक्रारदारांवर राजकीय दबाव आणून कारवाई गुंडाळण्याचा प्रकार सुरू आहे. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असताना मंडलअधिकाऱ्यांच्या कामचुकार व हलगर्जीपणा बद्दल नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे तहसीलदारांनी अवैध मुरूम उपसाकडे दुर्लक्ष करणाऱ्या मंडल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. तहसीलदारांनी स्वतः स्थळ पंचनामा करून संबंधित ठेकेदार व मुरूम उपसा करणाऱ्या वाहनचालकावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

**तक्रारदारांवर राजकीय दबाव**

दोन महिन्यांपूर्वी अवैध मुरूम उपसासंदर्भात तहसील कार्यालयाकडे लेखी तक्रार देण्यात आली आहे. मात्र मंडल अधिकारी व तलाठी त्या लोकांवर कारवाई करण्याऐवजी तक्रारदारांवर राजकीय दबाव आणून तक्रार मागे घेण्यास सांगत आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबद्दल संशय व्यक्त करण्यात येत आहे.

**दोन महिन्यांपासून पंचनामा करण्यास टाळाटाळ**

मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयाअंतर्गत अनेक गावांमध्ये अवैद्य मुरूम उपसा सुरू आहे . शिवाय शासनाच्या नियमाचे उल्लंघन करून वाळू उपसा होत आहे. याबाबत मंद्रूप अप्पर तहसील कार्यालया कडे लेखी तक्रार करण्यात आली आहे. मात्र दोन महिन्यानंपासून प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी त्याकडे दुर्लक्ष करून शासनाचे कर बुडवत आहेत. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हितसंबंध जोपासणाऱ्या मंडल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## श्रुतिक वरनाळे हिचा स्टुडंट ऑफ द इयर पुरस्काराने गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ फेब्रुवारी-**



तालुक्यातील वागदरी येथील श्रुतिका दत्तात्रय वारनाळे हिला लातूर जिल्ह्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'स्टुडंट ऑफ द इयर' हा पुरस्कार मिळाल्याबद्दल तिच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

बी. फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या श्रुतिका वरनाळे मागील तीन वर्षे महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवत सातत्यपूर्ण गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संशोधन, कला, क्रीडा आदी विविध क्षेत्रांतही तिने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. या यशामागे प्रा. शिवशंकर वागदरे यांचे मार्गदर्शन लाभल आहे. श्रुतिका वरनाळे हिच्या या उल्लेखनीय कामगिरीचे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, नगरसेवक महेश हिंडोळे, ज्येष्ठ समाजसेवक दयानंद बिडवे, महाराष्ट्र प्रदेश भाजपा सदस्य शिवशरण जोजन, रवी कुमार वरनाळे, दत्तात्रय वारनाळे, ललिता वरनाळे आदींनी वरनाळे हिच्या यशाबद्दल अभिनंदन केले.

## शिवजन्मासाठी जिजाऊंचे संस्कार आवश्यक

### सुलाखे कॉलेजमध्ये शिवजयंतीतून प्रेरणेचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**



छत्रपती शिवाजी महाराज जन्माला येण्यासाठी आधी जिजाऊसारख्या मातांचा जन्म होणे आवश्यक आहे.आजच्या पिढीने जिजाऊंसारखे संस्कार आपल्या मुलांवर केले तरच समाजात आदर्श नेतृत्व निर्माण होईल, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे यांनी व्यक्त केले.

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी येथे अंतर्गत मूल्यमापन समिती, राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. जे. पी. डमरे उपस्थित होत्या तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे होते. कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. ए. ढगे, प्रा. के. एम. माळी, वाणिज्य विभाग प्रमुख के. बी. चपटे, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. जे. आर. यादव, ज्युनिअर विभाग प्रमुख पोहोळकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन झाली. बी.कॉम भाग ३ चे विद्यार्थी यश मनोज रणसुभे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या प्रा. जे पी. डमरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शिवानी पवार यांनी केले. प्रास्ताविक प्राची मस्तुद यांनी तर आभार प्रदर्शन सलीम तांबोळी यांनी मानले.



### एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये शिवजयंती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यानंतर विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित व त्यांचे शौर्य, दूरदृष्टी, नेतृत्वगुण आणि आदर्श मूल्यांवर प्रकाश टाकणारी प्रभावी भाषणे सादर केली. महाराजांच्या कार्याला आणि शौर्यगाथेला पोवाडे सादर करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या पोवाड्यांमुळे उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहिले. शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण प्रसंगांवर आधारित नाटिकांनी कार्यक्रमात विशेष रंग भरला. मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. या कार्यक्रमास समन्वयिका अनुपमा कोठावडे उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### हनुमान वाचनालय येथे शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ फेब्रुवारी-**

वासुद (ता.सांगोला) येथील श्री हनुमान सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष तात्यासाहेब केदार सावंत आणि सचिव चेतनसिंह केदार-सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस ग्रंथपाल अनिकेत शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी हनुमान विद्यालयातील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, उपस्थित होते. शिक्षक सतिश गेजगे यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महत्वपूर्ण कार्याचा इतिहास कथन केला. विद्यार्थ्यांकडून जय भवानी, जय शिवाजी या घोषणांनी परिसर यावेळी दणाणून सोडला. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण प्रसंगांवर आधारित नाटकाचे सादरीकरण केले.



### वझरे येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ फेब्रुवारी-**

वझरे (ता.सांगोला) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव घोषणा देऊन मानस पवार व तेजस पवार या बालचिमुनी सर्वांची मने जिंकली. याप्रसंगी शरण्या जाधव, देवानंद जंबगी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सरपंच मल्हारी चव्हाण, उपसरपंच लक्ष्मण वाघमारे, ग्रा.पं.सदस्य बाबुराव जाधव, सचिन यादव, वसंत पाटील, महादेव पवार, अशोक पाटील, अंकुश पाटील, धोंडीराम पाटील, उत्तम जोंधळे, नितीन पाटील, सुभाष कोकरे, आनंदा कोकरे, सचिन कोकरे, बाळासो वाघमोडे, सदाशिव वाघमोडे, दत्तात्रय आलदर, महेश वाघमारे, शरद गुरव, दासू गुरव, सुरेश पवार, सुरेश रेड्डी, प्रशांत कदम, प्रशांत पाटील, दत्तात्रय वाघमारे, काका वाघमारे, नितीन वाघमारे, संभाजी शिंदे, बापू पवार, कार्तिक पवार, नरसिंह निंबाळकर, ग्रामसेविका मेघा हिप्परकर, रविराज शेटे, निलेश जाधव, पल्लवी जाधव, वर्षा पवार, आर्.एन.जाधव, शुभम कुडचे, संस्कार पवार, संजय यादवाडे, सुरेश पवार उपस्थित होते. सूत्रसंचालन आबा पवार यांनी केले. आभार प्रा.के.वाय. पाटील यांनी मानले.

### नवचैतन्य कुलातर्फे विविध स्पर्धा व वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ फेब्रुवारी-**

श्रीमती गीता बनकर अध्यापक विद्यालय, सांगोला यांच्यातर्फे सुरू असलेल्या छात्रसेवाकाल अंतर्गत नवचैतन्य कुलातर्फे जि.प. प्राथमिक केंद्र शाळा, वाढेगाव येथे हस्ताक्षर स्पर्धा, रंगभरण स्पर्धा घेत वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षीय मनोगत प्रशालेचे उपमुख्याध्यापक बोत्रे यांनी व्यक्त केले. स्पर्धेचे परीक्षक बाबर यांनी रांगोळी कशाप्रकारे असावी? त्याची रंगसंगती कशी असावी ? त्याचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. याप्रसंगी डी.एल.एड प्रा. महिमकर, प्रा.उकळे यांच्या मार्गदर्शनाखाली छात्रअध्यापकांनी वृक्षारोपण केले. यावेळी शिक्षक राऊत, नवचैतन्य कुलाचे छात्रमुख्याध्यापक कुंभार, छात्रमुख्यध्यापिका हवालदार उपस्थित होत्या. सूत्रसंचालन वगरे, प्रास्ताविक पवार यांनी केले. आभार पाटील यांनी मानले.



### वैरागमध्ये श्री सद्‌गुरु शंकर महाराज पालखी सोहळ्याचा उत्साह

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २१ फेब्रुवारी-**

पुणे-धनकवडी येथील श्री सद्गुरु शंकर महाराज पायी पालखी प्रतिष्ठानच्या पालखीचे वैरागमध्ये आगमन झाले. एनडीएस परिवार, यांच्या वतीने या पालखी सोहळ्याचे आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने वैराग नगरीत भक्तीचा जनसागर लोटला असून आध्यात्मिक वातावरणाने अवघी नगरी दुमदुमून गेली आहे. एनडीएस परिवाराच्या वतीने श्री सदगुरु शंकर महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दर्शनाचा लाभ घेण्यासाठी वैरागसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी हजेरी लावली. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी धनंजय सोनवणे, आनंद साखरे, दीपक क्षीरसागर, धनंजय गरड, पप्पू क्षीरसागर, अकबर सय्यद, पप्पू बिडकर, प्रवीण म्हेत्रे, अजित जाधव, लाला गायकवाड, टिंकू वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲपचा लाभ घ्यावा

### कृषी अधिकारी सतीश कचरे; रत्नाई महाविद्यालयात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ फेब्रुवारी-**




कृषी विभागाच्या महाविस्तार ॲपचा शेतकऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी लाभ घ्यावा. शेतकऱ्यांना घरबसल्या कोणताही खर्च न करता इतंबूत माहिती सहज उपलब्ध होणार असल्याची माहिती अकलूज विभागाचे मंडल कृषी अधिकारी सतीश कचरे यांनी दिली.

येथील शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित रत्नाई कृषी महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र शासन कृषी विभाग कार्ये आणि त्याचा विस्तार या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. त्याचबरोबर सहाय्यक कृषी अधिकारी नितीन ढगे यांनी कृषी विभागाच्या विविध योजना यावर विद्यार्थ्यांना संबोधित केले. कृषी पदवी कालावधीमध्ये अभ्यास कसा करावा, शेतकऱ्यांना अर्थातच पालकांना शेती संशोधन आणि त्याची अंमलबजावणी कशी करावी, कृषी उद्योग कसे उभारावेत, या मुद्द्यावर सहाय्यक कृषी अधिकारी सारिका एकतपुरे यांनी प्रकाश टाकला. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कृषी विस्तार शिक्षण विभागाचे प्रा. सचिन एकतपुरे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. सचिन भोसले, डॉ. बंडोपंत शिंदे, प्रा. आबासाहेब तमनर, प्रा. संदीप कांबळे, प्रा. नवनाथ गाढवे, प्रा. आर. वी. कणसे व दिलीप भोसले यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमांसाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक संचालक माननीय जयसिंह मोहिते- पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



### वटवृक्ष देवस्थानच्या सेवेत महेश इंगळे यांचे योगदान मोलाचे : दिलीप माने

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ फेब्रुवारी-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे प्रमुख तथा भारतीय जनता पार्टीचे शहराताल सर्वात अनुभवी नगरसेवक महेश इंगळे यांच्या श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या सेवेत मोलाचे योगदान असल्याचे मनोगत माजी आमदार दिलीप माने यांनी व्यक्त केले. आज दिलीप माने यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास श्री स्वामी समर्थांच्या दर्शना प्रित्यर्थ भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे मनोभावे दर्शन घेतले. याप्रसंगी दिलीप माने यांच्यासह दिलीप माने यांचे सुपूत्र, तथा जिल्हा परिषदेचे नूतन सदस्य पृथ्वीराज माने, शिक्षक नेते दरेकर यांचा श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने नगरसेवक महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी दिलीप माने बोलत होते. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे उपस्थित होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त उद्या कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र मुंबई यांच्या वतीने लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सोलापुरात हुतात्मा स्मृती मंदिर येथे सोमवार दि. २३ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मीनाक्षी गिरधारी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, पालकमंत्री जयकुमार गोरे, खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खा. धैर्यशील मोहिते पाटील, खा. प्रणिती शिंदे, आ. रणजीतसिंह मोहिते-पाटील, जयंत आसगावकर, दिलीप सोपल, नारायण पाटील, सचिन कल्याणशेट्टी, राजू खरे, बाबासाहेब देशमुख, अरुण लाड, सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, उत्तमराव जानकर, अभिजीत पाटील उपस्थित राहणार आहेत. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा समारंभ होणार आहे.

यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मयुरेश माणकेश्वर यांनी केले आहे.



# अकलूजमध्ये २८ फेब्रुवारीपासून राज्यस्तरीय लावणी स्पर्धा

**यंदा ११ निवडक पार्ट्यांचा असणार सहभाग; नगरसवेक सयाजीराजे मोहिते-पाटील यांची माहिती**





**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२१ फेब्रुवारी-**

शंकरनगर (अकलूज) येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समितीच्यावतीने दि.२८ फेब्रुवारी व दि. १ मार्च रोजी स्मृतीभवन शंकरनगर अकलूज येथे राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती अकलूजचे नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी दिली.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. ते पुढे म्हणाले, जयंती समारंभ समितीचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी सहकार महर्षींचे अमृत महोत्सवी जयंती वर्ष जानेवारी १९९३ पासून राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेला सुरुवात केली व सन २०१८ पर्यंत अविरतपणे हा लावणीचा प्रवास चालला. या स्पर्धेमुळे लावणी कलाकारांना परदेशात कार्यक्रम करण्याची संधी मिळाली. तर अनेक कलावंतांना चित्रपट, रियालिटी शो मधून काम मिळाले. महाराष्ट्रभर कलाकारांचा लौकिक झाला. अकलूजची लावणी देशा बरोबरच परदेशातही गेली. या लावणी स्पर्धेचा प्रवास समितीच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी पुढे सुरु ठेवण्याचे ठरवले. त्यानुसार सन २०२४ पासून सदरच्या स्पर्धेला पुन्हा जोमाने सुरुवात केली. आजही या स्पर्धेचे नियोजन त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. या वर्षीचे स्पर्धेचे हे २९ वे वर्ष असून सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या १०८ व्या जयंती निमित्त स्मृतीभवन शंकरनगरच्या बादशाही रंगमंचावर या स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण ११ निवडक पार्ट्यांना सहभाग देण्यात आला आहे. पारंपारिक व नवकवींच्या लावण्यांचा नजराणा, ढोलकीची थाप, त्याला घुंगराची साथ, पदःन्यासाची नजाकत, सोबतच पेटीची संगत यांचा अनुभव रसिकांना लाभणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी समितीचे सुभाष दळवी, महादेव अंधारे, अशोक जावळे, विजय दोशी, पोपटराव भोसले पाटील, बिभिषन जाधव, संजय गळीतकर सुहास थोरात, सतीश यादव व समितीतील सदस्य उपस्थित होते. प्रवेशिकांसाठी ९७६४११३६९५ या क्रमांकावर संपर्क करण्याचे अवाहनही करण्यात आले आहे.




### स्पर्धेसाठीची भव्य पारितोषिके खालीलप्रमाणे....

प्रथम क्रमांकास रुपये तीन लाख, द्वितीय क्रमांकास रुपये दोन लाख, तृतीय क्रमांकास रुपये एक लाख, तर उत्कृष्ट नृत्यांगना रुपये ५ हजार व कै. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील स्मृती चषक, उत्कृष्ट अदा (वैयक्तिक) रुपये ५ हजार, उत्कृष्ट मुजरा रुपये ३ हजार, उत्कृष्ट ढोलकीपटू, उत्कृष्ट पार्श्वगायिका, उत्कृष्ट पेटीवादक, व उत्कृष्ट तबलावादक यांना प्रत्येकी रुपये १ हजार. अशी पारितोषिक देण्यात येणार आहेत.

### स्पर्धेतील सहभागी पार्ट्या याप्रमाणे

**शनिवार दि.२८ फेब्रुवारी**

१) वैशाली समसापुरकर जय अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी. (२) काजल-स्वाती जळगावकर अलंकार सांस्कृतिक कला केंद्र, सुपा जि. अहिल्यानगर (३) बेला, श्रद्धा नेटूरकर जय भवानी सांस्कृतिक कला केंद्र, खोसपुरी पंढरीचापूल जि. अहिल्यानगर (४) अपर्णा, कीर्ती नगरकर लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी जि. पुणे (५) गीता, श्रुती वाईकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, गोकुळ शिरगाव, जि. कोल्हापूर.

**रविवार दि. १ मार्च**

(१) छाया, पूजा, श्रद्धा कोल्हापूरकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, अंबप वाठार जि. कोल्हापूर (२) जोत्स्ना वाईकर पिंजरा सांस्कृतिक कला केंद्र, वेळे ता.वाई जि. सातारा (३) नटरंग सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी, मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर (४) राजनंदिनी सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी, यवत चौफुला जि. पुणे (५) वैष्णवी कोल्हापूरकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, अंबप वाठार जि. कोल्हापूर (६) न्यू अंबिका सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी, यवत चौफुला जि. पुणे.

# 'विठ्ठलराव' मध्ये हंगामाची सांगता; १५ लाख ११ हजार ७५५ व्या पोत्याच्या पूजन

**कामगारांना १० टक्के पगारवाढ लागू**

**तभा वृत्तसेवा,**
**पिंपळनेर, दि.२१ फेब्रुवारी-**

पिंपळनेर व करकंब येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याची २०२५-२६ हंगामाची सांगता दोन्ही युनिटमध्ये उत्पादीत एकूण १५ लाख ११ हजार ७५५ व्या साखर पोत्याच्या पूजनाने झाली.

कारखान्याचे फायनान्स मॅनेजर दिलीप लव्हटे व केन मॅनेजर संभाजी थिटे यांचे हस्ते पूजन झाले. कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा.आ.बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या हंगामात आजअखेर युनिट नं.१ कडे १५ लाख ५२ हजार १८२ मे.टन व युनिट नं.२ कडे ५ लाख २४ हजार ४५१ असे एकूण २० लाख ८६ हजार ६३३ मे.टन ऊसाचे गाळप झाले. १५ लाख ११ हजार ७५५ क्विंटल साखर पोती उत्पादीत झाली आहेत. दोन्ही युनिटचे मिळून ७ कोटी ९ लाख ७० हजार ५०० युनिट वीज विक्री करण्यात आलेली आहे. या हंगामामध्ये युनिट नं.१ चे डिस्टीलरी विभागाकडे शुगर सिरप पासून ३ कोटी ५७ लाख ब.लि. इथेनॉल उत्पादन झाले आहे.



या हंगामासाठी ऊसाची उपलब्धता कमी प्रमाणात असल्याने हंगाम लवकर बंद झाला. सर्वच कारखान्यांना ऊसाची कमतरता भासली. तसेच या हंगामात दोन्ही युनिट कडे गाळपास आलेल्या ऊसास हंगामाचे सुरूवातीपासून १० दिवसाला ऊस बिलाचे पेमेंट अदा केले. या हंगामात गाळपास आलेल्या ऊसास प्रति मे.टन रू.३०२५/- प्रमाणे अदा करण्यात करणेत आले असून या हंगामात १० फेब्रुवारीअखेर ऊस बिलापोटी आज अखेर रू.५९६ कोटी २२ लाख व ३१ जानेवारी अखेर तोडणी वाहतूक बिलासाठी रू.१५४ कोटी ०३ लाख अदा करण्यात आले. दोन्ही युनिट कडील यशस्वी कामकाजासाठी कारखान्याच्या काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांना पंधरा दिवसाचा पगाराइतकी रक्कम बक्षिस म्हणून अदा करण्यात येणार आहे. तसेच कारखान्याचे युनिट नं.१ व २ कडील सर्व कामगारांना त्रिपक्षीय करारानुसार माहे जानेवारी पासून १० टक्के पगारवाढ लागू करणेत येत आहे.

हा हंगाम सभासद,ऊस पुरवठादार,ऊस तोडणी मजूर, वाहनमालक, अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्याने यशस्वी झाला असल्याचे कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे यांनी सांगितले. यावेळी युनिट नं.२ चे जनरल मॅनेजर पोपट येलपले, चिफ केमिस्ट अनिल जगताप, चिफ इंजिनिअर संजय कैचे, ईडीपी मॅनेजर रमेश खेडकर, कामगार प्रतिनिधी अनिल वीर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सराफ व्यापाऱ्याला लुटण्याचा प्रयत्न; वाहनाने दिली धडक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ फेब्रुवारी-**

येथील एका सराफ व्यापाऱ्याला चारचाकी वाहनाने धडक देऊन जिवे मारण्याचा प्रयत्न करून अज्ञात लोकांनी त्याची बॅग पळवून नेल्याची घटना शुक्रवारी रात्री अंदाजे दहाच्या सुमारास घडली आहे. या घटने मध्ये जखमी झालेल्या व्यापाऱ्याचे नाव दिलीप कदम असे आहे.



पंढरपूर शहरातील अन्नपूर्णा हॉटेलसमोर एस. टी. कदम या ज्वेलर्स दुकानाचे मालक दिलीप कदम हे नेहमीप्रमाणे आपले दुकान बंद करून (एम एच १३ सी सी ९९५०) या क्रमांकाच्या दुचाकीवरून निघाले होते. ते कराड रोडवरील वरद विनायक रुग्णालयाच्या समोरील रस्त्यावर आले असता, मागील चार चाकी वाहनाने त्यांना धडक दिली.

ते रस्त्यावर पडल्यानंतर त्यांची बॅग त्या चार चाकी वाहनातील अज्ञात व्यक्तींनी पळवून नेली आहे. दरम्यान ही माहिती मिळताच पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांनी घटनास्थळी भेट दिली. त्याचबरोबर दिलीप कदम यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेत कदम यांचे काही आर्थिक नुकसान झाले आहे का याची तपासणी पोलिस प्रशासनाकडून सुरू होती.



# कवठेकर प्रशालेस डिसेंट'तर्फे सॅनिटरी पॅड वेंडिंग, डिस्पोजल मशीन भेट

**पंढरपूर,दि.२१ फेब्रुवारी -**

गेली अनेक वर्ष विद्यार्थिनींच्या आरोग्याची काळजी घेणारे डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून पंढरपूर शहरातील पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर आणि द ह कवठेकर या दोन्ही प्रशालांसाठी सॅनेटरी पॅड व डिस्पोजल मशीन नुकतेच भेट देण्यात आले. यामुळे मुलींना शिक्षण घेणे अधिक सोयीस्कर होणार असल्याचे प्रतिपादन संस्थेचे सचिव सू.र.पटवर्धन यांनी व्यक्त केले.

आजपर्यंत अनेक विद्यालयांमध्ये फाउंडेशनच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यामध्ये कार्य चालू आहे यामध्ये डिस्पोजल मशीन बसविणे अंध अपंगांसाठी बॅटरी ऑपरेटेड सायकल उपलब्ध करून देणे वृद्धांसाठी काठी उपलब्ध करून देणे असे अनेक उपक्रम राबविले जात आहेत. पंढरपूर तालुक्यातील इतरही काही शाळांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन डिसेंट फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र बिडवई व सचिव फकीर आतार यांनी केले. यापुढील काळात देखील संस्था विद्यालयांसाठी अनेक उपक्रम राबविणार असल्याचे मत डिसेंट फौंडेशनचे संचालक आदिनाथ चव्हाण यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी रोटरी झोन टू पुणे चे असिस्टंट गव्हर्नर धनंजय राजूरकर तसेच रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीचे सागर ताजने उपस्थित होते.

# महर्षि संकुलात छत्रपती शिवरायांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२१ फेब्रुवारी-**

यशवंतनगर येथील महर्षि संकुलातील विद्यालय परिसर आकर्षक फलकांनी व रांगोळ्यांनी सजवत शंकरराव मोहिते प्रशालेत छत्रपती शिवरायांची जयंती विविध कार्यक्रमांद्वारे उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील, प्रमुख व्याख्याते सुहास उरवणे, प्रशाला समिती सभापती ॲड. नितीनराव खराडे उपस्थित होते. महर्षि बाल वाद्य वृंदामार्फत स्वागत गीत झाले. मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने अभिवादन करण्यात आले. संकुलाच्या वतीने सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात जिल्हास्तरावर प्रशालेने प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल मुख्याध्यापक गळीतकर यांचा सन्मान प्रमुख अतिथी सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. संकुलातील विद्यार्थिनी भूमिका कारमकर, अल्फिया सय्यद ,काव्या सावंत,शांभवी पाठक यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या शुभ हस्ते पार पडला. प्रमुख व्याख्याते सुहास उरवणे शिवव्याख्याते इतिहास अभ्यासक यांनी आपल्या व्याख्यानात सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेला तेजपुंज सूर्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वात असलेली धैर्याची धार व दूरदृष्टीची खोली याविषयी उल्लेख केला. रायगडावर झालेला राज्याभिषेक सोहळा म्हणजे स्वाभिमानाच्या पूर्व जन्माचा सोहळा होता असे सांगितले. कार्यक्रमासाठी शुभम राजमाने, प्रशाला समिती सदस्य कैलास चौधरी, अनिल जाधव ,विनोद जाधव, नितीन इंगवले देशमुख, उपमुख्याध्यापक असिफ झारेकरी, पर्यवेक्षक उमेश बोरावके उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, शौर्य आणि स्वाभिमानाची भावना अधिक दृढ झाली.

# नको रे बाबा निवडणुका! अनेकांवर कर्जाचा डोंगर?

**माळशिरसमध्ये निवडणुकीत कोट्यवधींची उलाढाल**

**तभा वृत्तसेवा । संजय पाटील**
**पिलीव, दि. २१ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यात नुकत्याच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकींचा धुरळा खाली बसला आहे. या निवडणुकांनी अनेकांच्या आयुष्यात आर्थिक वादळ निर्माण झाले आहे. यामध्ये काहीजण विजयी झाले आहेत. अनेकांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. आता दोन्ही बाजूंच्या अनेकांना प्रश्न पडला आहे तो म्हणजे कर्ज काढुन निवडणुकीत केलेला खर्च. या कर्जाची आता परतफेड कशी करावयाची हा प्रश्न सध्या अनेकांपुढे उभा राहीला आहे. अनेकांनी कर्ज काढुन निवडणुका लढविल्या आम्हीपण काही कमी नाही हे त्यांनी दाखवुन दिले.

प्रतिष्ठेसाठी त्यांनी कर्ज वाढवत घेतले तर अनेकांनी पाण्यासारखा पैसा खर्च करुन डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा केला आहे. यामुळेच अनेकांवर 'नको रे बाबा निवडणुका' म्हणण्याची वेळ आली आहे. माळशिरस तालुक्यात १०० कोटीच्या वर उलाढाल झाली असल्याचे बोलले जात आहे. यातील मोठी रक्कम कर्जाच्या माध्यमातून आली असल्याचे बोलले जाते. निवडणूक जिंकण्यासाठी हायटेक प्रचार यंत्रणा यामध्ये गाड्यांचे ताफे, सोशल मिडीयावरील जाहिराती, मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी वेगवेगळे फंडे. मतदारांना जेवणावळी यासाठी अमाप खर्च केला गेला. मग यासाठी खाजगी सावकार, पतसंस्थेकडून किंवा मित्र परिवाराकडुन हातउसने व कर्जरूपाने पैसे निवडणुकीत घेण्यात आले. त्याची परतफेड कशी करायची याची चिंता आता निवडणूक लढवलेल्या सर्वांना लागली आहे.



**इकडे आड तिकडे विहीर**

निवडणूक झाल्यानंतरची उमेदवाराची परिस्थीती इकडे आड तिकडे विहीर अशी झाली आहे. विजयी झालेल्यांचे ठिक आहे पण पराभव झालेल्यांसमोर अडचणी आहेत. काही जण निवडून जरी आले तरी जिल्हा परिषदेवर किंवा पंचायत समितीवर सत्ता नसल्याने नाराज आहेत. आता कर्ज कसे फेडायचे, केलेला खर्च पाच वर्षांत निघेल का, तेवढी आपणास कामे मिळतील का असा मोठा प्रश्न अनेकांसमोर उभा आहे. डोक्यावर झालेला कर्जाचा डोंगर कसा फेडायचा हा प्रश्न सध्या सदस्यांना भेडसावत आहे.

**लोकशाहीसाठी धोक्याची घंटा, सर्वसामान्यांना निवडणुका लढविणे मुश्कील**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणूक लढविण्यासाठी कोटयावधी रुपयांचा खर्च होत आहे. त्यामुळे यापुढे सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना निवडणूक लढविणे मुश्कील झाले आहे. यापुढे राजकारणात फक्त श्रीमंत लोकच दिसतील. ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटाच समजली जात आहे.

**बिनविरोध निवडणुकीकडे कल वाढणार का ?**

निवडणुकींचा प्रचंड आर्थिक खर्च पाहता भविष्यात सर्वसामान्य व्यक्ती निवडणुकीत उतरेल असे वाटत नाही. यामुळेच भविष्यात निवडणुका बिनविरोध होतील का प्रश्न निर्माण होत आहे. आर्थिक ताकदीमुळे अनेक ठिकाणी निवडणुका बिनविरोध होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने यावर काही तरी ठोस उपाय करणे आवश्यक आहे. अन्यथा लोकशाहीसाठी ही भविष्यात धोक्याची घंटाच ठरू शकते.

**उमेदवार पैसे वाटतोय आणी मतदार घेतोय**

पूर्वी उमेदवार विकासाचे आश्वासन देत होते पण सध्या मतदारच म्हणतात आमचे काय. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात पाकीट वाटप करणे अनिवार्य झाले आहे. मतदार कोणा एकाचे नाही तर येणाऱ्या प्रत्येकाचेच पैसे स्वीकारत असल्याचे विदारक चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. मतदार सध्या जो ज्यादा देईल त्याला मत देऊ किंवा सर्वांचेच घेऊन मनात असेल त्यालाच मत देऊ अशी परिस्थिती .मतदारांना फक्त पैसेच नाही तर पार्ट्या, तीर्थयात्रा, घरगुती भेटवस्तू अशा नाना तऱ्हेच्या युक्त्या मतांसाठी वापरल्या जात आहेत. या सर्व बाबींवर निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाचे विशेष लक्ष असून देखील छुप्या मार्गाने याचे वाटप होते.

**प्रतिष्ठेच्या मतदार संघात प्रचंड मोठी आर्थिक देवाण घेवा**

माळशिरस तालुक्यात अनेक ठिकाणी प्रतिष्ठित राजकीय वारसा असणाऱ्या घरातील उमेदवार होते .त्यांनी निवडुन येण्यासाठी एका मताला प्रचंड मोठी रक्कम मोजली असल्याचे बोलले जात आहे. तालुक्यात पंचायत समिती निवडणुकीत निवडून येण्यासाठी एका एका सदस्याने ४० ते ५० लाख रुपयांपर्यंत खर्च केल्याची चर्चा सुरू आहे. तर जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी जवळपास ७० ते ८० लाख रुपयांपर्यंत खर्च केल्याचे बोलले जात आहे. निवडणुकीत जे उमेदवार निवडून आले किंवा ज्यांचा पराभव झाला त्यांना सध्या कर्ज कसे फेडायचे हा गहन प्रश्न पडला आहे. या खर्चावरून सर्व सामान्य नागरिक राजकारणात भविष्यात टिकेल असे वाटत नसुन लोकशाहीसाठी ही निश्चितच धोक्याची घंटा आहे.